
University of Mumbai

# संभाषित

मुंबई विद्यापीठाचे महाजालावरील आंतरविद्याशाखीय मुक्त नियतकालिक



## कोविड-१९
## प्रतिसाद, प्रतिकार आणि प्रतिक्रिया

वर्ष ०१ | अंक ०१

सप्टेंबर २०२०

# संभाषित

**मुंबई विद्यापीठाचे महाजालावरील आंतरविद्याशाखीय मुक्त नियतकालिक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या ऑनलाईन नियतकालिकाचा जन्म झाला. मे महिन्यापासून सुरू झालेला 'संभाषण'ची वाटचाल चार नियमित अंक आणि 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' अशी यशस्वीरित्या केली. या आंतरविद्याशाखीय द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) नियतकालिकाच्या माध्यमातून विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबत टीकात्मक चर्चा सुरू व्हावी व सखोल विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित व्हावा, या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण'च्या आतापर्यंत प्रकाशित झालेल्या सर्व अंकांना आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी अशा द्विभाषिक नियतकालिकाचा एकत्रित सुरू असलेला प्रवास आनंददायी आणि प्रेरणादायी आहे. मात्र महाराष्ट्राची राज्यभाषा असलेल्या मराठीतूनच ज्ञानव्यवहाराला व संशोधनव्यवहाराला चालना देणे हा विद्यापीठाचा मानस आहे. महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ म्हणून मुंबई विद्यापीठाला मानाचे स्थान आहे. अशा वेळी मुंबई विद्यापीठाचे स्वतंत्र मराठी नियतकालिक असणे ही गौरवाची बाब ठरणार आहे. म्हणूनच विद्यापीठाने स्वतंत्र मराठी अंकासंबंधीचा प्रस्ताव ठेवला आहे. सदर प्रस्तावाचे महत्त्व लक्षात घेऊन सप्टेंबर २०२० पासून 'संभाषण' या द्विभाषिक ई-नियतकालिकाचा स्वतंत्र मराठी अंक 'संभाषित' या नावाने आपली पुढील वाटचाल सुरू करीत आहे.

आंतरविद्याशाखीय संशोधनपर लेखनाला प्रोत्साहन देणे, संशोधनाची शिस्त वृद्धिंगत करणारी अकादमिक संस्कृती विकसित करणे ही 'संभाषित'ची गाभाभूत भूमिका आहे.

*Note on image used on the cover:*
Image on cover page via https://pixabay.com/illustrations/virus-covid-science-covid19-4937553/
Image attribution: CC0 1.0 Universal (CC0 1.0) Public Domain Dedication

# ‘संभाषित’ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही ‘संभाषित’ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा संभाषितच्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न करणे.

- ‘संभाषित’ हे ऑनलाईन संशोधनपर नियतकालिक संशोधनपर लेख, भाष्य आणि पुस्तक परीक्षण या तीन विभागांत प्रकाशित होत आहे. प्रकाशित लेखन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, संशोधनात्मक अशा विविध क्षेत्रातील घडामोडींवर भाष्य करणारे असल्यामुळे संबंधित सर्व कार्यक्षेत्रांत हे नियतकालिक पोहोचेल असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक आणि समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण आणि संशोधनपर विवेचन आणि विश्लेषण करणाऱ्या लेखांचा समावेश सदर नियतकालिकात केला जाणार आहे. स्वाभाविकच, अभ्यासविषयाशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

# शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  **शोधनिबंध** - ३५००-४००० शब्द
  **भाष्य** - १५००-२००० शब्द
  **ग्रंथपरीक्षण** - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये **युनिकोड** फॉन्टमध्ये असावेत.
  फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत.
  लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

# प्रकाशक

***अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.***

हे नियतकालिक समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

"In an ideal society there should be many interests consciously communicated and shared... In other words there must be social endosmosis."

*Dr. B.R. Ambedkar*

# संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा '**संभाषित**' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.

**मानद संपादक** : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सल्लागार संपादक** : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय, उल्हासनगर.

**संपादक** : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

**सहसंपादक** : **डॉ. नीतीन रिंढे**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**डॉ. मंगेश बनसोड**
वरिष्ठ साहाय्यक प्राध्यापक,
अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस्, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**परीक्षण संपादक** : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

**साहाय्यक संपादक** : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
एस.एम.आर. महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**प्रा. आशा हुंबे-पडळकर**
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

**डॉ. नारायण गडदे**
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. नारायण भोसले**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. प्रतिभा टेंबे**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
बदलापूर, जि. ठाणे.

**डॉ. माधुरी पाथरकर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. लता पांचाळ**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

**प्रा. संजय इंगोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**डॉ. सोनाली वरखेडे**
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. विवेक कुडू**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर.

**मांडणी व सजावट:** **प्राजक्ती पै**

**मांडणी - तांत्रिक साहाय्य:** **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

‘संभाषित’ या मराठी भाषेतील स्वतंत्र ई-नियतकालिकाचा पहिला अंक आज प्रकाशित होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीच्या (१४ एप्रिल २०२०) निमित्ताने अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या प्रेरणेतून ‘संभाषण’ या ऑनलाईन नियतकालिकाचा जन्म झाला. द्विभाषिकता (इंग्रजी आणि मराठी) हे या नियतकालिकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून विभिन्न आंतरविद्याशाखीय विचारमंथनासाठी अवकाश सिद्ध करणे ही संभाषणची वैचारिक प्रेरणा आहे. मे २०२०पासून सुरू झालेला हा ‘संभाषण’ चा प्रवास मे, जून, जुलै असे तीन महिने इंग्रजी आणि मराठी अशा दोन भाषांतून एकत्रितपणे सुरू होता. ऑगस्ट महिन्यात अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीच्या निमित्ताने ‘संभाषण’चा ‘अण्णा भाऊ साठे विशेषांक’ हा मराठीतील पहिला स्वतंत्र अंक प्रकाशित झाला. या विशेषांकाने सिद्ध केलेली राज्यभाषेतील स्वतंत्र अंकाची पाऊलवाट ‘संभाषित’च्या माध्यमातून विस्तारित करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.  ‘संभाषित’चा हा अंक याचेच मूर्त रूप आहे.

गेले सहा महिने संपूर्ण जग कोरोना महामारीने अनेक पातळ्यांवर भरडले जात आहे. जागतिक अर्थकारण, राजकारण आणि समाजकारणात १९९० नंतर परवलीचा ठरलेला 'जागतिकीकरण' हा शब्द त्याच्या अनेक संदर्भांसह पुनर्रचित करणारा हा काळ आहे. कोरोनाने व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज, राज्य-राज्य, राज्य-देश, देश-जग यांच्यातील परस्परसंबंधांची नव्याने मांडणी करण्याची अपरिहार्यता सिद्ध केली आहे. ढासळलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेने सामाजिक आणि वैयक्तिक स्तरावर निर्माण केलेली आव्हाने, अर्थसत्ता आणि राजकीय सत्तासंबंधांची बदलती समीकरणे, त्याचा मानवी समूहजीवनावर आणि पर्यायाने वैयक्तिक वर्तनव्यवहारावर झालेला परिणाम, Physical Distancing सांभाळण्यासाठी बदललेली कार्यशैली, अध्ययन-अध्यापनशैली आणि एकूणच जीवनशैली ही या कोरोनाकाळाची संदर्भचौकट आहे.

'संभाषण' आणि आता 'संभाषित'च्या प्रवासाला कोरोनामुळे सुरू झालेल्या या अनेकस्तरीय परिवर्तनाचा संदर्भ आहे. भारतीय परिप्रेक्ष्यात कोरोना महामारीने निर्माण केलेली बहुमुखी आव्हाने आणि या आव्हानांना भिडताना दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रिया, प्रतिसाद यांची सविस्तर नोंद घेणारे लेख संभाषणच्या मे, जून, जुलै महिन्याच्या अंकात प्रकाशित झाले आहेत. तर कोरोनाने प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर उभ्या केलेल्या प्रश्नांचे आणि त्याला जागतिक पातळीवर दिल्या गेलेल्या प्रतिक्रिया-प्रतिसादाचे दस्तावेजीकरण करणारा सप्टेंबरचा अंक आहे. स्वाभाविकच कोरोनाचा सामना करताना वेगवेगळ्या देशांनी स्वीकारलेली आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक रणनीती, त्यातील परस्परसंबंध, साम्यभेद अशा विविध अंगांनी मांडला गेलेला लेखाजोखा या अंकाच्या निमित्ताने समोर येणार आहे. कोरोना महामारीने जगाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थितिगतीसमोर उभे केलेले निर्णायक स्वरूपाचे प्रश्न चिकित्सकपणे मांडणारा हा अंक पुढील चर्चेच्या वाटा खुल्या करू शकेल...

# शोधनिबंध, भाष्य,
# आणि
# पुस्तक परीक्षण

## शोधनिबंध आणि भाष्य


१४ **कोरोना काळातील युनाईटेड किंगडम: सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितिगती**
*प्रेरणा तांबे*

२६ **साथ महिमा : करोना व्हायरस आणि ब्रिटन**
*शैलेन भांडारे*

४२ **महासत्तेचा महामारीशी संघर्ष : एक अवलोकन**
*अथर्व माधव गोंधळेकर*

५१ **असे लढले सिंगापूर !**
*शुभेन फणसे*

६७ **कोविड-१९सह जगताना...**
*हेरंब निरगुडकर, प्राची पालेकर-निरगुडकर*

७५ **कोरोनोत्तर शिक्षणक्षेत्र : आपत्तीतून बदलाची सुखद आशा**
*दीपक करंजीकर*


## पुस्तक परीक्षण


८६ **सातपाटील कुलवृत्तांत : एक सांस्कृतिक हस्तक्षेप**
*संजय इंगोले*

९४ **त्रिज्या : परिपूर्णतेचा शोध**
*वृषाली विनायक*

१०२ **कास्ट मॅटर्स : २१ व्या शतकातल्या दलित जाणिवेतील जात-वर्गीय द्वंद्व**
*विशाल ठाकरे*

# शोधनिबंध आणि भाष्य

# कोरोना काळातील युनाईटेड किंगडम: सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितिगती

**प्रेरणा तांबे**

प्राध्यापक आणि संशोधक
ब्रुनेल युनिव्हर्सिटी, लंडन आणि बर्कबेक कॉलेज,
युनिव्हर्सिटी ऑफ लंडन.
prerna.tambay@brunel.ac.uk

## निबंधसार :

महामारी, रोगराई, युद्धे आणि नैसर्गिक आपत्ती ह्या घटना मानवी जीवनाच्या अविभाज्य भाग राहिल्या आहेत, मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास आपल्या लक्षात येते की महामारीमुळे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थित्यंतरे होतात. ह्या स्थित्यंतरांचे पडसाद दैनंदिन जीवनावर उमटतात. कोवीड १९ ही अशीच महामारी आहे जिने जगभरातल्या प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य प्रभावित केले आहे.

ह्या शोधनिबंधात मी कोरोना काळातील युनाइटेड किंगडममधील (युके) आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्तरांवरील बदलांचा वेध घेत त्याविषयी भाष्य केले आहे. त्यासाठी युनाइटेड किंगडम (युके) मधील १५ व्यक्तींच्या प्रत्येकी अंदाजे ६० मिनिटे अशा मुलाखती घेतल्या आहेत. ह्या शोधकार्यात वैदयकीय क्षेत्रातील व्यक्ती, नोकरदार, गृहिणी, विदयार्थी व काही व्यावसायिक सहभागी झाले होते. त्यांना कोवीड १९ या आजाराविषयीचे त्यांचे मत, शासनाची आरोग्यविषयक व आर्थिक धोरणे, सामाजिक परिस्थिती व दैनंदिन जीवनातील बदल आदी मुद्द्यांविषयी प्रश्न विचारले होते. या मुलाखती युके एथिकल रिसर्च गाईडलाईन (UK Ethical Research Guideline) नुसार घेतलेल्या आहेत. हा शोधनिबंध क्वॉलिटेटिव्ह (गुणात्मक) एक्सप्लोरेटरी (संशोधनात्मक) कार्यपद्धतीवर आधारित आहे. शोधकार्यात हाती आलेल्या निष्कर्षांद्वारे कोरोनाग्रस्त युनाईटेड किंगडमचे सर्वसाधारण वास्तव चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रस्तावना :

कोरोना काळातील युनाइटेड किंगडममधील स्थितिगती समजणे अनेक कारणांसाठी आवश्यक आहे. युनाइटेड किंगडम हे व्यापार, वित्तक्षेत्र, शिक्षण, औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान, संशोधन, पर्यटन, पुरवठा साखळी (supply chain) आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाचे मुख्य केंद्र म्हणून जगाशी जोडले आहे. ६०० दशलक्ष लोकसंख्या असलेल्या या देशात विविध देशांतील लोक स्थायिक झाले आहेत. जगभरातून प्रवासी, विदयार्थी, कामगार आणि उद्योजक हे युनाइटेड किंगडममध्ये ये-जा करतात. लांब प्रवासाची विमानेदेखील युनाइटेड किंगडमच्या हिथ्रो (Heathrow) विमानतळावर थांबतात तसेच ब्रिटीश माणूस आणि ब्रिटनमधील लोक नोकरी, व्यवसाय आणि पर्यटनाच्या निमित्ताने जगभरात प्रवास करत असतात. व्यापाराच्या उद्दिष्टांमुळे जशी आर्थिक आणि सामाजिक देवाण- घेवाण होते तशीच आता कोरोना विषाणूसंदर्भात घडली आहे.

१९१८- १९ मध्ये स्पॅनिश फ्लूची साथ जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात पसरायला महिने लागले परंतु कोरोनाचे विषाणू चीनच्या वुहान शहरातून काही आठवड्यात जगभरात पसरले. कोरोनाचे संक्रमण प्राण्यांमध्ये झाले आणि ते माणसांमध्ये झपाट्याने पसरले. ह्याची कारणमीमांसा विविध प्रकारे करता येईल. जसे प्रवास, झटपट उपलब्ध असणारी प्रवास साधने, वैश्विकरण (Globalization), आर्थिकीकरण, वातावरण व हवामानातील बदल (Global Warming) आधुनिक प्रकारचे पशुपालन, निसर्गात होणारे बदल, उत्परिवर्तन (Mutation), नवीन विषाणूची निर्मिती आणि माणसाला माहीत नसलेल्या बऱ्याच गोष्टी ह्या प्रकाराला कारणीभूत असू शकतात.

ज्यावेळी पूर्ण जग २०२० या नवीन वर्षाचे स्वागत करत होते त्या दिवशी ३१ डिसेंबर २०१९ रोजी WHOला (World Health Organisation) चायनामधील निमोनिया सदृश आजाराची माहिती मिळाली. २८ जानेवारी रोजी WHOचे डायरेक्टर जनरल डॉ. टेड्रोस अधानोम घेब्रेसस यांनी (Dr. Tredos Adhanom Ghebreyesus) आणि त्यांच्या कार्यकारिणी समितीने चायनाचे राष्ट्राध्यक्ष श्री. जिनपिंग (Jinping) यांची भेट घेतली. दरम्यान विषाणूंचा प्रादुर्भाव सुरूच होता.

थायलंड, जपान, फ्रान्स या देशातही विषाणूबाधित रुग्ण सापडत होते. WHO ने स्ट्रॅटेजिक कमिटी स्थापन करून जगाला ह्या नोव्हेल कोरोना व्हायरसबद्दलचे रिपोर्टींग सुरू केले परंतु ह्या विषाणूबद्दल कोणत्याच शास्त्रज्ञांना किंवा वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांना विशेष माहिती नव्हती. हा निमोनियासारखा आजार आहे किंवा साधा साथीचा सर्दी- खोकला असावा अशी भाकिते वर्तवण्यात आली. अशा परिस्थितीत

झपाट्याने पसरणाऱ्या या रोगाशी सामना करण्यासाठी युकेच्या राज्यकर्त्यांचे उपलब्ध दिशांनी चाचपडणे सुरू झाले.

## राजकीय स्तरावरील संभ्रमावस्था व त्याचे समाजजीवनावरील परिणाम :

युनाइटेड किंगडममधील काही तज्ज्ञांचे मत असे होते की नोव्हेल कोरोना विषाणूचा सामना 'हर्ड इम्युनिटी' (कळपाची रोग प्रतिकारशक्ती) निर्माण करून करता येईल. युनाइटेड किंगडमचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन (Boris Johnson) यांनीही आपल्या तज्ज्ञांच्या सल्ल्याप्रमाणे कळप रोगप्रतिकारशक्तीच्या विचार प्रवाहाला प्राधान्य दिले. ते स्वतः कोरोनाने बाधित झाले. एवढेच काय तर राजपुत्र प्रिन्स चार्ल्स यांनाही बाधा झाली. माझ्या संशोधनात भाग घेतलेल्या १००% सहभागींनी हर्ड इम्युनिटी वापरून विषाणूंवर मात करता येईल हा विचारच फार चुकीचा होता, असे म्हटले आहे. १०% सहभागी लोकांनी म्हटले की ब्रिटीश राज्यकर्ते आणि त्यांचे सल्लागार यांना कदाचित कोरोनाच्या विषाणूच्या प्रसाराची तीव्रता जाणवलीच नाही.

वास्तविक कोवीड १९ सारख्या संकटाशी झुंज देणे ही एक व्यापक सामूहिक कृती आहे. अशा कृती दोन टप्प्यांत घडत असतात. प्रथम प्रत्यक्ष कृतीसाठीचा आराखडा तयार केला जातो. त्यावर विचारविनिमय होऊन सर्वानुमते त्याचा स्वीकार केला जातो. आणि नंतर आराखड्यानुसार सर्वसहमतीने प्रत्यक्ष कार्य घडते. ह्या दोन्ही टप्प्यांत एकमेकांशी साधलेला संवाद महत्त्वाचा ठरतो. युकेमध्ये विचार आणि कृती यांच्यात हा समन्वय साधला गेला का असा गंभीर प्रश्न आहे. कोवीडशी सामना करण्यासाठी ब्रिटीश सरकारने अतिशय संदिग्ध संदेश दिले. त्यांत नेमक्या विचारांचा समावेश करायला हवा होता. प्रारंभी तर बऱ्याच नागरिकांना टाळेबंदी (लॉक डाऊन) म्हणजे काय याची कल्पना नव्हती. काही लोकांना टाळेबंदी ही सुट्टी वाटली. जेव्हा लॉकडाऊन सुरू झाला तेव्हा बरेचसे नागरिक सुट्ट्यांवर, सहलींवर गेले होते. त्यामुळे कोवीडचा प्रसार अधिक झपाट्याने झाला. कोवीड हा आजार फक्त वयस्कर लोक आणि इतर आजार (रक्तदाब, कॅन्सर, मधुमेह) असलेल्यांना होतो, तरुणाई सुरक्षित आहे, मुलांना हा आजार होत नाही अशी काहीशी धारणा लोकांमध्ये सरकारतर्फे पसरवली गेली. तसेच ८०% नागरिकांना हा रोग झाला तर सर्वांची रोगप्रतिकारशक्ती आपणहून वाढेल म्हणजेच 'कळप रोगप्रतिकारशक्ती'ची अवस्था येईल असा प्रचार करण्यात आला. मास्क घालणे, घरी बसणे, व्यायाम करायला बाहेर पडण्याची अनुमती देणे, मुलांची शाळा पुन्हा सुरू करणे, हॉटेलमध्ये जेवायला जाणे अशा गोष्टींबद्दल सामान्य नागरिकांमध्ये खूपच संभ्रम होता. कायद्याचे उल्लंघन स्वतः राजकीय नेते करू लागले. निल फर्ग्युसन (Neil Ferguson), डॉमिनिक कॉमिम्स (Dominic Cummins) या नेत्यांनी सोशल डिस्टन्सिंगचे कायदे मोडले. लोकांनी नाराजी व्यक्त

केली. परंतु लोकांच्या नाराजीकडे सरकारने कानाडोळा केला. ह्या व अशा अनेक घटनांमुळे नागरिकांचा गोंधळ उडाला. शाळा सुरू होणार की नाही याबद्दल बरेच संभ्रम होते. टाळेबंदी संपल्यानंतर लोक लाखांच्या संख्येने समुद्र किनाऱ्यावर जाऊ लागले. मुलाखतींमध्ये हा संभ्रम प्रकर्षाने अधोरेखित झाला. यात अधिक भर म्हणजे नागरिकांना इस्पितळात जाऊ नका, असे सांगितले गेले. परंतु आपत्कालीन सेवेसाठी काय करावे हे सांगितले नाही. National Health Service (NHS) वर ताण येऊ नये म्हणून बऱ्याचशा शस्त्रक्रिया रद्द केल्या गेल्या. अनेक वृद्ध व अन्य आजारांनी ग्रस्त असलेली मंडळी त्रस्त होती. हजारो ज्येष्ठ नागरिक वृद्धाश्रमांमध्ये (Care Home) दगावले. येथील सुविधांच्या अभावी गोष्टी हाताबाहेर गेल्या. देशात बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना विलगवासाच्या सूचना ८ जूनपासून दिल्या गेल्या. अर्थात, विलगवासास वेळ लावल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली, ह्यात दुमत नाही.

वास्तविक १६ मार्च २०२० ह्या दिवशी हेल्थ आणि सोशल सेक्रेटरी मॅट हॅंकॉक (Matt Hancock) यांनी हाऊस ऑफ कॉमनमध्ये सांगितले की नागरिकांनी एकमेकांशी संपर्क टाळावा. २३ मार्च २०२० मध्ये पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी नागरिकांना घरी राहण्याचे आवाहन केले. अत्यावश्यक सेवांशिवाय सगळे उदयोगधंदे बंद करण्यात आले. शाळा बंद करण्यात आल्या. परंतु अत्यावश्यक सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी शाळा उघड्या ठेवण्यात आल्या. परंतु लॉकडाऊन शब्दाची औपचारिक व्याख्या नागरिकांपर्यंत पोहोचली नाही. लॉकडाऊनचा खरा अर्थ काय आहे, हेच जनमानसांत रुजले नाही.

परिणामत: दिनांक १३ ऑगस्ट २०२० ह्या दिवसापर्यंत युकेमध्ये कोवीडचे ३,१४००० इतके रुग्ण आढळून आले आहेत आणि ४१,३२९ रुग्ण दगावले आहेत. युरोपियन युनियनमध्ये अंतर्भूत २७ देशांपैकी सर्वात जास्त जीवित हानी युनाइटेड किंगडममध्ये झाली आहे. त्याची अनेक कारणे आहेत परंतु शोधकार्यात मुख्यत्वे अधोरेखित झालेला मुद्दा म्हणजे हर्ड इम्युनिटीचा चुकीचा निर्णय आणि राज्यकर्त्यांनी टाळेबंदी (lock down) करायला लावलेला वेळ, हे होय.

विरोधी मजूर पक्षाचे नेते कीर स्टारमर (Keir Starmer) ह्यांनीही हुजूर पक्षाने केलेल्या दिरंगाईचा निषेध व्यक्त केला. परंतू मजूर पक्षाने मुद्दाम अडवणूक किंवा टीका करण्याचे धोरण अवलंबले नाही. जनतेच्या हिताचा विचार सर्व पक्षांसाठीच मध्यवर्ती होता. स्कॉटलंडच्या प्रथम मंत्री निकोला स्टरजन (Nicola Sturgeon) यांनी मात्र आपले सर्व अधिकार वापरून स्कॉटिश नागरिकांची काळजी घेतली. कोणत्याच राजकीय पक्षाने कोवीड हा राजकीय मुद्दा बनवला नाही, हे विशेष उल्लेखनीय आहे.

## व्यावसायिक क्षेत्राचे बदललेले चित्र व युकेची आर्थिक धोरणे:

आपण कोरोनापूर्व काळात डिजिटायझेशनच्या (digitisation) युगात वावरत होतोच पण ही प्रक्रिया आता सुसाट वेगाने सुरू झालेली प्रत्ययास येत आहे. बऱ्याच कंपन्यांनी रातोरात ऑनलाईन कार्यसंस्कृतीचा स्वीकार केला. काही दिवसांतच युकेमध्ये बऱ्याच कंपन्या डिजिटल झाल्या. १८ वर्षांवरील ७०% कर्मचारी या डिजिटल दुनियेचा भाग झाले. पूर्वीपासून अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरत असलेल्या कंपन्यांचा प्रवास थोडा सुकर होता. परंतु बऱ्याच कंपन्या मात्र चाचपडत होत्या. घरून काम करण्याची सवय नसणारे, तंत्रज्ञानाची खूप सवय नसणारे कर्मचारी नव्या कार्यपद्धतीशी जुळवून घेत होते. शाळा बंद असल्यामुळे गृहिणींची आणि एकेरी पालकत्वाची जबाबदारी असणाऱ्यांची तारांबळ उडाली. माझ्या संशोधन मुलाखतीत सहभागी झालेल्या महिलांनी स्वतःचे अनुभव सांगितले. तसेच त्यांच्या सोबतच्या कर्मचाऱ्यांचे अनुभव सांगितले. त्यामधून काही महिलांनी नोकरी सोडल्याचेही समजले. घरची कामे आणि नोकरी यांच्या कक्षा गुंतागुंतीच्या होताना दिसू लागल्या. लॉकडाऊनचा जास्त ताण महिलांवर आला हे स्पष्ट दिसत होते. उच्च शिक्षणात कार्यरत असणाऱ्या महिलांचे सर्व्हे दर्शवतात की महिलांची रिसर्च आऊटपुट घसरली आहे. परंतु पुरुष कर्मचाऱ्यांची रिसर्च आऊटपुट बदलली नाही. वर्क फ्रॉम होमचे परिणाम वेगवेगळ्या प्रकारे समोर येत आहेत. बऱ्याच कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य दिले आहे. ‘Employee Well Being’ हा महत्त्वाचा मुद्दा झाला आहे. शाळा बंद असल्यामुळे परीक्षा रद्द झाल्या आहेत व त्याचे बरेच परिणाम समाजव्यवस्थेवर दिसत आहेत. ज्या विदयार्थ्यांना घरी अभ्यासाचे पोषक वातावरण उपलब्ध आहे ते विदयार्थी प्रगती करत आहेत आणि इतर मात्र मागे पडत आहेत.

Office Of National Statistics (April 2020) च्या रिपोर्टनुसार युकेची जीडीपी २०.४ % ने घसरली आहे. The Business Impact Of Covid 19 (BICS) सर्व्हे (23 March ते 5 April 2020) च्या रिपोर्टनुसार ज्या कंपन्यांमध्ये घरून काम करण्याची मुभा होती त्या कंपन्यांनी कोवीड काळात चांगली कामगिरी केली. लहान कंपन्यांवर मोठा परिणाम झाला. खेळ, मनोरंजन, पर्यटन, रिटेल, इलेक्ट्रिसिटी कंपन्या, ऑइल आणि गॅस, रिअल इस्टेट, लघुउद्योग यांना उतरती कळा लागली आहे. युकेची इकॉनॉमी ही पर्यटनावर अवलंबून आहे. सध्या पर्यटक येणे फारच कमी झाले आहे. युकेमध्ये सर्व्हिस इंडस्ट्री आणि रिटेल इंडस्ट्री मोठी आहे. परंतु ह्या दोन्ही इंडस्ट्री डबघाईला आल्या आहेत. युके युनिव्हर्सिटीमध्ये जगभरातून मुले शिकायला येतात. ह्यावर्षी युनिव्हर्सिटीजना मोठा फटका बसला आहे. शिकवण्याच्या नवीन पद्धती व डिजिटल शिक्षण यामुळे शैक्षणिक चित्र झपाट्याने बदलत आहे. थोडक्यात, सगळ्याच उद्योगांवर, क्षेत्रांवर गंभीर परिणाम झाला आहे. परंतु काही कंपन्यांनी आपली व्यवसायाची दिशा बदलली आहे. उदाहरणार्थ , मद्य बनवणाऱ्या कंपन्यांनी सॅनिटायझर बनवण्यास सुरुवात केली. ज्या कंपन्यांनी

लवचीकता, सर्जनशीलता आणि नेतृत्व कौशल्य दाखवले त्या कंपन्या तग धरू शकल्या आहेत. बऱ्याचशा हॉटेल्सनी उबर इट्स (Uber eats) तसेच डिलिव्हरू (Deliveroo) सारख्या कंपन्यांशी हातमिळवणी करून घरपोच सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. याचदरम्यान झूम, मायक्रोसॉफ्ट टीम आणि तत्सम डिजिटल प्लॅटफॉर्म लाभान्वित झाले आहेत. गिग इकॉनॉमी आणि प्लॅटफॉर्म इकॉनॉमी वाढत आहे.

ॲमेझॉन, अलिबाबा अशा ऑनलाइन कंपन्यांना मंदीत संधी उपलब्ध झालेली दिसत आहे. औषध बनवणाऱ्या कंपन्यांमध्ये ४. ७ % ने वाढ झाली. परंतु आर्थिक मंदी आणि ब्रेक्झिट असा दुहेरी फटका युकेला बसला आहे. मुलाखतीत सहभागी झालेल्या काही लोकांच्या मते युकेचे पंतप्रधान हे ब्रेक्झिटच्या वाटाघाटीत व्यस्त राहिल्यामुळे त्यांचे कोवीडवरील लक्ष कमी झाले आणि त्यामुळे टाळेबंदी उशीरा झाली. ब्रेक्झिट घडल्यामुळे बरेचसे युरोपीय शेत-कामगार आपापल्या देशात परतले. परिणामी शेतकामाची कमतरता प्रकर्षाने भासत आहे. ब्रेक्झिटचे अनेक परिणाम झाले आहेत. तो चर्चेचा एक वेगळा विषय होऊ शकतो.

लॉकडाऊनमध्ये युकेने अतिशय उत्तम आर्थिक धोरणे राबवली. युकेने आपली आर्थिक स्थिती अबाधित ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मुलाखतीत सहभागी झालेल्या ५०% लोकांचे म्हणणे असे होते की युकेमध्ये नागरिकांचे जीव वाचवण्याऐवजी इकॉनॉमी वाचवण्याचा प्रयत्न केला गेला त्यामुळे टाळेबंदी उशिरा अमलात आली. मूळ भारतीय वंशाचे मुख्य अर्थमंत्री ऋषी सुनाक (Rishi Sunak) यांनी अतिशय उत्तम अर्थशास्त्रीय धोरणे राबवली आहेत. युकेमध्ये फरलो (Furlough) स्कीम राबवली आहे. या स्कीमच्या अंतर्गत अनेकांच्या नोकऱ्या वाचल्या आहेत. त्यादृष्टीने फरलो स्कीम बरीच प्रभावी ठरली आहे. सध्या ही फरलो स्कीम ऑक्टोबरपर्यंत लागू आहे. फरलो स्कीमच्या अंतर्गत कर्मचाऱ्यांना पगारी रजा दिली जाते. आणि हया पैशाची भरपाई कंपन्यांनी सरकारकडून करवून घ्यायची आहे. युनाइटेड किंगडममध्ये ५ पैकी १ कामगार फरलो स्कीमचा लाभार्थी आहे. ह्या स्कीमनुसार कर्मचाऱ्याला ८०% पर्यंत पगार दिला जाऊ शकतो. ही रक्कम जास्तीत जास्त २५०० पाऊंडपर्यंत असू शकते. आतापर्यंत ८०,००००० (ऐंशी लाख) नागरिकांना ८ बिलियन पाऊंड इतके पैसे देण्यात आले आहेत (Sky news ४, मे २०२०) आणि हा आकडा वाढतच आहे. ह्या उपक्रमांतर्गत या महामारीत आणि बेरोजगारीत खूप जणांची आयुष्यं तग धरू शकली आहेत. मुलाखतीत सहभागी झालेल्या १५ पैकी ३ लोक फरलोचे लाभार्थी आहेत. हा उपक्रम पुढच्या वर्षापर्यंत वाढवावा असा लोक आग्रह करत आहेत. परंतु ह्या पैशाची भरपाई कर भरणाऱ्या नागरिकांच्या खिशातून होणार म्हणून कर भरणाऱ्या नागरिकांमध्ये स्पष्ट नाराजी दिसत आहे. मुलाखतीत सहभागी झालेल्या लोकांच्या 'हे पैसे कोणाच्या तरी पाकिटातून येणार', 'सरकार आता नागरी सुविधा कमी करणार', 'नागरिकांवर विविध कर लादणार!' अशा प्रतिक्रिया या नाराजीला व्यक्त करणाऱ्या होत्या. अर्थात,

कोणाकडेच सध्या ह्या प्रश्नांची उत्तरे नाहीत. परंतु बेकारी आणि गरिबी मोठ्या प्रमाणात वाढेल अशी भाकिते वर्तवली जात आहेत.

## कौटुंबिक हिंसाचार:

मुलाखतीतील सहभागींना कौटुंबिक हिंसाचाराबद्दल प्रश्न विचारले परंतु त्यापैकी कोणीही हिंसाचाराला सामोरे गेलेले नव्हते. कदाचित मी ज्या समूहाशी बोलले ते लोक सुरक्षित, जबाबदार व कमी त्रासलेले खचितच आहेत किंवा त्यांनी घरगुती हिंसाचाराबद्दल चर्चा करणे टाळले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. युकेमधील डोमेस्टिक अब्युज चॅरिटी 'रेफ्युज '(Refuge) ने खातरजमा केलेल्या आकडेवारीनुसार कौटुंबिक हिंसाचाराबद्दल मदत मागणाऱ्या टेलिफोनच्या संख्येमध्ये टाळेबंदीच्या दरम्यान २५ % वाढ झाली आहे. सरकारकडून देखील कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी २४ x ७ सेवा सुरू करण्यात आली आहे.

सरकारतर्फे बरेच उपक्रम लागू करण्यात आले आहेत. युके होम ऑफिसने (गृह कार्यालय) # You are not alone ही ट्वीटर हॅशटॅग मोहीम सुरू केली आहे. साऊथहॉल ब्लॅकसिस्टर्स आणि कम्पॅशन इन पॉलिटीक्स या संस्थांनी हॉटेलच्या साखळ्यांना सहकार्याचे आवाहन केले की त्यांनी कौटुंबिक हिंसाचारांना बळी पडलेल्या स्त्रिया आणि मुले यांच्या राहण्याची सोय करावी. त्यांच्या या निवेदनाला हॉटेल इंडस्ट्रीकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. शासकीय गृहकार्यालयाकडून आणि चॅरिटी संस्थांकडून महिलांमध्ये जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले. होम सेक्रेटरी असणाऱ्या प्रीती पटेल यांनी कौटुंबिक हिंसाचाराचा मुद्दा सोडवण्याची शाश्वती दिली. (The Guardin,2020) कौटुंबिक हिंसाचाराच्या बरोबरीनेच लहान मुलांवरील अत्याचाराच्या प्रश्नाबाबतही मिडियामध्ये बरीच चर्चा सुरू आहे. युकेमधील निम्न स्तरातील बहुतेक मुले शाळेतून मोफत मिळणारे जेवण जेवतात. शाळा बंद असल्यामुळे अशा गरजू मुलांच्या जेवणाची सोय आणि आरोग्य यांचे प्रश्न उभे राहिले आहेत. बऱ्याच स्वयंसेवी संस्था, शाळा आणि सरकारकडून मदत कार्य सुरू आहे. युकेसारख्या प्रगत देशातही अस्तित्वात असलेले अनेक किचकट सामाजिक प्रश्न कोवीड १९ मुळे पृष्ठभागावर आले आहेत, ही बाब दुर्लक्षून चालणार नाही.

## युकेची वैद्यकीय क्षेत्रातील कामगिरी:

वैद्यकीय क्षेत्रात युकेने फार धाडस दाखवले आहे. निव्वळ ९ दिवसांत लंडनमधील एक्झिबिशन सेंटरचे रूपांतर कोवीडसाठी सुसज्ज नाईटेन्गाल इस्पितळात केले गेले. वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी युद्धपातळीवर

पहिल्या फळीत काम करत आहेत. कित्येक डॉक्टर्स , नर्सेस सेवानिवृत्तीनंतरही कामावर रुजू झाले असून अनेक स्वयंसेवक अथक परिश्रम करत आहेत. स्वयंसेवी संस्था सेवा देत आहेत. युनाइटेड किंगडममध्ये समाजसेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सामान्य जनताही एकजुटीने एकमेकांना मदत करते आहे. या काळात अनेक चॅरिटेबल संस्थांनी बरेच उपक्रम राबवले. ह्या अडचणीच्या प्रसंगी नागरिकांनी एकमेकांना खूप मदत केली. तंत्रज्ञानाचा वापर करून लोक एकमेकांशी संपर्क करून गरजवंतांना मदत करत होते. लोकांनी सढळ हस्ते केलेल्या मदतीची नोंद घेणे जरुरीचे आहे. उदाहरण द्यायचे झाले तर टॉम मूर ह्या शंभर वर्षांच्या गृहस्थांनी ३० मिलियन पाऊंड एवढी रक्कम नॅशनल हेल्थसाठी (NHS) गोळा केली. सामुदायिक जीवनाची अनेक उत्तम उदाहरणे समोर आली.

वैद्यकीय कामगिरीबद्दल विचारलेल्या प्रश्नांना मुलाखतीमध्ये मिश्र प्रतिसाद मिळाला. काहींच्या म्हणण्यानुसार नॅशनल हेल्थ सर्व्हिसेसने (NHS) अप्रतिम कामगिरी केली. काहींच्या मते NHS बरेच काही करू शकले असते. NHS चा प्रतिसाद कमी पडला. NHS च्या कर्मचाऱ्यांसाठी संरक्षक साधने कमी पडली. रुग्णांच्या सेवेत दिरंगाई झाली. NHS ने आगाऊ आखणी केली नाही. त्यामुळे बऱ्याच कर्मचाऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले.

मृत्यूमुखी पडलेल्या NHS कर्मचाऱ्यांमध्ये कृष्णवर्णीय आणि वांशिक अल्पसंख्याकांचा मोठा समावेश आहे. या मृत्यूंमुळे NHS मधील वंशवादाला वाचा फुटली आहे. युकेमध्ये वंशवादावर चर्चा आणि संशोधन मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. ह्या वर्गाला युकेमध्ये BAME (Black, Asian and Minority Ethnic) म्हटले जाते. बऱ्याचशा BAME संस्था त्यांच्या हक्कासाठी लढत आहेत. कृष्णवर्णीय आणि वांशिक अल्पसंख्यांकांच्या आरोग्याविषयी बरेच संशोधन झाले आहे. परंतु या समुदायाचा आवाज आणि मते केंद्रस्थानी ठेवून खूप कमी संशोधन झाले आहे.(Stevenson and Rao 2014). एनएचएस कोफेडरेशन रिपोर्ट (The impact of COVID 19 on BAME communities and health and care staff, report 23/04/2020) दर्शवतो की कृष्णवर्णीय व अल्पसंख्याक लोकांमध्ये काही आजार होण्याची संभावना जास्त असते त्यामुळे ह्या समुदायाला कोवीड १९ ची लागण देखील जास्त प्रमाणात झाली आहे. कोफेडरेशन रिपोर्ट दर्शवतो की सामाजिक आणि आर्थिक स्थिती तसेच अगोदर अस्तित्वात असलेले मधुमेह, उच्च रक्तदाब वगैरे आजार यांमुळे BAME समुदायाच्या अनेकांचे कोवीड १९ ने बळी घेतले. मिडियामध्ये देखील BAME समुदायाचे लोक आर्थिक आणि सामाजिक पातळीवर निम्न स्तरावर असतात. एकाच घरात अनेक लोक राहतात आणि म्हणून या समुदायात कोवीड मृत्यूदर अधिक आहे, असा प्रचार झाला आहे. यूकेमधील बऱ्याच रिसर्च संस्था संशोधकांना मोठ्या रिसर्च फंडिंग उपलब्ध करून देत आहेत. ह्या विषयावर अधिक सखोल अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे.

## लस संशोधनात अग्रेसर युके:

वास्तविक पाहता युकेमध्ये टेस्टिंगदेखील इतर युरोपीय देशाच्या मानाने उशिरा सुरू झाली. परंतु मे - जूनमध्ये टेस्टिंगची संख्या वाढवण्यात आली. कौटुंबिक तपासणीचे किटदेखील उपलब्ध करून देण्यात आले. थोडक्यात, युकेसारखा प्रगत देश आपत्तीसाठी तयार नव्हता हाच नागरिकांचा सूर आहे. परंतु कोवीड १९ वर मात करणारी लस बनवण्यात युके अग्रेसर आहे,ही कौतुकास्पद बाब आहे. लस बनवण्याचे तंत्र विकसित करण्याचे संशोधन, व्यवस्थापन व निर्मितीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. खाजगी व सरकारी संस्था एकत्र काम करत आहेत. येत्या नवीन वर्षात ऑक्सफर्ड व्हॅक्सिन ग्रुप आणि अस्त्रझेनचा (Astrazenca) मिळून २,०००,००० (दोन दशलक्ष) डोसेस तयार करतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. जगाचे डोळे ऑक्सफर्ड व्हॅक्सिनवर लागले आहेत. अशाप्रकारे जगातील ज्ञान आणि संशोधनक्षेत्रातील आपला दबदबा युकेने अबाधित ठेवला आहे.

## निष्कर्ष:

ह्या शोधनिबंधात आपण युनाइटेड किंगडमने कोरोनाला कसा प्रतिसाद दिला, कोरोनाचा युनाइटेड किंगडमच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीवर कसा परिणाम झाला, नागरिकांचे कोरोना आणि त्याच्या अवती-भवती घडणाऱ्या गोष्टींबद्दल काय मत होते, या मुद्द्यांचा ऊहापोह केला,त्यानुसार हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील -

कोविड १९ ला प्रतिसाद देताना युनाइटेड किंगडमचे सरकार, वैज्ञानिक आणि नागरी स्वास्थ्य सेवा यांच्याकडून दिरंगाई झाली पण आपली चूक लक्षात आल्यावर ती वेळीच सुधारल्याने बऱ्याच आघाड्यांवर चित्र पालटले. तातडीने स्वास्थ्यसेवा वाढवण्यात आल्या. वैद्यकीय कर्मचाऱ्यांना पीपीई किट उपलब्ध करून दिले गेले. कोवीडच्या तपासण्या गतीने सुरू झाल्या आणि दिवसागणिक त्यांच्या संख्येत वाढ झाली.

अर्थव्यवस्था आणि नागरी व्यवस्था टिकावी ह्यासाठी बरेच प्रयत्न केले गेले. सर्व राजकीय पक्ष, सरकारी संस्था, खाजगी संस्था तसेच सेवाभावी संस्थांनी एकत्र येऊन कोवीड १९ चा सामना करण्याचा प्रयत्न केला. अर्थात ह्या प्रयत्नांत काही त्रुटी राहिल्या आहेत.

या काळात वंशभेद आणि वंशवाद, कौटुंबिक हिंसाचार, गरिबी, बेरोजगारी असे सामाजिक प्रश्न किती टोकदार आहेत, हे दिसून आले. लसीकरण, आर्थिक मंदीवरचे उपाय, भविष्यकालीन योजना आदी संदर्भांतील प्रश्न अजून अनुत्तरित आहेत. त्यामुळे कोविड १९ च्या संकटातून बाहेर येण्याचा मार्ग कठीण

असला तरी दुसरीकडे माणुसकी, सेवाभाव आणि सामुदायिक जीवन ह्याची उत्तम उदाहरणे जगासमोर आली आहेत. त्यामुळे आपण एकत्र प्रयत्न केले तर कोवीड १९ च्या संकटातून लवकर बाहेर पडू, अशी खात्री बाळगता येते.

## टीप :

**मुलाखतींसंदर्भातील पद्धत :** शोधकार्यात सहभागी झालेल्या सभासदांना हे शोधकार्य कशाबद्दल आहे आणि त्याची आवश्यकता का आहे ह्याबद्दल सांगितले गेले. संशोधकाने स्वतःचा अल्पपरिचय दिला. सहभागी सदस्यांची नावे व इतर माहिती गुप्त ठेवण्याची हमी दिली. शोधकार्यातील सहभाग हा ऐच्छिक होता. ह्या संशोधनात कोणावरही कोणतेच दडपण किंवा दबाव टाकलेला नाही. जर सहभागींना एखाद्या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे नसल्यास किंवा मुलाखतीच्या या प्रक्रियेतून बाहेर पडायचे असल्यास तशी मुभा देण्यात आली होती. प्रश्नांची उत्तरे हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध असून मुलाखतींचे कागद इतर कोणत्याही व्यक्तीच्या हातात पडणार नाहीत ह्याची खबरदारी घेण्यात आली. ह्या शोधात कोणत्याही व्यक्तीला मानसिक किंवा शारीरिक त्रास होणार नाही याचीही विशेष खबरदारी घेतली गेली.

## संदर्भ:

### Reports:

1. Business Impact of Coronavirus (COVID 19) Survey (BICS) results: 23 March to 5 April, Responses from the new voluntary fortnightly business survey. (Which captures businesses responses on how their turnover, workforce prices, trade and business resilience have been affected in the two week reference period)

2. Coronavirus and the Social impacts on Great Britain: 7August 2020. Office for National Statistics

3. Stevenson, J and Rao, M (2014): 'Explaining levels of wellbeing in Black and Minority Ethnic population in England', Institute of Health and Human Development, University of East London, London.

4. Word Health Organisation (2020) various health reports and updates referred in the month of July and August.

## Research Journal:


1. Davis, J (2020) : 'Pandemic and the consequences of COVID 19', *Economic Affairs*, vol. 40, p.131-137.

2. Pears, H (2020) : 'Deliberation, Citizen Science and Covid 19', *The political Quarterly*, published by John Wiley & Sons, Uk.

3. Timmis, K and Brussow, H (2020) : 'The COVID 19 pandemic : some lessons learned about crisis preparedness and management, and the need for international benchmarking to reduce conflicts.', *Environmental Microbiology* , vol. 22 (Article No-6), p. 1986-1996.


## Websites:


1. *The Guardian news papers*, Saturday 11 April 2020, https://www.theguardian.com, *Retrived on 17th Aug 2020*.

2. *The impact of COVID 19 on BME communities and health and care staff*, report 23 April 2020.

3. https://www.nhsconfed.org, Retrived on 15th July 2020

4. https://news.sky.com, Monday, 4 May 2020, Retrived on 17th July 2020.


## Guidelines :


1. Social Research Association (2003) Ethical Guidelines (online)

# साथ महिमा : करोना व्हायरस आणि ब्रिटन

**शैलेन भांडारे**

अधीक्षक
प्राच्य-नाणक-संग्रह
ॲशमोलियन संग्रहालय
ऑक्सफर्ड विद्यापीठ
shailen10@hotmail.com

‘महासाथ’ म्हणजे काय, याच्या अनुभवातून सगळे जग गेले सहा महिने जात आहे. अशा प्रसंगात वेगवेगळ्या देशांत (किंवा देश अथवा राष्ट्र म्हणण्यापेक्षा जनसमूहांत) या साथीचे परिणाम काय झाले, त्यांनी या साथीला प्रतिसाद कसा दिला आणि आता साथ एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपली असता पुढचे काही महिने यात कसकसा बदल घडवून आणला जाईल, त्यासंबंधाने आपत्ती, धोरण, राजकारण आणि समाजकारण अशा सगळ्याच दृष्टिकोणांतून बघणे रोचक ठरते. विशेषतः शिक्षण आणि संशोधन या दोन बाबींवर या साथीचे गेल्या सहा महिन्यांत काय परिणाम झाले, त्याबद्दलही वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून माहिती वाचायला आणि अभ्यासायला मिळणे हेही महत्त्वाचे आहे. अशा दृष्टिकोणातून ब्रिटनमध्ये गेल्या सहा महिन्यांत या बाबतीत काय काय घडले, हे सांगायचा हा एक मर्यादित प्रयत्न आहे. या लेखाचे चार भाग आहेत - त्यातला पहिला भाग वैयक्तिक अनुभवावर आधारित आहे आणि पुढचे भाग अनुक्रमे समाजकारण, राजकारण आणि शिक्षण/संशोधन याकडे दृष्टिक्षेप टाकणारे आहेत. मी जगप्रसिद्ध अशा ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात गेली सुमारे वीस वर्षे काम करतो. माझे काम विश्वविद्यालयाच्या संग्रहालयात (जे जगातले सगळ्यात जुने ‘पब्लिक म्युझियम’ आहे) असल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच ‘आम’ जनतेशीही आमचा संबंध येतो. किंबहुना प्राचीन रोमन देव ‘जेनस’प्रमाणे आमचे म्युझियमही ‘द्विमुखी’ आहे - एक तोंड आमचे विद्यार्थी आणि त्यांचा शिक्षणक्रम किंवा संशोधन यांच्याकडे वळलेले असते तर दुसरे तोंड हे म्युझियम बघायला म्हणून येणाऱ्या आस्वादक आणि अभ्यासक प्रवृत्तीच्या लोकांकडे. अर्थात, या दोन प्रेक्षकवर्गात सामायिक घटक असतातच. पण यामुळे आमच्या कामाचे स्वरूप हे इतर विश्वविद्यालयात काम करणाऱ्या लोकांपेक्षा थोडे वेगळे राहिलेले आहे.

## साथ आणि ब्रिटन : कालपट

चीनमधल्या वूहान शहरात एका चमत्कारिक 'न्यूमोनिया' निर्माण करणाऱ्या विषाणूमुळे लोक आजारी पडू लागले ते २०१९च्या डिसेंबर महिन्यात. हा विषाणू 'करोनाव्हायरस' प्रकारातला होता आणि तो 'झूओनॉटिक' म्हणजेच एका प्राणी-प्रजातीतून दुसऱ्या प्रजातीत संक्रमित होऊ शकणारा होता. मानव प्रजातीत याआधी अशा विषाणूचा संसर्ग झालेला नव्हता, सबब मानवांना अशा विषाणूंपासून संसर्ग झाल्यानंतर जी नैसर्गिक प्रतिकारशक्ती मिळते ती उपलब्ध झालेली नव्हती. तेव्हा मानवजात या विषाणूच्या 'आक्रमणा'पुढे नैसर्गिकरीत्या हतबल होती आणि आहे. हा या विषाणूचा सगळ्यात भयंकर गुणधर्म म्हणायला हरकत नाही. पण याबरोबरच हा विषाणू वेगवेगळ्या प्रकारे 'लपंडाव' खेळू शकतो हेही महत्त्वाचे आहे. याचा संसर्ग ज्यांना होतो, ते सगळेच लोक सारख्याच प्रकारच्या आणि तीव्रतेच्या लक्षणांनी ग्रासले जात नाहीत. काहींच्या शरीरात प्रतिकारशक्तीचे 'वादळ' निर्माण होऊन ते त्या वादळालाच बळी पडतात तर काहींना न्यूमोनियासारखे दुसरे संसर्ग होऊन एकंदरीतच त्यांचे शरीर या 'संसर्ग-कल्लोळा'पुढे टिकाव धरू शकत नाही. पण असेही अनेक लोक आहेत (विशेषतः तरुण आणि बाल वयोगटातले) की ज्यांना या विषाणूमुळे विशेष काही आजारपण येत नाही. पण ते स्वतः आजारी पडले नाहीत तरी त्यांची संसर्गक्षमता मात्र कमी झालेली नसते - त्यांच्यापासून इतरेजनांना संसर्ग होऊ शकतो. संसर्ग, रोग आणि मृत्यू यांचे विश्लेषण केले असता असे चित्र दिसते की, वयोमानपरत्वे संसर्गाचे धोकादायक परिणाम अधिक वाढत जातात. वाढत्या वयातले मधुमेह, रक्तदाब किंवा तत्सम आजार ज्यांना आहेत अशा रुग्णांसाठी रोगाचा धोका अधिक असतो.

करोना किंवा अशा प्रकारची साथ येते तेव्हा आरोग्यसेवेवर एक वेगळ्या प्रकारचा ताण पडायला लागतो. कारण संसर्गाच्या वाढीचा दर घातांकवत वाढायला लागतो आणि या सगळ्या रुग्णांना एकच रोग झाला असल्यामुळे त्यांना सर्वसाधारणतः एकाच प्रकारची उपचारपद्धती लागू पडते. जगातल्या कुठल्याही, अगदी अतिप्रगत अशा देशांतही अशी परिस्थिती उद्भवली तर आरोग्यसेवा कोलमडून पडू शकते; कारण उपचारपद्धतीची उपलब्धी आणि रुग्णांची संख्यात्मक वाढ यांचे गणित अगदी सहज चुकते आणि चुकत जाते. ब्रिटनमध्ये हा भाग अतिशय महत्त्वाचा होता कारण ब्रिटनमध्ये आरोग्यसेवा ही पूर्णपणे राष्ट्रीयीकृत आहे. आम्ही नागरिक आमच्या उत्पन्नाचा एक हिस्सा दर वर्षी 'नॅशनल इन्श्युरन्स' या नावाखाली सरकारकडे भरतो. या करातून सरकार आरोग्यसेवा पुरवते. अर्थात, ज्यांना परवडते ते खाजगी प्रकारेही उपचार घेऊ शकतात, पण ते अपवादात्मक आहे. बहुसंख्य जनता आरोग्यसेवेसाठी सरकार-पुरस्कृत 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस' उर्फ 'एनएचएस'वर अवलंबून असते.

ब्रिटनमध्ये करोनाव्हायरसपासून होणाऱ्या ‘कोव्हिड-१९’ या रोगाच्या पहिल्या केसेस २९ जानेवारीला उघडकीस आल्या. हे दोन रुग्ण चिनी प्रवासी होते. तेव्हापासूनच हा रोग ब्रिटनच्या ‘आरोग्य-रडार’वर अवतरला. हळूहळू केसेस वाढायला लागून पहिले दोन मृत्यू ५ मार्च रोजी नोंदले गेले. सुरुवातीला सरकारचे धोरण ही साथ ‘सौम्य’ करण्याकडे झुकणारे होते. अशा धोरणामुळे संसर्ग वेगाने झाला तरी प्रतिकारशक्ती वाढीस लागून साथ आवाक्यात राहील असे मत प्रबळ होते. पण मार्च महिन्यातच या धोरणावर टीका करणारे अहवाल काही शास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केले. या रोगाची संसर्गशीलता खूपच तीव्र असून केवळ सौम्यतेच्या धोरणामुळे सुमारे अडीच लाख मृत्यू होतील आणि मुख्य म्हणजे एनएचएसवर याचा गंभीर परिणाम होऊन पूर्ण आरोग्यसेवा कोलमडेल असे या टीकाकारांचे म्हणणे होते. या अहवाल टीकेमुळे आणि युरोपमध्ये इटली, स्पेन या दोन देशांत या रोगाने माजवलेला हाहाःकार पाहून सरकारचे आरोग्यधोरण साथ ‘सौम्यते’कडून साथीचा पूर्ण ‘अवरोध’ करण्याकडे एका आठवड्यात वेगाने झुकले. २३ मार्चला पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले. त्यात त्यांनी ‘लॉकडाऊन’ या आता सुपरिचित झालेल्या शब्दाचा थेट उच्चार न करता, 'Stay home, Protect the NHS, Save Lives' या घोषणेच्या द्वारे जनतेच्या भ्रमणस्वातंत्र्यावर निर्बंध आणणारे उपाय सुचवले. पण इथेही, इतर देशांत हे उपाय कसे योजले गेले त्यापेक्षा काही ठळक फरक होते. मुख्य म्हणजे अत्यावश्यक सेवांचे पुरवठामार्ग चालू राहावेत म्हणून कित्येक उद्योग या घोषणेतून वगळले गेले होते. भविष्यात अधिक कडक निर्बंध आणावे लागले तर अशा निर्बंधांना कंटाळून ते मोडण्याकडे लोकांची प्रवृत्ती होईल हे लक्षात घेता, जनतेला दिवसातून एकदा एक तास, कोणाशीही संपर्क न राखता, व्यायामासाठी घराबाहेर पडण्याची मुभा देण्यात आली. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही कमी प्रमाणात का होईना पण चालू ठेवण्यात आली. युरोपात अनेक देशांनी त्यांच्या सीमा बंद केल्या होत्या, पण ब्रिटनच्या सीमा मात्र पूर्णपणे बंद झाल्या नाहीत. सुपरमार्केट्ससुद्धा चालू राहिली. हे निर्बंध आणण्याच्या आधीच सरकारने रोज संध्याकाळी एक पत्रकार परिषद घेऊन पारदर्शक आणि सार्वजनिकरीत्या या साथीशी मुकाबला करण्याचे सरकारचे काय काय प्रयत्न असणार आहेत ते सांगण्याचा नेम सुरू केला होता. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात पार्लमेंटच्या काही सदस्यांना विषाणूबाधा झाल्याचे उघडकीस आले आणि २८ मार्चला खुद्द पंतप्रधान जॉन्सन, तसेच प्रिन्स चार्ल्स अशा अति-उच्चपदस्थ लोकांनाही संसर्ग झाला असल्याचे जाहीर झाले. जॉन्सन यांची प्रकृती नंतर काही दिवसांतच खूप खालावली आणि त्यांना हॉस्पिटल - आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. पण सुदैवाने, त्यांना दिलेल्या ऑक्सिजन थेरपीला प्रतिसाद मिळाला आणि सुमारे तीन आठवड्यांच्या विलगीकरणानंतर ते पुनश्च कामावर रुजू झाले.

हे तीन आठवडे साथीच्या तीव्रतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. सांख्यिकी प्रारूपांवरून असे दिसून येत होते की साथीचा उच्चांक एप्रिल महिन्याच्या मध्यावर येणार होता. आता मृत्यूच्या संख्येत झपाट्याने

वाढ व्हायला लागली होती आणि संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या त्याहीपेक्षा अधिक वेगाने वाढत होती. एनएचएसवर ताण येऊ नये म्हणून कामचलाऊ हॉस्पिटले उभारण्यात आली. प्रतिकारात्मक कपडे आणि इतर सामुग्री यांचा तुटवडा पडू नये म्हणून जय्यत तयारी करण्यात आली. एप्रिलच्या मध्यावर दिवसाला हजाराच्या वर लोकांचे मृत्यू नोंदवण्यात येत होते, पण 'लॉकडाऊन'च्या उपायांचे पडसादही हळूहळू दृष्टीस येऊ लागले होते. साधारणतः एप्रिलच्या वीस तारखेपासून मृत्यूंच्या आणि नवीन लागणीच्या संख्येत हळूहळू घट होऊ लागली. एनएचएस हे आव्हान अखेरीस जिंकत आहे असेही हळूहळू दिसू लागले. म्हणजे सेवेवर अनन्यसाधारण ताण आला हे जरी खरे असले तरी सेवा पूर्णपणे कोलमडून पडली नाही हेही तितकेच खरे होते. आहेत ती हॉस्पिटल्स पुरी न पडल्यामुळे कामचलाऊ हॉस्पिटल्समध्ये रुग्णभरती होण्याची वेळ अगदी अपवादात्मक संख्येतच आली. मे महिना उजाडला तेव्हा ब्रिटनमधल्या मृत्युसंख्येने युरोपात उच्चांक गाठला, पण त्याचबरोबर साथीच्या लाटेचे 'शिखर' लॉकडाऊनच्या उपायांमुळे पार पडून साथ उतरणीला लागल्याचेही दिसू लागले. १० मे रोजी बोरिस जॉन्सन यांनी लॉकडाऊनच्या नियमांत थोडी सूट जाहीर केली. जून महिन्यात केवळ दोन घरांतील व्यक्तींनी एकमेकांकडे जाणे-येणे-राहणे, तसेच विलगीकरणाच्या मर्यादा पाळून आठपर्यंत लोकांनी एकत्र भेटणे या गोष्टी करायला सूट देण्यात आली. जुलै महिन्यात बहुतांश दुकाने, रेस्टॉरंट्स आणि सार्वजनिक व्यायामशाळा किंवा सार्वजनिक मदिरागृहे (पब्स) उघडायला सुरुवात झाली. अर्थात या सगळ्या संपर्कजन्यतेतून पुन्हा संसर्ग वाढीस लागण्याची शक्यता आहेच, पण आता ठिकठिकाणी उपलब्ध असलेल्या निर्जंतुकीकरणाच्या (Disinfectant / Disinfection) सोयी, दुकाने किंवा सुपरमार्केट्ससारख्या 'अंतर्गेही' (indoor) ठिकाणी तोंडावर आच्छादन घालण्याची अनिवार्यता, आणि त्याचबरोबर विलगीकरण अशा काही नियमांद्वारे हा संसर्ग पूर्वीइतक्या तीव्रतेने पसरणार नाही अशीही अपेक्षा निर्माण झाली आहे.

## साथ आणि ब्रिटीश समाज

प्रत्येक देशातल्या जनतेची आणि समाजाची काही सांस्कृतिक आणि सामाजिक वैशिष्ट्ये असतात. परंपरा, इतिहास, संस्कृती, धार्मिक धारणा, अशा वेगवेगळ्या थरांतून ही वैशिष्ट्ये घडत असतात आणि त्यातून 'समाजमन' तयार होत असते. ब्रिटीश समाजमनाचीही काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. वर्गभावना हे त्यातले एक ठळक वैशिष्ट्य आहे. त्यात भारतीय समाजातून ठळकपणे दिसणाऱ्या जातिभावनेला अनुरूप अशा काही बाबी दिसत असल्याने भारतीय नजरेतून ब्रिटीश समाजाचे निरीक्षण करणे हे अनेक वेळा मनोरंजक ठरते. अर्थातच, या वर्गभावनेला प्रत्यक्ष सामाजिक घडामोडींत काही कोणी झुकते माप देत नाही किंवा तिचे 'पालन' करत नाही. पण तरीही, अनेक सुप्त प्रवाहांतून ही वर्गभावना कार्यरत असते. अमुक एका वर्गातले

लोक बोलतात कसे, विचार कसे करतात, खातात काय, वागतात कसे याचे अगदी निश्चित असे नसले तरी काही निरीक्षणीय मापदंड (किंवा मानदंड) दिसून येतात. याचा आणि करोनाव्हायरस साथीचा संबंध काय असा प्रश्न कोणाच्या मनात उद्भवेल. पण समाजमन हे अशाच बाबींतून घडत असते. ब्रिटीश समाजमनाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आपल्यावर बेतलेल्या कुठल्याही गोष्टीकडे 'अवडंबर' किंवा 'अडचण' म्हणून न पाहण्याची आणि तिचा उगीच गवगवा न करण्याची वृत्ती. अवचित येणाऱ्या अडचणींना सामोरे जायचे, त्या 'सहन' करायच्या आणि त्यांच्यातून पार पडायचे, उगीच हायहुय करणे, अडचणींची वाच्यता करणे, त्यामुळे इतर लोकांमध्ये विनाकारण कुतूहल किंवा गैरसोय उत्पन्न होईल, असे काही करायचे नाही ही वागणूक या वृत्तीचे निदर्शक आहे. या वृत्तीला 'स्टिफ अपर लिप' म्हणजे एक प्रकारचे निर्धारात्मक किंवा निग्रहात्मक वागणे असा एक गोड शब्द आहे. या वागणुकीचा एक परिणाम म्हणजे ब्रिटीश जनता सहसा आजारांना भीक घालत नाही! सर्दी, पडसे, फ्लू असे नेहमीचे संसर्गजन्य रोग कमीजास्त प्रमाणात झाले तरी ते अंगावरच काढायचे, सहसा डॉक्टरकडे जायचे नाही, आजारी असले तरी कामावर जायचे, सुटी घ्यायची नाही, अशी एक सर्वसाधारण प्रवृत्ती जनतेत फार आढळते. अनेकदा असेही दिसून येते की, त्यामुळे अशा संसर्गजन्य रोगांच्या साथी चटकन फैलावतात. हिवाळ्यात नेमेची येणारी 'विंटर फ्लू'ची साथ हे याचे चांगले उदाहरण. त्यासाठी म्हाताऱ्या आणि/किंवा इतर कारणांमुळे फ्लूसारख्या रोगांपुढे चटकन नांगी टाकू शकतील अशा लोकांना एनएचएसतर्फे दरवर्षी हिवाळा सुरू होण्याआधी फ्लूची लस देण्यात येते, पण तरीही फ्लू-जन्य कारणांनी दरवर्षी पंधरा ते वीस हजार बळी पडतात.

साधेसुधे आजार अंगावरच काढायचे, अशी धारणा असलेल्या समाजात 'विलगीकरण' आणि तत्सम संपर्क कमी करण्याच्या उपायांचा प्रसार करणे हे बरेच कठीण काम होते. पण लोकांचा एक गुण असाही आहे की, ते कुठलीही बाब कायदेशीर झाली की तिचे पालन लगेच करतात. त्यामुळे जोपर्यंत सरकारने केवळ सल्ला दिला होता परंतु आदेश काढला नव्हता, तोपर्यंत सरकारच्या या सल्ल्याकडे थोडेबहुत दुर्लक्ष करणारे लोक दिसत – पण सरकारने कायद्याने जशी बंदी आणली तसे बहुसंख्य लोक निमूटपणे पालन करू लागले. कारण 'निर्बंधात्मक' (mandatory) आणि 'सूचनात्मक' (advisory) अशा आदेशांतला फरक लोकांना चांगला कळतो. दुसरे म्हणजे एकदा सरकारची भूमिका 'निर्बंधात्मक' झाली की निर्बंध मोडण्याबरोबरच दंड – अनेकदा पैशांच्या रूपातला आणि चांगला घवघवीतसुद्धा आलाच आणि त्याच्या कचाट्यातून सुटणे हे सहज शक्य नसते. या सगळ्या कारणांमुळे जेव्हा 'लॉकडाऊन' घोषित झाला तेव्हा ते निर्बंध पाळण्याकडे लोकांची वृत्ती अधिक होती.

तरीही, सुरुवातीच्या काळात जनता पुष्कळ भांबावली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'तारांबळ खरेदी' किंवा 'panic buying'! मार्च महिन्याच्या अंताला आम्ही सगळ्यांनीच याचा भरपूर अनुभव घेतला. पहिले

दोनेक दिवस माझ्या नेहमीच्या सुपरमार्केटमध्ये अक्षरशः बॉम्ब पडल्यासारखे दृश्य दिसत होते. तिथे प्रवेश केल्याबरोबर सुमारे १५० x १५० फुटाचा मोठा 'फ्रेश फूड हॉल' आहे – भाज्या, फळे, सॅलड वगैरे आम्ही इथून उचलतो आणि ट्रॉलीत टाकतो. याच्यापलीकडे साधारण तेवढ्याच आकारात वातानुकुलित 'मीट आईल्स' म्हणजे ताजे मांस उपलब्ध असण्याचा विभाग आहे. हे दोन्ही भाग पूर्णपणे रिकामे झाले होते! एक बटाटासुद्धा उपलब्ध नव्हता. पास्ता, पाव आणि कॅनबंद पदार्थांवर लोकांची पुढची धाड पडली होती. ताज्या भाज्या, मासे आणि मांस यांच्याबरोबरच कोरडे आणि टिकाऊ अन्नपदार्थही लुप्तप्राय झाले होते. निर्जंतुकीकरणाची साधने हा तिसरा प्रकार – हीसुद्धा गायब झाली होती. पण सगळ्यात चमत्कारिक म्हणजे लोकांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केलेली टॉयलेट पेपरची लूट! या खरेदीला 'तारांबळी'खेरीज अन्य काहीही कारण नव्हते. मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास प्रचंड मोठी आपदा येते तेव्हा अशा लहानसहान गोष्टींतून जगण्यातली शाश्वतता माणूस शोधत असतो, या तत्त्वाचे दृश्यरूपच आम्ही बघत होतो.

लोकांचा हा प्रतिसाद बघून लगेचच सुपरमार्केट व्यवस्थापनाने अनेक गोष्टींच्या विक्रीवर निर्बंध आणले. काही गोष्टी माणशी एका ठरावीक संख्येतच खरेदी करण्यात येतील अशी सोय चेकआउट काउंटर्सवर करण्यात आली. त्यामुळे एका आठवड्यातच पुष्कळशा वस्तू पुन्हा व्यवस्थित उपलब्ध झाल्या. पास्ता, पाव आणि गव्हाचे पीठ यांची थोडीबहुत टंचाई मात्र आणखी काही दिवस चालू राहिली. याचे एक कारण असेही होते की, बराचसा पास्ता इटलीतून आयात होतो आणि तिथे परिस्थिती फारच गंभीर झाल्याने अगदी कडक लॉकडाऊन बजावण्यात येत होता. दुसरे म्हणजे लोकांना घरबसल्या काहीतरी उद्योग म्हणून पाव तयार करण्याचे वेध लागले होते, सबब पिठाचा तुटवडा झाला होता. पण ही परिस्थितीसुद्धा सुमारे महिन्याभरात सुधारली. मुळात पुरवठ्याच्या साखळ्या शाबूत राहिलेल्या होत्या, तिथे काही उणीव उत्पन्न होऊ नये म्हणून सरकारने जे अपवाद केले होते, त्यामुळे त्यांच्यावर काही वाईट परिणाम झाला नाही आणि लोकांकडून जो अचानक मागणीचा कल्लोळ उठला होता तोही शांत झाला. म्हणून ही परिस्थिती लवकरच सुधारली.

आजारांना भीक घालायची नाही असे ब्रिटीश समाजमनाचे एक लक्षण वर सांगितलेच. त्याचबरोबर दुसरे एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे 'सामुदायिक उत्तरदायित्वा'ची वृत्ती. ख्रिश्चन धर्म हा मुळातच एक 'सांघिक' धर्म आहे – चर्च या शब्दाचा अर्थ 'समुदाय', किंवा विशिष्ट धर्मकल्पनांनी आणि हेतूंनी प्रेरित होऊन एकत्र आलेला आणि एकमेकांशी संबंधित असलेला मानवसमूह असा होतो. आधुनिक ब्रिटनमध्ये रूढार्थाने 'ख्रिश्चन' असलेले, म्हणजेच धर्मपालनाची सगळी तत्त्वे पाळणारे असे लोक फारच कमी असतील – पण तरीही, समाजमनाच्या तळाशी 'आपण सगळे एका हेतूने एकत्र आलेला समुदाय आहोत' हे तत्त्व खोलवर रुजलेले आहे. इतर वेळेला आपल्या शेजारी कोण राहते आहे, त्याची नावनिशाणीही माहीत नसलेले लोक

अशा आपत्तीच्या काळात त्याचमुळे सहज एकत्र येऊ शकतात. 'शेजाऱ्यांवर प्रेम करा' हे अशा वेळी केवळ बायबलमधले वचन उरत नाही. ते प्रत्यक्षात येते. याची अनेक हृद्य उदाहरणे या काळात पाहायला मिळाली. सामाजिक स्थितीमुळे वृद्ध माणसांनी एकेकटे राहायचे प्रमाण या देशात खूपच आहे. कुटुंबसदस्य (असलेच तर) क्वचित येऊन-जाऊन आणि लक्ष ठेवून असतात. लॉकडाऊनच्या सुरुवातीच्या काळात अशा अनेक वृद्धांचा मानसिक आणि प्रात्यक्षिक आधार तुटला. फोन किंवा तत्सम साधनांव्यतिरिक्त आप्तेष्टांशी संबंध राहिला नाही. अशा वेळी त्यांच्या शेजाऱ्यांनी त्यांना दिलेला आधार अतिशय महत्त्वाचा होता. त्यातच सरकारी सल्ल्यानुसार वृद्ध आणि अतिवृद्ध लोकांनी स्वतःला बाहेरच्या जगापासून साफ विलग करावे, घराबाहेर अजिबात पडू नये, असेही सांगण्यात आले होते. त्यांना त्यांची नेहमीची खरेदी वगैरे आणून देण्याची जबाबदारी कित्येक ठिकाणी शेजारीपाजारी लोकांनी उचलली.

साथ आणि समाजाचा एक महत्त्वाचा सांधा म्हणजे 'आपण सगळे या प्रसंगात बरोबरीने आहोत' (We are all in it together) ही भावना आणि त्या भावनेपोटी येणारी सहानुभूती. वर म्हटल्याप्रमाणे एनएचएस ही आरोग्यसेवा या साथीविरुद्धच्या युद्धात 'आघाडी' घेऊन होती आणि ती कोलमडून जाऊ नये, हे बघणे सरकारचे आदिकर्तव्य होते. पण त्याचबरोबर प्राथमिक आरोग्यकेंद्रे आणि डॉक्टरांचे दवाखाने हेच या साथीच्या पसरण्याची केंद्रे बनतील याची शक्यताही खूप होती. डॉक्टरांवर किंवा घरी येऊन सेवा देणाऱ्या नर्सिंग स्टाफवर पराकाष्ठेचा ताण येणे स्वाभाविक होते. माझी एक जवळची मैत्रीण इंद्रियांचे आरोपण करणाऱ्या शस्त्रक्रिया सांभाळणारी नर्स आहे. तिला तिचे नेहमीचे काम सोडून करोनाविरोधी नर्सिंगच्या कामात सामील व्हावे लागले. साथीचे आणि मृत्यूंचे शिखर गाठण्याच्या काळात तिने आयसीयूमध्ये काम केले आणि तिथे होणाऱ्या घडामोडी, मृत्यू इत्यादींच्या तिच्या स्वतःच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ लागला. तो इतका वाढला की ती एकदा ड्युटीवर जात असताना रस्त्यावर तिच्या गाडीचा अपघात होता होता ती वाचली! त्यावेळी तिला एनएचएसकडून मिळालेले साहाय्य प्रशंसनीय होते. तिला लगेच तिच्या कामाचे तास कमी करून मिळाले, आणि तिच्या वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार मानसोपचारतज्ज्ञांकडून तिला समुपदेशन देण्यात आले. त्याचा चांगला परिणाम झाला आणि तिला पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी आत्मबळ मिळाले. एनएचएसबद्दल लोकांची सहानुभूतीही या महिन्यांत पुष्कळ वाढली. डॉक्टर्स, इतर हॉस्पिटल स्टाफ तसेच वयस्कर लोकांची काळजी घेणाऱ्या लोकांसाठी सुपरमार्केट्स आम जनतेला उघडायच्या आधी सकाळी दीड तास राखीव वेळ ठेवण्यात आली. दर गुरुवारी संध्याकाळी आठ वाजता आपापल्या घराबाहेर येऊन टाळ्या वाजवण्याची एक रूढीही या दिवसात पाळण्यात येऊ लागली. पंतप्रधानांचे निवासस्थान या वेळेला निळ्या रंगात (एनएचएसचा ब्रँडरंग) उजळून काढण्यात येई. कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच या कृतीतून सामुदायिक सहभावना वाढण्याचे कामही होत असे. पंतप्रधान जॉन्सन

यांना याच काळात पुत्ररत्न झाले. त्याचे नावही त्यांनी त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर्सची नावे एकत्र गुंफून ठेवले!

परंतु कुठल्याच समाजात सगळे आलबेल कधीच नसते. सदोष किंवा अपकार्यिक (dysfunctional) कुटुंबांचे प्रमाणही ब्रिटीश समाजात पुष्कळ आहे. व्यसनी किंवा मनोरुग्ण जोडीदार, कौटुंबिक कलह, कलुषित परस्परसंबंध, त्यांतून उद्भवणारे ताणतणाव, प्रसंगी उफाळून येणारी हिंसा आणि या सगळ्याला पूरक अशी गरिबी किंवा बेरोजगारी, अशा बाबीही सामाजिक रंगपटलात अपरिहार्यपणे वावरतातच. अशा गुंतागुंतीमध्ये अडकलेल्या आणि त्यातून उभे राहणारे कठीण प्रसंग पार पाडायला लागणाऱ्या लोकांचाही एक वर्ग इथल्या समाजात आहे. अशा लोकांना नॉर्मल काळात मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या तग धरता यावा, मदत मिळावी म्हणून अनेक संस्था कार्यरत असतात. मानसिक संतुलन ढळलेल्या किंवा जोडीदारांशी तीव्र तणाव उभे राहिलेल्या लोकांना, किंवा त्यांच्या मुलाबाळांना अशा परिस्थितीतून तात्पुरते विलग करून त्यांची सोय इतरत्र करणाऱ्या संस्था आहेत, तसेच घरी येऊन मानसोपचार किंवा कुटुंबकल्याण उपदेशन देणाऱ्या संस्थाही आहेत. या सगळ्या संस्थांचे कार्य लॉकडाऊनच्या परिस्थितीमुळे पूर्णपणे कोलमडून पडले! कारण संपर्क हेच जिथे परिस्थिती सांभाळण्याचे मुख्य साधन, तिथे तो बंद झाल्याने पुढचे काही करता येणे शक्य नव्हते. फोनवरून संपर्क ठेवणे शक्य होते पण त्याची तुलना अर्थातच प्रत्यक्ष संपर्काशी करता येत नाही. अशा दुःखदायक परिस्थितीत अडकलेल्या माणसांपुढे मग आहे त्याच परिस्थितीत राहण्याखेरीज गत्यंतर नव्हते. याचा गंभीर परिणाम सामाजिक संतुलनावर झाला. एप्रिल महिन्यात घरगुती / कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी पोलिसांकडे जायचे प्रमाण तिपटीने वाढले. लॉकडाऊन सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या तीन आठवड्यातच अशा कारणांमुळे अकरा स्त्रिया, दोन मुले आणि एक पुरुष यांचा मृत्यू झाला. ही वाढ स्तिमित करणारी होती आणि करोनाव्हायरसमुळे एकत्र आलेल्या सामुदायिक, सामाजिक सहानुभूतीला छेद देणारीही होती.

## साथ : राजकारण आणि नेतृत्व

ब्रिटनला या साथीचा फटका एका ऐतिहासिक वळणावर बसत आहे, ही बाब ब्रिटीश राजकारणाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. जगभरचे राजकारण गेल्या दशकभरात वेगाने उजवीकडे झुकले. सामाजिक माध्यमे, त्यातून होणारा प्रचार आणि एकंदरीतच 'डिजिटल' जीवनशैलीकडे झालेली जगाची वाटचाल यातून विदाकेंद्री आणि प्रचारकेंद्री उजव्या राजकारणाचा प्रभाव जगात या दशकात पुष्कळच वाढला. सामाजिक ध्रुवीकरण आणि त्यातून येणारे (आणि आधीच्या परिस्थितीला आक्रमकरीत्या अधोरेखित करणारे) असंतुलन हा या राजकारणाचा विशेष राहिलेला आहे. २०१९ हे वर्ष ब्रिटीश राजकारणात अभूतपूर्व म्हणता

येईल, अशा घडामोडींनी भारलेले होते आणि त्याच्या मुळाशी २०१६ साली सार्वमतानुसार झालेला ‘ब्रेक्झिट’चा निर्णय होता. टोरी पक्षात या विषयावरून ऐतिहासिक म्हणता येईल अशी दुफळी होती आणि त्या दुफळीला निर्णायक उत्तर सापडून टोरी पक्षातला अंतर्गत कलह संपावा यादृष्टीने तत्कालीन पंतप्रधान डेव्हिड कॅमेरॉन यांनी हा सार्वमताचा निर्णय घेतला. आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या युरोपमधल्या सांघिक प्रयोगाशी जुळवून घ्यायचे की वेगळा मार्ग चोखाळून ब्रिटनचा ‘नियतीशी करार’ वेगळ्या प्रकारे घडवून आणायचा, हा निर्णय या सार्वमताने लागणार होता. सगळ्यांची अटकळ सुरुवातीला हे मत होकारार्थी पडून युरोपशी संबंध चालू राहतील आणि टोरी पक्षातल्या वादविवादांना कायमचा पूर्णविराम मिळेल अशीच होती, पण झाले भलतेच! सार्वमत ‘ब्रेक्झिट’च्या बाजूने झुकले आणि ब्रिटनमधले राजकारण ढवळून निघाले. पंतप्रधान कॅमेरॉन यांनी राजीनामा दिला आणि कारभाराची धुरा टेरेसा मे यांच्याकडे सोपवण्यात आली. पण आता पक्षांतर्गत कलहाने विक्राळ रूप धारण केले आणि मे यांना गुण्यागोविंदाने कारभार चालवणे अशक्य झाले. त्यांच्या वेळकाढू धोरणाचा अन्वय अनेक लोकांनी त्या जनमताचा आदर करणार नाहीत, अशी शंका घेण्याकडे लावला. बोरिस जॉन्सन यांनी त्यांचे वजन ‘ब्रेक्झिट’च्या बाजूने टाकले होते आणि या सगळ्या राजकारणात त्यांची बाजू एक लोकमताचा आदर करणारा आणि रोखठोक राजकारणी म्हणून उभी राहिली. त्याचमुळे जुलै महिन्यात टेरेसा मे यांच्या चालढकल करणाऱ्या कारभाराला कंटाळून टोरी पक्षाने त्यांची पंतप्रधानपदावरून आणि पक्षाध्यक्षपदावरून उचलबांगडी केली. जॉन्सन यांनी त्यानंतर कार्यभार सांभाळायला सुरुवात केली. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत जॉन्सन हे जेरेमी कॉर्बिन यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवणाऱ्या मजूर पक्षाचा निर्णायक पराभव करून पंतप्रधान झाले.

जॉन्सन यांचा एकंदरीत ‘उजवे’पणा, अमेरिकेचे वादग्रस्त अध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांच्याशी असणारे त्यांचे सलोख्याचे संबंध. टोरी पक्षाची परंपरागत ‘मुक्त व्यापारी भांडवलशाही’कडे झुकणारी राजकीयता, या सगळ्याचे पडसाद २०१९च्या पूर्ण वर्षात सतत पडत होते. जेरेमी कॉर्बिन हे अट्टल समाजवादी आणि जॉन्सन जितके उजवे तितकेच ते डावे – त्यामुळे ध्रुवीकरण न झाले तरच नवल! ज्या एनएचएसचा काही महिन्यातच उदो-उदो सुरू होणार होता, ती आरोग्यसेवा मुळातच मजूर पक्षाच्या समावेशक, समतावादी राजकारणाची परिणिती आहे. तिचे खाजगीकरण करण्याचा जॉन्सन यांचा डाव असल्याचे राजकारण कॉर्बिन यांनी निवडणुकीत करून पाहिले. पण जनतेने त्यांचे म्हणणे मतपेटीद्वारे नाकारले. जॉन्सन यांनी एनएचएसचे खाजगीकरण करण्याचा आपला काहीही इरादा नसल्याचे ठामपणे सांगितले आणि जनतेने त्यावेळी तरी त्यांच्यावर विश्वास ठेवला. अजून काही महिन्यांनी जॉन्सन हे स्वतःच एनएचएसचे लाभार्थी ठरतील आणि बरे झाल्यानंतर “मला माझे आयुष्य एनएचएसने परत दिले” असे सांगतील, असे त्यावेळी कोणाला वाटले होते!

साथीचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर खोलवर होणार, हे सांगायला कोण्या नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थशास्त्रज्ञाची आवश्यकता नव्हती. अर्थव्यवस्थेची चाके काही महिने लॉकडाऊनमुळे ठप्प झाली. करवसुली आणि सरकारी उत्पन्न यांची गणिते पूर्णपणे बदलली. कामच नाही तर नोकरदारांचा पगार तरी कसा द्यावा, या विवंचनेत सापडल्याने अनेकांच्या नोकऱ्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. याला पर्याय म्हणून अर्थमंत्री ऋषी सूनक यांनी कार्य-प्रलंबन म्हणजेच 'फर्लो'ची योजना आखली. लोकांना थेट मदत व्हावी म्हणून सरकारने अक्षरशः पैशाचे नळ सोडले! प्रलंबन योजनेद्वारे लोकांच्या नोकऱ्यांची हमी सरकारने घेतली. ज्यांचे काम थांबले होते त्यांच्या नोकऱ्या टिकून राहाव्या म्हणून त्यांच्या असलेल्या पगाराच्या ऐंशी टक्के पगार (दर महिना २५०० पाउंड्स पर्यंत) सरकारने देऊ केला. ही योजना सुरुवातीला जून महिन्यापर्यंत राबवण्याचे संकेत सूनक यांनी दिले होते, पण आता ती ऑक्टोबर महिन्यापर्यंत वाढवण्यात आली आहे. अर्थात सरकारचा हिस्सा ऑगस्ट महिन्यापासून पुढे कमी करून साठ टक्के केला जाईल. या योजनेने अर्थव्यवस्थेला फार मोठा हात दिला. गेल्या तीन महिन्यात ब्रिटनमधले सुमारे ३०% नोकरदार या योजनेचे लाभार्थी राहिलेले आहेत. ऑक्टोबरच्या पुढे ही योजना सुरू ठेवण्याचा सरकारचा विचार नसल्याचेही सूनक यांनी स्पष्ट केले आहे. परंतु उद्योगधंद्यांना मदत म्हणून जर आहेत त्या लोकांना कामावरून न काढता कंपन्यांनी उद्योग सुरू ठेवले तर त्या कंपन्यांना प्रति नोकरदार प्रति महिना १००० पाउंड्स देण्याचे सरकारने घोषित केले आहे - ब्रिटनमध्ये सरासरी उत्पन्न महिन्याला २५०० पाउंड्स आहे, हे पाहता ही मदत भरीव आहे असेच म्हणायला हवे. तसेच कित्येक कंपन्यांनी आपल्याला या मदतीची आवश्यकता नाही, असे सांगून ही योजना कार्यान्वित व्हायच्या आधीच सरकारी मदत नाकारली आहे, हेही विशेष! अशा थेट मदतीबरोबरच व्याजदर कमी करणे, नवीन घरखरेदीवर स्टॅंप ड्युटीमध्ये सवलत देणे, बऱ्याच गोष्टींवरचा VAT कमी करणे असे वेगवेगळे उपायही सरकारने अर्थव्यवस्था सुरू करण्यासाठी आणि सुरू राहण्यासाठी योजलेले आहेत.

या उपायांचे एक वैशिष्ट्य म्हणजे परंपरागत राजकीय दृष्टिकोणातून पाहता हे सगळे उपाय 'डावे' आहेत! किंबहुना, अति-डाव्या विचारसरणीचे कॉर्बिन यांनी त्यांच्या निवडणूक घोषणापत्रात रेल्वे, पाणी आणि इंटरनेट यांसारख्या मूलभूत सुविधा राष्ट्रीयीकृत करण्याची भूमिका घेतली होती, तेव्हा जॉन्सन यांनी अशा भूमिकेमुळे सरकारचा हस्तक्षेप वाढेल, सरकारवर या नोकऱ्यांचे उत्तरदायित्व येऊन तिजोरीची गणिते चुकतील आणि 'मुक्त उद्योगशीलते'वर त्यामुळे गंभीर परिणाम होईल अशी तिखट टीका कॉर्बिन यांच्यावर केली होती. पण आता प्रसंगवशात अगदी ठाम 'उजव्या' विचारसरणीच्या सरकारवर अशी काही आपदा आली आहे की, त्यांना अर्थव्यवस्थेत थेट हस्तक्षेप करण्यावाचून पर्यायच उरलेला नाही! हा एक प्रकारे काव्यगत न्यायच म्हणायला हवा. बोरिस जॉन्सन यांच्या नेतृत्वशैलीवर या साथसंकटाने प्रश्नचिन्हे उभी केली आहेत, असे म्हणायची शक्यता अद्याप तरी दिसत नाही. साथीच्या सुरुवातीच्या दिवसात सरकारने

एका प्रकारची दिरंगाई दाखवली, परदेशी प्रवाशांवर आवश्यक ती बंधने घातली नाहीत, 'सामुदायिक प्रतिकारशक्ती'च्या प्रारूपावर नको तितका भर दिला इत्यादी आरोप त्यांच्या कार्यशैलीवर झाले आहेत. त्यांचा मुख्य सल्लागार डॉमिनिक कमिंग्स (हे आधीपासूनच अतिशय वादग्रस्त व्यक्तिमत्त्व आहे!) याने सरकारी आदेश धुडकावून लावून लॉकडाऊनच्या काळातही उत्तर इंग्लंडपर्यंत प्रवास केला पण तरीही जॉन्सन त्याच्या पाठीशी उभे राहिले, इत्यादी वाद मध्यंतरीच्या काळात होऊन गेले. पण जॉन्सन यांच्या नेतृत्वावर मोठा हल्ला करणे विरोधी पक्षाला जमलेले नाही. साथीच्या सुरुवातीच्या काळात सरकारने हलगर्जीपणा केला किंवा कसे याबद्दल संसदीय चौकशी केली जाईल आणि तिला सामोरे जायला आपण तयार आहोत – पण ते सगळे नंतर, सध्या साथीचा मुकाबला करणे हे अधिक आवश्यक आहे, असे पंतप्रधानांनी संसदेत सांगितले आहे. त्याची कार्यवाही ते कधी करतात ते भविष्यकाळात दिसेल.

## साथ आणि ऑक्सफर्ड

या साथीच्या सुरुवातीपासूनच ऑक्सफर्ड विश्वविद्यालय आणि तिथे होणारे संशोधन हे तिच्याबद्दल होणाऱ्या चर्चेत सतत पुढे येत राहिले आहे. या संशोधनाबद्दल थोडे सांगून मग मी एक विद्यापीठीय सदस्य या नात्याने आम्हाला या साथीचे काय अनुभव आले त्याकडे वळतो.

ऑक्सफर्डच्या 'जेन्नर इन्स्टिट्यूट' तसेच 'ऑक्सफर्ड व्हॅक्सीन ग्रुप' या दोन संस्था, तिथे होणारे लसीकरण आणि संसर्गजन्य रोग यांच्यावरचे संशोधन हे पूर्वापार वैद्यकीय संशोधनाच्या जगतात आघाडीवर आणि मान्यताप्राप्त राहिलेले आहे. प्रा. सारा गिल्बर्ट यांच्या नेतृत्वाखाली नवीन करोनाव्हायरसमुळे होणाऱ्या 'कोव्हिड-१९' या श्वसनसंस्थेच्या रोगावर लस तयार करण्याचे काम आता दुसऱ्या- तिसऱ्या टप्प्यात आहे. लसीची परिणामकारकता प्रत्यक्ष पडताळून पाहण्याकरिता जिथे रोग-संसर्ग-दर अधिक आहे अशा समाजाची आवश्यकता असते. लॉकडाऊनच्या परिणामांमुळे ब्रिटनमध्ये हा दर आता खूपच कमी झाला आहे, सबब जिथे तो जास्त आहे (संसर्गप्रसार वेगाने होत आहे) अशा समुदायांमध्ये हे लसीकरण करून बघण्याची आवश्यकता आहे आणि त्याप्रमाणे ही चाचणी ब्राझील देशात ऑगस्ट महिन्यात सुरू झालेली आहे. या संशोधनाचा वेग नेहमीच्या परिस्थितीत असतो त्यापेक्षा आश्चर्यकारकरीत्या वाढवणे शक्य झाले. कारण अशा विषाणूंच्या बाबतीत ऑक्सफर्डमध्ये याआधी संशोधन झाले आहे. इतर वेळी जी पाऊले उचलायला किमान पाच वर्षे लागली असती, ती आता केवळ तीन महिन्यात उचलली गेली आहेत. लस बनवण्यासाठी चिम्पान्झी माकडांच्या शरीरात रोग निर्माण करू शकणाऱ्या विषाणूमध्ये जनुकीय बदल करून त्याचा संसर्ग मानवी शरीरात केल्यास, शरीरजन्य प्रतिकारशक्ती निर्माण होईल हे गृहीतक वापरले गेले आहे आणि जुलै महिन्यात या गृहितकाचा पडताळा दाखवणाऱ्या प्राथमिक चाचण्यांचा अहवालही

प्रसिद्ध झाला आहे. त्या अहवालानुसार ही लस मानवी शरीरात उत्तम प्रतिकारशक्ती निर्माण करते हे सिद्ध झाले आहे. सर्व घटनाक्रम पाहता, पुढच्या वर्षीच्या सुरुवातीपर्यंत मानवी वापरासाठी सुरक्षित अशी लस किमान जे जनसमुदाय या रोगापुढे अधिक हतबल आहेत किंवा ज्यांना व्यावसायिक कारणांमुळे हा विषाणूसंसर्ग व्हायची शक्यता अधिक आहे, अशांसाठी उपलब्ध होईल अशी दाट आशा आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या अकादमिक वर्षात तीन सत्रे असतात. प्रत्येक सत्रात शिक्षणासाठी आठ आठवडे असतात, आणि एकेक आठवडा सत्रोत्तर शैक्षणिक कामांसाठी असतो. कालावधी लहान असल्याने ही सत्रे शिक्षक आणि विद्यार्थी, दोघांसाठीही बरीच व्यस्त आणि प्राकर्षिक (intensive) स्वरूपाची असतात. मानव्यविद्या विषयातल्या विद्यार्थ्यांना प्रत्येक आठवड्याला एक निबंध लिहावा लागतो आणि त्याची चर्चा आपल्या 'ट्यूटर'बरोबर करावी लागते. ट्यूटर अशा चर्चेद्वारेच 'शिकवण्या'चे काम करतो. एखादा प्रश्न द्यायचा, त्याबरोबर संदर्भतालिका द्यायची आणि त्यातले संदर्भ वाचून काढून, विद्यार्थ्याने दिलेल्या प्रश्नाचे उत्तर देणारा निबंध लिहून काढायचा, तो ट्यूटरकडे सुपूर्द करायचा, आणि मग त्याने त्याच्यावर टीका करत करत विद्यार्थ्याला शिकवायचे. हीच ती प्रसिद्ध 'ट्युटोरीयल' पद्धत. याव्यतिरिक्त विद्यार्थ्याला आवश्यक ती सगळी व्याख्याने ऐकायला, चर्चा करायला आणि प्रसंगी स्वतःच 'सेमिनार'मध्ये व्याख्यान द्यायला मुभा असते.

विषाणूच्या रोगाचा प्रादुर्भाव होऊन तो वाढायला लागला तेव्हा अकादमिक वर्षाचे दुसरे सत्र संपायला आले होते. सत्र सुरू असताना विद्यार्थी विद्यापीठात निवासी असतात. त्यांच्या राहण्या-खाण्याची व्यवस्था वेगवेगळ्या कॉलेजांमध्ये होत असते. सुट्टीच्या काळात ते आपापल्या घरी जातात. जे विद्यार्थी संशोधनपर अथवा स्नातकोत्तर शिक्षण घेत असतात ते मात्र सहसा कॉलेजमध्येच राहतात. तिसरे सत्र, जे 'इस्टर'च्या सुटीनंतर सुरू होते, ते मात्र पूर्ण लॉकडाऊनमध्येच व्यतीत झाले. त्यासाठी विद्यापीठाने आंतरजालाची मदत घेऊन व्याख्याने आणि शिकवणे कसे पार पाडले जाईल त्यावर पुष्कळ भर दिला. शिक्षक-विद्यार्थी संपर्काबरोबरच विद्यापीठात कार्यरत असलेल्या लोकांचे आपापसात संभाषण कसे चालू राहील, विविध समित्या, संशोधनासाठी ज्ञात येणारे निधी आणि त्यांची अंमलबजावणी करणारे विद्यापीठीय गट, अशा प्रभागांचा संपर्क एकमेकांशी चालू राहणे पुष्कळच आवश्यक असते. त्यासाठी योग्य ती पावले उचलली गेली. तिसऱ्या सत्रानंतर उन्हाळी सुट्टी सुरू होते. त्यामुळे शिक्षणाचे काम आवरते घेतले जाते आणि परीक्षांचा हंगाम सुरू होतो. दर वर्षी सुमारे ५१००० परीक्षार्थी वेगवेगळ्या प्रकारच्या परीक्षा देतात. यात स्नातकीय आणि स्नातकोतर अशा सगळ्या प्रकारच्या परीक्षांचा आणि विद्यार्थ्यांच्या अनुमूल्यनाचा (assessment) समावेश असतो. या वर्षी काही परीक्षा आंतरजालीय पद्धतीने घेण्यात आल्या पण बऱ्याच

परीक्षार्थींचे मूल्यांकन त्यांनी त्यांच्या अकादमिक वर्षात केलेल्या अभ्यासाच्या मूल्यांकनावर, 'पूर्वलक्ष्यी' पद्धतीने करण्यात आले.

साथीचा जोर जसजसा कमी होत आहे (म्हणजे विषाणू दूर गेलेला नाही – पण योग्य ती काळजी घेऊन त्याचा संसर्ग होणार नाही इतकी खबरदारी घेतली जात आहे) तसतशी 'इथून पुढे काय' हे पाहण्यासाठी विद्यापीठ सक्रिय झाले आहे. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात ऑक्टोबर महिन्यात होते. त्यावेळी शक्य तितक्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठात परत येऊन शिक्षण घ्यावे यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत. पुढच्या अकादामिक वर्षात शक्य होईल तितकी सुरक्षितता पाळून प्रत्यक्ष शिक्षण देणे आणि त्याला पूरक म्हणून अप्रत्यक्ष म्हणजेच आंतरजालीय प्रकारे व्याख्याने आणि इतर शैक्षणिक पूरक बाबी उपलब्ध करणे या प्रणालीवर विद्यापीठाचा भर राहणार आहे. हे साध्य कसे करायचे, यावर उन्हाळी सुट्टीत वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे पुष्कळ चर्चा आणि विचारमंथन झाले आहे. इतर विद्यापीठांनी आंतरजालीय प्रणालींवर पुष्कळ भर दिला असताना, 'प्रत्यक्ष शिक्षण' आणि विशेषतः 'ट्युटोरीयल' हा ऑक्सफर्डच्या शैक्षणिक अनुभवाचा आत्मा आहे, हे जाणून विलगीकरण आणि निर्जंतुकीकरण यासारख्या उपायांचा योग्य वापर करून या अनुभवांपासून विद्यार्थ्यांना वंचित न करण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद म्हटला पाहिजे.

परंतु माझे स्वतःचे व्यावसायिक काम हे केवळ शिकवण्याचे नाही, हे या लेखाच्या सुरुवातीला म्हटलेच आहे. संग्रहालयात काम करताना त्याची तुलना विद्यापीठाच्या इतर विभागांशी थेट करता येत नाही. किंबहुना, संग्रहालये, वाचनालये आणि बॉटनिकल गार्डन्स यांची एक वेगळी प्रशासकीय शाखा याच कारणासाठी ऑक्सफर्डमध्ये करण्यात आली आहे. आमचा संबंध आम जनतेशी येतो, कारण ऑक्सफर्ड हे (विद्यापीठ आणि त्याच्या इतिहासामुळेच) ब्रिटनमधले एक अग्रगण्य पर्यटनस्थळही झालेले आहे. पर्यटनाच्या हेतूने इथे जगभरातून लोक येत असतात आणि ते विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात येतात. या वर्षी पर्यटनाला फारच मोठा धक्का बसला असल्याने आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या जवळपास शून्य राहिली. पण साथीचा जोर कमी होऊन 'उघडीप' यायला जसजशी सुरुवात झाली आहे तसतशी संग्रहालये आणि उद्याने जनतेसाठी खुली व्हावी यासाठी विद्यापीठ कार्यशील राहिले आहे. संग्रहालयातल्या वस्तूंचे जतन आणि आवश्यक ती सुरक्षा राखण्यासाठी काही कर्मचारी लॉकडाऊनच्या काळातही कामावर रुजू होते (अशा काळात सुरक्षा ही फारच महत्त्वाची असल्याचे एका घटनेमुळे अधोरेखित झाले – विद्यापीठाचे एक अग्रगण्य कॉलेज 'ख्राइस्ट चर्च', यांची स्वतःची चित्र-दीर्घिका आहे. तिथे चोरांनी डल्ला मारून १७ व्या शतकातली दोन चित्रे पळवून नेली!) पण जनतेसाठी संग्रहालय खुले करताना काय काय खबरदारी घेण्यात यावी, जनता आणि कर्मचारी या दोघांसाठीही साथ-सुरक्षेच्या दृष्टिकोणातून काय काय पावले उचलायला हवीत, यासाठी जून महिन्यापासूनच विचारमंथन व्हायला सुरुवात झाली होती. संग्रहालयात मास्क वापरणे अनिवार्य आहे,

पण ठिकठिकाणी निर्जंतुकीकरणाची सोय करणे, प्रसाधनगृहांची निगराणी, अभ्यागतांची संख्या तसेच इमारतीत ते आल्यावर त्यांच्या प्रचालन-प्रवाहाचे नियोजन व्हावे म्हणून ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या पाट्या, अभ्यागतांच्या उपाहाराची सोय या सगळ्या बाबी नीट विचार करून, त्यासाठी प्रायोगिक तत्त्वाचा अंगीकार करून, मगच अवलंबनात आणल्या गेल्या. वातानुकूलनाची यंत्रणा हे संसर्गाचे एक माध्यम बनू शकते हे लक्षात घेऊन तिची पूर्णपणे परीक्षा करण्यात आली आणि या परीक्षणात विद्यापीठातल्या सूक्ष्म-जंतूशास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली. अशी सर्व प्रकारची खबरदारी घेतल्यानंतरच संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले. ज्या कर्मचाऱ्यांना घरून काम करणे शक्य आहे त्यांनी शक्य तितका काळ तेच चालू ठेवावे, असे विद्यापीठाचे स्पष्ट आदेश असल्याने दररोज कामावर जायची आवश्यकता आम्हाला अद्याप तरी भासलेली नाही.

## साथ : एक मन्वंतर

आतापर्यंत ब्रिटन आणि महासाथ यांच्या परस्परसंबंधातले काही पैलू आपण पाहिले. जीवनात आमूलाग्र बदल करणाऱ्या घटना प्रत्येक पिढीत क्वचितच घडत असतात. म्हणजे तंत्रज्ञान, माहितीचा विस्फोट आदी बदल तसेच आहेत; पण त्यांची गती अप्रत्यक्ष आणि तशी एका परीने संथ असल्याने त्यांचा प्रभाव आपल्याला लगेच जाणवत नाही. तसेच, त्यांच्यामार्फत होणाऱ्या बदलाचा परिणाम कित्येकदा 'जीवनमरणाचा प्रश्न' नसतो. त्या बदलांचा आपल्यावर किती आणि कसा परिणाम होऊ द्यावा, हेही काही प्रमाणात आपल्या हातात असते. पण रोग, साथ आणि संसर्गाचे तसे नाही. त्यांच्याकडे आपण लक्ष दिले नाही आणि पूर्वीसारखेच जीवनव्यवहार सुरू ठेवले तर जीवाशी बेतण्याचा प्रश्न उभा राहतो! त्यामुळे अशा प्रसंगांतून वर्तणूक, जीवनशैली, परस्परसंपर्कशीलता अशा सगळ्याच बाबींचा कठोर पुनर्विचार करण्याची गरज निर्माण होते. "माणूस हा सामाजिक प्राणी आहे" हे झिजून गुळगुळीत झालेले वाक्य अशा प्रसंगी फारच टोचायला लागते. कारण परस्परसंबंध/संपर्क ही मानवाची आत्मिक गरज आहे आणि तिलाच अशा आपदेमुळे जोरदार धक्का बसतो.

पुराणांतरी 'मन्वंतर' अशी कल्पना बहुशः भारतीय लोकांनी ऐकलेली असते, पण प्रत्यक्ष मन्वंतर म्हणजे काय याचा अनुभव सहसा कोणाला असा प्रकर्षाने येत नाही. हा अनुभव आपल्या समकालीनांना आला, हे शाप की वरदान ते अजून ठरायचे आहे. वरदान अशासाठी की, याद्वारे जे काही 'शिकायला' मिळाले त्याची व्याप्ती फार मोठी आहे. अगदी लसनिर्मितीची प्रक्रिया बघितली तरी ती शास्त्रीयदृष्ट्या इतकी पराकोटीची जटिल आणि मूलगामी आहे की विज्ञानाच्या साहाय्याने मानवजात असे काही करू शकते, या विचाराने तोंडात बोट जाते! हे शिकताना, त्याच्या चाचण्या घेताना त्यातून नवनवीन ज्ञान

प्राप्त होत असते आणि त्या संधीची तुलना इतर संधींबरोबर करता येणार नाही. ज्या तंत्राचा वापर करून नूतन करोनाव्हायरसविरुद्धची लस बनवली जाते आहे, त्या तंत्राचा वापर करून इतरही काही असाध्य रोगांवर उपचार उपलब्ध व्हायची दाट शक्यता निर्माण झाली आहे. 'शाप' म्हणायचे मुख्य कारण भावनिक आणि आर्थिक आहे. कित्येक लोकांचे आप्तस्वकीय आतापर्यंत या साथीत बळी पडले आहेत. आपल्या नातेवाईक, मित्रपरिवारात, ओळखीपाळखीत एखादी वाईट बातमी ऐकायला आली नाही, असे दिवस कमी होत चालले आहेत. सामुदायिक प्रकारे प्रतिकारशक्ती जोपर्यंत वाढत नाही – म्हणजे रोग होऊन नैसर्गिक प्रतिकारशक्ती प्राप्त झालेले किंवा लसीकरणाद्वारे कृत्रिम प्रतिकारशक्ती प्राप्त झालेले लोक संख्येने वाढून ती नसलेल्या लोकांना 'संरक्षण' देत नाहीत – तोपर्यंत हे चालूच राहणार आहे. लॉकडाऊन, एकांतवास, इतर वैद्यकीय सेवांच्या गरजेची परिपूर्ती न होणे, अशा कारणांमुळे एकंदरीतच सामाजिक आरोग्यावर या साथीचे गंभीर परिणाम होणार आहेत. आर्थिक बाजूला तर किती भयंकर फटका बसेल, किती लोकांच्या नोकऱ्या जातील, मंदीमुळे व्यवसाय, व्यापार, विनिमय इत्यादी बाजूंवर काय परिणाम होतील याचा विचार केला तर चित्र किमान आशादायकही नाही, हेच अधोरेखित होते. ब्रिटनसारखे प्रगत देश कदाचित यातून मार्ग काढू शकतीलही पण 'भविष्यकाल उज्ज्वल आहे' असे एखादे ठोकळेबाज वाक्य म्हणताना यापुढची काही वर्षे तरी जीभ चाचरेल, हे नक्की!

# महासत्तेचा महामारीशी संघर्ष : एक अवलोकन

**अथर्व माधव गोंधळेकर**

संशोधन साहाय्यक
इलेक्ट्रॉनिक आणि कॉम्पुटर इंजिनिअरिंग विभाग
व्हर्जिनिया टेक युनिव्हर्सिटी
atharva1@vt.edu

भविष्यात २०२० या वर्षाचा आढावा घ्यायचा झाला तर सर्वात उल्लेखनीय विषयांपैकी एक असेल तो म्हणजे 'कोरोना ह्या विषाणूचा संसर्ग आणि त्याचे समाजजीवनावरील परिणाम'. २०१९ ह्या वर्षाअखेरीस चीनमध्ये हा विषाणू सर्वप्रथम आढळून आला आणि २०२० च्या पूर्वार्धात तो जगभर पसरला. कोरोना व्हायरसचा (थोडक्यात, कोव्हीड-१९) संसर्ग टाळण्यासाठी अनेक देशांनी उपाययोजना केल्या परंतु त्या निष्फळ ठरल्या. अमेरिकेसारखा विकसित व बलाढ्य देशही ह्यास अपवाद ठरू शकला नाही. किंबहुना, अगदी थोड्या कालावधीत, सर्वाधिक कोरोनाबाधित रुग्ण असलेल्या देशांच्या यादीत अमेरिकेची गणना झाली. न्यूयॉर्कसारखे मोठे शहर कोरोनाच्या संसर्गाचे केंद्रबिंदू झाले. न्यूयॉर्क पाठोपाठ अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये तसेच अमेरिकेच्या ग्रामीण भागांमध्येही कोरोना पसरला. अमेरिकेमध्ये ऑगस्ट २०२० पर्यंत सुमारे एक लाख सत्तर हजार लोकांचा मृत्यू कोरोना विषाणूमुळे झाला (Worldometer 2020). एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या जीवितहानीसह कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे अमेरिकेतील अर्थव्यवस्थेचेही अतोनात नुकसान झाले. अशा बिकट परिस्थितीत अमेरिकेतील केंद्र आणि राज्य सरकार यांनी आणि विविध समाजसंस्थांनी वेगवेगळ्या स्तरांवर कोरोनाच्या प्रादुर्भावाशी संघर्ष करण्याचा प्रयत्न केला. कोरोना विषाणूचा संसर्ग थांबवण्यासाठी आणि त्याचे योग्य निदान करण्यासाठी अनेक प्रख्यात संशोधनसंस्थांमध्ये प्रयत्न करण्यात येत आहेत. ह्या लेखाच्या माध्यमातून कोव्हीड-१९चे अमेरिकेतील समाजव्यवस्थेवर आणि अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम यांचा आढावा घेण्यात आला आहे. कोव्हीडमुळे उद्भवलेल्या समस्या आणि त्या सोडवण्यासाठी विविध स्तरांवर करण्यात आलेले उपाय यांचे या लेखात वर्णन करण्यात आले आहे.

कोव्हीडचा प्रादुर्भाव होण्यापूर्वी अमेरिकेतील अर्थव्यवस्थेचा अनेक वर्षांपासून स्थिर स्वरूपात विस्तार होत होता. अमेरिकेच्या इतिहासातील हा विस्तार दुसऱ्या महायुद्धानंतरचा सर्वात दीर्घकालीन विस्तार होता (Peterson Foundation 2020). बेरोजगारीच्या दरानेही ऐतिहासिक प्रमाणावर नीचांक गाठला होता. कोव्हीडच्या आगमनाने हे चित्र अगदी अल्प कालावधीत पालटले. लॉकडाऊनमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आणि बेरोजगारीचा दर वाढला. कोव्हीडमुळे झालेले नुकसान आणि त्याचे अर्थव्यवस्थेवर होणारे दूरगामी परिणाम यांचे प्रक्षेपण अमेरिकन सरकारच्या Congressional Budget Office (CBO) या संस्थेने केले आहे. CBOच्या प्रक्षेपणात (Projection) असे नमूद करण्यात आले आहे की अमेरिकन अर्थव्यवस्था पूर्वापार होण्यासाठी अनेक वर्षांचा अवधी लागेल. लॉकडाऊन आणि त्यामुळे लादण्यात आलेल्या निर्बंधांमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. विशेषतः सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या नोकरदार वर्गाचे अतोनात नुकसान झाले. Wall Street Journal च्या लेखानुसार अमेरिकेत जवळपास ३ कोटी लोक बेरोजगार झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे (Morath 2020). अमेरिकेत काम करत असलेल्या भारतीयांनाही खूप मोठ्या प्रमाणात फटका बसला. मला हे खूप जवळून बघायला मिळाले. नुकतेच पदवीधर होऊन अनेक नावाजलेल्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या माझ्या अनेक मित्रांच्या नोकऱ्या गेल्या. अनेकजण भारतात परतले. अमेरिकेतील व्यक्तिकेंद्रित समाजव्यवस्थेच्या काही त्रुटीदेखील समोर आल्या. इकडे वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यावर अनेक जण घर सोडून आपला मार्ग स्वतः निवडतात. काही कर्ज घेऊन महाविद्यालयात शिक्षण घेतात तर काही थेट नोकरी करतात. अनेक जण महाविद्यालयात असतानाच एक अथवा जास्त नोकऱ्यांमध्ये रुजू होऊन शिक्षण आणि उपजीविकेसाठी आवश्यक रोजगार मिळवतात .

अमेरिकेत येण्यापूर्वी मला इकडच्या व्यक्तिकेंद्रित आणि भांडवलशाहीधार्जिण्या जीवनशैलीचे फार कुतूहल वाटायचे. Individual Liberty अथवा व्यक्तिस्वातंत्र्य हा अमेरिकेच्या जडणघडणीचा एक पाया मानला जातो. याचेच उदाहरण म्हणजे वयाच्या १८व्या वर्षी आपापला मार्ग निवडण्याची मुभा अमेरिकेतील प्रत्येक नागरिकाला असते. शिक्षणासाठी पुरेसे कर्जदेखील अनेक बँकांकडून मिळू शकते आणि त्यामुळे आर्थिकदृष्ट्या पालकांवर अथवा अन्य कोणावर अवलंबून राहण्याची परिस्थिती उद्भवत नाही. शिक्षणानंतर नोकरी अथवा व्यवसाय करण्याच्या अनेक संधी अमेरिकेसारख्या प्रगत देशातील नागरिकांकडे असतात. अशा सोयीसुविधा आणि तुलनेत स्थिर जीवनशैली असल्यामुळे पैशांचे नियोजन आणि बचत करण्याचे महत्त्व कमी होते. Forbesच्या लेखाचा दाखला द्यायचा झाला तर असे वर्तविण्यात येते की, जवळपास ७८% नोकरदार वर्ग paycheck-to-paycheck या पद्धतीने जीवन जगतो (Friedman 2019). थोडक्यात, अनेकांकडे एक महिन्यापलीकडे भागेल इतकी आवश्यक बचत नसते. अनेक तरुण नोकरदारांचा या वर्गात समावेश होतो. नोकरीचे ठिकाण अथवा महाविद्यालयाच्या जवळ अनेक जण भाडेतत्त्वावर राहतात. कोव्हीडमुळे या वर्गातील आणि विशेषत: अल्प बचत असणाऱ्या तरुण नोकरदार वर्गाचे प्रचंड नुकसान

झाले. 'आधीच उल्हास आणि त्यात फाल्गुन मास' असे म्हणायची वेळ आली. नोकरी गेल्यामुळे घराचे भाडे भरण्याइतके पैसे नसल्यामुळे अनेकांवर बेघर होण्याचे संकट ओढवले.

अमेरिकेतील समाजजीवनावर कोव्हीड महामारीचे दूरगामी परिणाम झाले. महाविद्यालयांनी आपला कारभार इंटरनेटच्या माध्यमातून चालू ठेवला. स्काईप आणि झूमसारख्या माध्यमांचा वापर वाढला. परिणामी, महामारीच्या काळात झूम कंपनीच्या शेअरची किंमत प्रचंड वाढली. प्रयोगशाळेत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संशोधनामध्ये लॉकडाऊनमुळे अनेक अडथळे निर्माण झाले. २०२०च्या उर्वरित शैक्षणिक वर्षात अनेक महाविद्यालयांनी आपले कामकाज पूर्णपणे इंटरनेटवर करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेतील अनेक महाविद्यालये छोट्या शहरांमध्ये आहेत. काही शहरांची स्थानिक अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात महाविद्यालयाशी निगडित रोजगारावर अवलंबून असते. अशा शहरांना 'कॉलेज-टाऊन' म्हणतात. महाविद्यालयांनी इंटरनेटवर काम चालू केल्यामुळे 'कॉलेज-टाऊन'मधील लघु उद्योगांना फटका बसला. अनेक स्थानिक उपहारगृहे, दुकाने गिऱ्हाईक नसल्यामुळे बंद पडली.

जवळपास १५ राज्यांमधील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. शाळा अवेळीच बंद करण्यात आल्या. अमेरिकेतील राजकारणाचे स्वरूप द्विपक्षीय आहे. Democratic Party आणि Republican Party हे येथील दोन प्रमुख पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांची वेगवेगळी विचारशैली आहे. साधारणतः डेमोक्रॅटिक पक्षाची भूमिका ही नोकरदार वर्गाच्या बाजूची असते असे समजले जाते. रिपब्लिकन पक्षाची भूमिका शक्यतो भांडवलशाहीधार्जिणी असते. अनेक महत्त्वाच्या विषयांवर उभय पक्षांतील राजकारण्यांमध्ये नेहमीच वादविवाद होत असतात. कोव्हीड-१९च्या प्रादुर्भावाशी कसा सामना करायचा याची सखोल चर्चा अमेरिकेतील राजकीय सभागृहांमध्ये (Senate आणि Congress) झाली. समाजातील विविध घटकांवर झालेल्या परिणामांचा आढावा अमेरिकेतील राजकारण्यांनी घेतला. कोव्हीडने उपस्थित केलेल्या समस्या सोडवण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल सरकारने जवळपास २४०० अब्ज डॉलर्स इतक्या मोठ्या मदतीची तरतूद केली आहे (Peterson Foundation 2020). या मदतीचे स्वरूप देखील लक्षणीय आले. शीतयुद्धानंतर प्रबळ भांडवलशाही अर्थव्यस्था ही अमेरिका या राष्ट्राची ओळख झाली. कोव्हीड-१९च्या नुकसान भरपाईसाठी केलेल्या तरतुदींमध्ये अमेरिकेची भांडवलशाहीधार्जिणी ओळख अधिकच स्पष्ट झाली. याचा दाखला म्हणजे २४०० अब्ज डॉलर्सपैकी सुमारे ७६० अब्ज डॉलर्सची मदत ही थेट लघु उद्योग आणि लघु उद्योगांमध्ये काम करीत असणाऱ्या नोकरदार वर्गाला करण्यात आली आहे. कर भरणाऱ्या व वार्षिक ७५००० डॉलर्स पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या प्रत्येक नागरिकास १२०० डॉलर्सची थेट मदत करण्यात आली. (Peterson Foundation 2020). कोव्हीडच्या काळात बेरोजगारी भत्ता म्हणून एकूण २७३ अब्ज डॉलर्सची तरतूद अमेरिकेच्या फेडरल सरकारने केली. अमेरिकन सरकारने केलेली ही

मदत किती प्रभावी ठरते हे येत्या काळात स्पष्ट होईल. अमेरिकेतील खाजगी क्षेत्रात काही उल्लेखनीय प्रकल्प राबवण्यात आले (Stebbins and Suneson 2020). 'ॲपल' कंपनीने एक कोटी मास्क दान केले. 'फेसबुक' आणि 'गुगल' यांसारख्या कंपन्यांनी आपापल्यापरीने कोव्हीडशी मुकाबला करण्यासाठी प्रयत्न केले. 'इंटेल' या कंपनीने आपले संगणक 'इंटेल डेव्हक्लाऊड'च्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी इंटरनेटद्वारे नि:शुल्क उपलब्ध करून दिले (Devcloud).


महामारीमुळे नुकसान झालेल्या नोकरदार वर्गाला आर्थिक मदत करणे जरी स्तुत्य असले तरी सरकारच्या हाती असलेली महत्त्वाची जबाबदारी म्हणजे कोरोनाचा प्रसार रोखणे. शोधायच्या झाल्या तर अनेक नकारात्मक गोष्टी नमूद करता येतील ज्या कोरोनाच्या संसर्गास कारणीभूत ठरल्या. वैयक्तिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर कुठे चुका झाल्या ह्याचे विश्लेषण नजीकच्या काळात केले जाईल; परंतु अशा दुर्दैवी आणि भीषण परिस्थितीमध्ये आपापल्या परीने कोरोनाचा संघर्ष करण्याचा प्रयत्न अमेरिकेतील अनेक संशोधक व संशोधनसंस्थांनी केला आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग थांबविण्यासाठी आणि त्याचे योग्य निदान करण्यासाठी अनेक संशोधकांनी संगणकशास्त्र आणि विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेचा वापर केला आहे. ह्या लेखाच्या उत्तरार्धात 'संगणकक्षेत्रातील उदयनशील संकल्पना आणि त्यांचा कोव्हीड-१९ रोखण्यासाठी केलेला वापर' या विषयाचा आढावा घेण्यात आला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता : ॲलन ट्युरिंग यांच्या Computing Machinery and Intelligence (१९५०) शोधनिबंधामध्ये 'संगणक आणि बुद्धिमत्ता' या विषयावर भाष्य करण्यात आले आहे (TURING 1950 : 433-460). 'गणना करणारे यंत्र' अशी पारंपरिक व्याख्या असणारे संगणक हे मानवी बुद्धिमत्तेस पर्याय होऊ शकतात का? असा प्रश्न अनेक शास्त्रज्ञांनी गेल्या अनेक वर्षांत उपस्थित केला आहे. आकडेमोड व अंकगणित करण्याचा वेग बघता संगणकाने मानवाला अनेक वर्षांपूर्वीच मागे टाकले आहे. आज जगातील सर्वात 'जलद' संगणक ४१५ PETAFLOPS म्हणजेच एका सेकंदात अपूर्णांक संख्यांच्या (४१५ दशलक्ष) अब्ज आकडेमोडी (उदाहरणार्थ, बेरीज, वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार) करू शकतो (Trader 2020). असे असले तरी मानवी बुद्धिमत्तेस पर्याय होण्यासाठी केवळ संगणकक्षमता पुरेशी नसते. निरीक्षण, आकलन आणि निर्णयक्षमता असे गुण संगणकामध्ये अंगीभूत नसतात. तुलनेत, सभोवतालच्या वस्तूंची ओळख, भाषा आणि अक्षरओळख यांसारख्या जटिल संकल्पना अगदी बाल्यावस्थेत असल्यापासून मानवास अवगत होतात. कुत्रा आणि मांजरीचे चित्र बघून कुत्रा कोण आणि मांजर कोण हे लहान मूलही सांगू शकते. हेच काम संगणकाकडून करायचे झाल्यास आज्ञावली (Computer program) लिहावी लागते आणि तिचे स्वरूप हे खूप रूक्ष असते. एखादी आज्ञावली जरी दोन चित्रांमधून कुत्रा आणि मांजर कोण हे यशस्वीरीत्या सांगू शकली तरी ती सगळ्याच चित्रांसाठी लागू होते असे नाही. चित्रातील प्राण्यांच्या

सभोवतालची परिस्थिती, उजेड, अंधार, प्राण्यांचा आकार, रंग अशा अनेक बाबी लक्षात घेऊन आज्ञावलीत बदल करावे लागतात. म्हणूनच प्रत्येक चित्र आणि त्यातील परिस्थितीशी अनुरूप आज्ञावली लिहिणे हे वेळेच्या दृष्टीने खूप खर्चिक काम असते. लहान मुलांसाठी चित्रातील कुत्रा आणि मांजरीचा रंग किंवा आकार अशा गोष्टी तुलनेत दुय्यम असतात. चित्रातील प्राणी ओळखण्यासाठी लहान मुलांना आकडेमोड करावी लागत नाही अथवा रूक्ष आज्ञावली लिहावी लागत नाही. लहानपणापासून होत असलेल्या निरीक्षण आणि आकलन या क्रियांमुळे चित्रातील प्राणी ओळखणे सहज शक्य होते. ह्याच आकलनशक्तीची प्रेरणा घेऊन उदयास आलेली संगणकशास्त्राची शाखा म्हणजे Artificial Intelligence (कृत्रिम बुद्धिमत्ता). संगणकाला पुरवलेल्या माहितीतील बारकावे शोधण्याऐवजी कृत्रिम पद्धतीने संगणकाला आकलनशक्ती 'शिकवण्यात' येते. या पद्धतीला training म्हणतात. कुत्रा आणि मांजरीचे उदाहरण बघायचे झाल्यास संगणकाला दोन्ही प्राण्यांची अनेक चित्रे पुरवण्यात येतात. विशेष बाब म्हणजे ही चित्रे labelled असतात. कुठले चित्र कोणत्या प्राण्याचे आहे हे संगणकाला आधीच सांगितले जाते. यानंतर चित्रातील बारकावे शोधले जातात. उदा. प्राण्यांचा रंग, आकार, प्राण्यांच्या चेहऱ्यावरील बारकावे, प्राण्याने व्यापलेले आकारमान आणि त्याचे चित्राच्या एकूण आकारमानाशी असलेले प्रमाण, असे अनेक गुणधर्म हेरून त्यांचे चित्राच्या लेबलबरोबर मॅपिंग करण्यात येते.

सोप्या शब्दात सांगायचे झाले तर एखादा बारकावा हेरून त्याच्याशी निगडित संख्या जर ठरावीक मर्यादेपलीकडे असल्यास, चित्र दोन प्राण्यांपैकी एका प्राण्याचे असेल याची संभाव्यता जास्त असते. training पद्धतीमध्ये प्रत्येक गुणधर्माशी निगडित मर्यादा ठरवण्यात येते. वरचेवर तुलना करायची झाली तर संगणकाचे training म्हणजे लहान मुलांना 'हा कुत्रा', ही मांजर', 'हा अमुक प्राणी', 'हा अमुक पक्षी' असे शिकवण्यासारखे आहे. नंतरचा टप्पा म्हणजे testing. वरील उदाहरणात लेबल असलेल्या चित्रांचे आकलन झाल्यानंतर संगणकाला लेबल नसलेली चित्रे पुरविण्यात येतात. संगणकाचे प्रमुख काम असते ते म्हणजे पुरविलेल्या चित्रांना लेबल प्रदान करणे. चित्रातील गुणधर्माचे प्रमाण मोजून ते training टप्प्यात ठरवण्यात आलेल्या मर्यादांच्या किती जवळ आहेत हे पाहिले जाते आणि त्यानुसार दिलेले चित्र कोणत्या प्राण्याचे आहे हे ठरविण्यात येते. पुन्हा एकदा वरचेवर तुलना करायची झाली तर testing म्हणजे लहान मुलांनी, त्यांना दिलेली माहिती आत्मसात करून 'हा कुत्रा', ही मांजर', 'हा अमुक प्राणी', 'हा अमुक पक्षी' असे स्वतःहून ओळखण्यासारखे आहे. गेल्या दशकात 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा प्रभावीपणे वापर करून अनेक कठीण प्रश्न सोडविण्यात आले आहेत. भाषांतर, चित्रांचे, ध्वनिफितींचे आणि मजकुरांचे वर्गीकरण, निकृष्ट दर्जाच्या दृक्-श्राव्य माहितीचे संवर्धन (enhancement) अशी अनेक कामे पार पाडण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा वापर केला जातो.

गेल्या काही वर्षांत वैद्यकीय क्षेत्रात आणि नजीकच्या काळात कोरोना विषाणूचे निदान करण्यासाठी ‘कृत्रिम बुद्धिमत्ते’चा वापर करण्यात येत आहे. कोरोना विषाणूचे निदान करण्यासाठी ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ कशी उपयोगास येईल? असा प्रश्न साहजिकच पडू शकतो. संशोधकांनी याचे उत्तर CT- Scanच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आधी उल्लेखिलेल्या कुत्रा आणि मांजरीच्या साध्यासोप्या उदाहरणातील प्राण्यांच्या चित्रांऐवजी कोरोनाबाधित असलेल्या आणि नसलेल्या व्यक्तींचा CT-Scan वापरण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संगणकाला अनेक कोरोनाबाधित रुग्णांचे तसेच कोरोनाबाधित नसलेल्या व्यक्तींच्या फुफ्फुसाचे CT-Scan पुरविण्यात येतात. कोरोनाबाधित रुग्णाचा CT-Scan कसा दिसतो हे खालील चित्रात दाखवण्यात आले आहे. हे चित्र थेट (NIH) च्या संकेतस्थळावरून घेण्यात आले आहे (NIH 2020). कोरोनाबाधित असलेल्या रुग्णाचे चित्र पाहता काही बारकावे दिसून येतात ते बाणाने दाखवण्यात आले आहेत. असे बारकावे जर CT-Scanमध्ये आढळून आले तर रुग्ण कोरोनाबाधित असल्याची संभाव्यता खूप जास्त असते. अशाच CT -Scansच्या आधारे training करण्यात येऊन नंतर testingचा वापर नवीन रुग्णांचा CT-Scan बघून ते कोरोनाबाधित आहेत की नाही हे ठरवण्यासाठी व्हावा, असे सुचवण्यात आले आहे (Mei 2020 : 1-5). अमेरिकेतील National Institute of Health (NIH) या संस्थेने ‘Medical Imaging and Data Resource Center’ (MIDRC) स्थापन केले आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमातर्फे डॉक्टरांना कोरोनाचे निदान करणे सोपे होईल अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. कोरोनाचे निदान करण्यासाठी Swab - टेस्टचा वापर करण्यात येतो. Swabsची संख्या मर्यादित असल्याने कोरोनाचे निदान करण्यात अडथळे निर्माण होतात. परंतु CT-Scan च्या माध्यमातून कोरोनाचे निदान जलदगतीने होईल अशी अमेरिकेतील अनेक संशोधन संस्थांची भूमिका आहे.



अमेरिकेसारख्या बलाढ्य देशात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्तरांवर कोव्हीडच्या प्रादुर्भावाचे अगणित दुष्परिणाम झाले. समाजातील काही घटकांची आर्थिक दुरावस्था बघून येथील सरकारने अनेक पावले उचलली. अमेरिकेच्या आरमारामध्ये असणारे सर्वात प्रभावी आयुध म्हणजे अद्ययावत संशोधन. मुळात संशोधनक्षेत्रात गुंतवणूक करणे ही खूप मोठी जोखीम असते. त्या गुंतवणुकीतून काही निष्पन्न होईल असे नक्की नसते. ही जोखीम पत्करून अमेरिकेने गेल्या अनेक दशकांमध्ये संशोधनक्षेत्रात खूप मोठी गुंतवणूक केली आहे. याच गुंतवणुकीमुळे जगभरातून अनेक संशोधक अमेरिकेकडे आकृष्ट होतात. आज अमेरिकेकडे संशोधकांची फळी असून महाविद्यालये, तसेच सरकारी आणि खाजगी संस्थांमध्ये संशोधनानाला मोठ्या प्रमाणात वाव मिळतो. त्यामुळेच कोव्हीडसारख्या महामारीचा संघर्ष कसा करावा याचे उत्तर मिळणे कठीण होत नाही. अमेरिकेची संशोधन केंद्रित भूमिका ही नक्कीच अनुकरणीय आहे.

## संदर्भ :


1. Coronavirus stats via Worldometer (2020) https://www.worldometers.info/coronavirus/country/us/

2. Peterson Foundation, “How Has the Coronavirus Affected the U.S. Economic Outlook” (2020) https://www.pgpf.org/blog/2020/05/how-the-coronavirus-has-affected-our-economic-outlook

3. Eric Morath, “How Many U.S. Workers Have Lost Jobs During Coronavirus Pandemic? There Are Several Ways to Count”, Wall Street Journal (2020 https://www.wsj.com/articles/how-many-u-s-workers-have-lost-jobs-during-coronavirus-pandemic-there-are-several-ways-to-count-11591176601

4. Zack Friedman, “78% Of Workers Live Paycheck To Paycheck”, Forbes (2019): https://www.forbes.com/sites/zackfriedman/2019/01/11/live-paycheck-to-paycheck-government-shutdown/#16e68b344f10

5. Peterson Foundation, “Here’s Everything Congress Has Done To Respond To The Coronavirus So Far” (2020) https://www.pgpf.org/blog/2020/04/heres-everything-congress-has-done-to-respond-to-the-coronavirus-so-far

6. Samuel Stebbins and Grant Suneson, “Amazon, Apple among the companies that are helping Americans fight COVID-19”, USA today (2020): https://www.usatoday.com/story/money/2020/04/21/companies-that-are-helping-americans-fight-covid-19/111565368/

7. Intel Devcloud https://software.intel.com/content/www/us/en/develop/tools/devcloud.html

8. A. M. TURING, I.—COMPUTING MACHINERY AND INTELLIGENCE, Mind, Volume LIX, Issue 236, October 1950, Pages 433–460, https://doi.org/10.1093/mind/LIX.236.4333

9. Tiffany Trader, "Japan's Fugaku Tops Global Supercomputing Rankings" (2020) https://www.hpcwire.com/2020/06/22/japans-fugaku-tops-supercomputing-list-415-petaflops/

10. National Institutes of Health "NIH harnesses AI for COVID-19 diagnosis, treatment, and monitoring", (2020) https://www.nih.gov/news-events/news-releases/nih-harnesses-ai-covid-19-diagnosis-treatment-monitoring

11. Mei, Xueyan & Lee, et. al. (2020). "Artificial intelligence–enabled rapid diagnosis of patients with COVID-19". Nature Medicine. 26. 1-5. 10.1038/s41591-020-0931-3.

# असे लढले सिंगापूर !

## शुभेन फणसे


प्रादेशिक गटप्रमुख
माहिती तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा
आंतरराष्ट्रीय बँक
सिंगापूर
shubhenphanse@gmail.com

सिंगापूर, एक परीटघडीचा देश! अगदी कसा म्हणजे स्टार्चच्या घडीचा... जराही इकडेतिकडे चुणी नाही, सगळं कसं जिथल्या तिथं! ट्राफिक जाममध्ये तासनतास अडकणं नाही, बस, ट्रेनमध्ये धक्काबुक्की नाही, रात्रीबेरात्री एकट्या बाईनं खुशाल टॅक्सी करावी किंवा चक्क वाटल्यास जॉगिंगला निघावं. एकदम बिनधास्त! साहजिकच ह्या अशा टिपटॉप देशामध्ये येण्याची सगळ्यांचीच इच्छा असते. साधारण सत्तावन्न लाखांची वस्ती असणाऱ्या ह्या छोट्याशा देशात दर महिन्याला किमान १४-१५ लाख पर्यटक भेट देतात. ह्यात चीनहून येणारे पर्यटक पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकावर असतात. इथली साधारण ७५% जनता ही चिनी वंशाची असल्याने चीनबरोबर सिंगापूरचे ऋणानुबंध तसे जुने आणि नेहमीचेच! आजही इथे किमान दोन लाख चिनी कामगार ‘वर्क व्हिसा’वर निरनिराळ्या क्षेत्रांत काम करतात. तेव्हा २०१९च्या डिसेंबर महिन्यात चीनमध्ये झालेल्या गोंधळावर सिंगापूर सरकार बारकाईने लक्ष ठेवून होतंच. डिसेंबर महिन्यात चीनमध्ये एका नवीन विषाणूने थैमान घातलं होतं! वूहान नावाच्या मध्यवर्ती शहरांत दिवसागणिक शेकडो माणसे आजारी होऊन मृत्युमुखी पडत होती. या आजाराचं निदान काही होत नव्हतं. वेड्यावाकड्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या. त्यातील कशावर विश्वास ठेवायचा याचा निर्णय अवघड होता. सिंगापूरला जानेवारीतल्या चिनी नूतन वर्षाच्या वेळेची भीती होती. पारंपरिकरित्या चिनी समाज आपले उद्योगधंदे नवीन वर्षाच्या साधारण दहाव्या दिवसांपासून सुरू करतो आणि कामगारवर्गही त्याप्रमाणेच सुट्टीवरून परत येणार असतो. जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात इथले बहुतांशी चिनी कामगार त्यांच्या मायदेशी नवीन वर्ष साजरे करण्यासाठी जाणार होते आणि ते परतून येताना त्यांच्याबरोबर हा नॉवेल कोरोना व्हायरसमुळे संक्रमित होणारा नवीन, अनोळखी आणि धोकादायक आजार इथे पसरण्याची शक्यता दाट होती.

२०२०च्या जानेवारी महिन्यातदेखील जरी बाकीचे जग ह्या बातम्यांकडे चीनची समस्या म्हणून पाहत होतं तिथे सिंगापूर सरकारने ह्यातील धोका ओळखला आणि ते त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने विचारपूर्वक कामाला लागले. या सरकारची एक खासियत आहे, कुठल्याही गोष्टीचा ते फार आधीपासून नीट अभ्यास करतात. त्यासाठी विशेष अभ्याससमिती नेमली जाते. ही समिती त्या प्रसंगाचे फायदे, तोटे, संभाव्य धोके ह्याचं बारकाईने तोलूनमापून विश्लेषण करते; त्यावर त्या क्षेत्रातील विशेष तज्ज्ञांचे मत विचारात घेते आणि त्यातून पुढची आखणी करून मग सरकारला योग्य त्या शिफारशी करते. यामुळे सरकारला योग्य निर्णय जनतेपुढे ठेवता येतात आणि कोणताही गोंधळ न होता त्यांची नीट अंमलबजावणी करता येते. याच सवयीतून आपली जबाबदारी ओळखून जागतिक आरोग्य संघटनेद्वारे ह्या आजाराचे नामकरणही होण्यापूर्वी, २२ जानेवारी रोजीच सिंगापूर सरकारने आपल्या त्रिसदस्यीय विशेष समितीची स्थापना केली. ह्या तीन मंत्र्यांसोबतच स्वतः पंतप्रधान ली सिह्यांग लूंग, उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री हेंग स्वी कियात ह्या समितीचे सल्लागार होते.

यादरम्यान सिंगापूरमध्ये ह्या आजाराने ग्रस्त असावेत असे संशयित रुग्ण येण्यास सुरुवात झाली होती आणि सरकारने उपलब्ध माहितीच्या आधारे विमानतळांवर आणि देशाच्या इतर प्रवेश केंद्रांवर तापमापक यंत्रे बसवून येणाऱ्या प्रवाशांचे तापमान मोजण्यास सुरुवात केली होती. पूर्वी २००३मध्ये आलेल्या 'सार्स'च्या वेळचा संपूर्ण अनुभव, त्यातून शिकलेले धडे आणि त्याबरहुकूम आखून राबवलेले २०१४ सालचे संसर्गजन्य रोगप्रतिबंधक धोरण ही सरकारच्या जमेची बाब होती. हे धोरण विशेषकरून 'श्वसनसंबंधी सांसर्गिक साथीविरोधात' आखले गेले असल्यामुळे त्यात इन्फ्लुएंझापासून ते २००९ सालच्या 'एच १ एन १' किंवा २०१२ सालच्या 'मिडल ईस्ट रेस्पिरेटरी सिंड्रोम कोरोना व्हायरस' (मर्स-सीओव्ही ) अशा जगभरातील तत्सम साथींचा अभ्यास करून त्यासाठीची उपाययोजना मांडण्यात आली आहे. जागतिक पर्यटन केंद्र असल्याने अशा रोगांची साथ जगात कुठेही पसरली तरी सिंगापूरला त्याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही याची सरकारला खात्री होती. अशा प्रकारच्या साथींची जगातील तीव्रता जसजशी बदलेल किंवा अशी साथ जर सिंगापूरमध्येही पसरली तर सिंगापूरमध्ये विविध क्षेत्रांत कोणकोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात यावी यासंबंधी निर्देश या धोरणात दिले आहेत. यातीलच एक उपाय म्हणजे, 'डिसीज आऊटब्रेक रिस्पॉन्स सिस्टिम कंडिशन किंवा 'डॉर्सकॉन' (Disease Outbreak Response System Condition - DORSCON). ह्या व्यवस्थेद्वारे देशांतर्गत साथीची तीव्रता, जनतेच्या आरोग्यावर झालेला थेट परिणाम ह्यावरून सरकारच्या मार्गदर्शनासाठी तीन स्थिती (तयारी - Alert, प्रतिबंध - Containment, आणि उपशमन - Mitigation) यासोबतच जोखीम निर्धारणासाठी (risk assessment) चार पातळ्या ठरवण्यात आल्या आहेत. (आकृती-१).

| सार्वजनिक आरोग्यावरील परिणाम व डॉर्सकॉन जोखीम पातळी |
| --- |
| उपेक्षणीय ते हलका (Negligible to Low> Green) |
| हलका ते माफक (Low to Moderate > Yellow) |
| माफक ते धोकादायक (Moderate to High > Orange) |
| धोकादायक (High > Red) |




ह्याच दूरदर्शी दृष्टिकोणातून सरकारने २०१९ मध्ये ३३० रुग्णांची सोय असलेले अद्ययावत रुग्णालय ‘नॅशनल सेंटर फॉर इन्फेक्शस डिसीजेस’ (National Center for Infectious Diseases - NCID) सुरू केले होते. इथे संसर्गजन्य रुग्णांच्या सर्व प्रकारच्या चाचण्या करण्याची आणि त्यांच्यावर इलाज

करण्याची सोय तर आहेच, परंतु या विषयावर संशोधन, सार्वजनिक पातळीवरील प्रशिक्षणाचेही हे केंद्र आहे. साथींच्या वेळी गरज भासल्यास रुग्णालयाची क्षमता पाचशेपर्यंत वाढविता येऊ शकते.

## कोरोनाचा सिंगापूरमध्ये शिरकाव :

२३ जानेवारी रोजी सिंगापूरमधला पहिला रुग्ण सापडला होता, जो वूहानमधून आला होता. याआधी साधारण दहा संशयित रुग्णांची तपासणी झाली होती, ज्यातील काही वूहानमधून आलेले प्रवासी होते. सरकारने लगेच कॉन्टॅक्ट ट्रेसिंगची मोहीम हाती घेऊन या रुग्णांच्या सिंगापूरमध्ये आल्यापासूनच्या हालचाली शोधून काढून, त्यावेळी किंवा त्यानंतर त्याठिकाणी जे जे हजर होते अशा सगळ्यांची तपासणी करण्यात आली. यातून देशातला दुसरा रुग्ण उघडकीस आला. त्यानंतर एकेक करून रुग्ण सापडत गेले. केवळ सात दिवसांत दीडशेपेक्षा जास्त संशयित रुग्णांच्या तपासण्या करून तेरा रुग्ण सापडले होते. पुढे काही दिवसांतच स्थानिक पातळीवर संसर्ग पसरू लागल्याची चिन्हे दिसू लागली आणि ७ फेब्रुवारीला सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून ऑरेंज (धोकादायक) डॉर्सकॉन पातळी जाहीर केली! आता याद्वारे सरकारला स्थानिक जनतेवर आणि उद्योगांवर अनेक कडक प्रतिबंधित नियम लागू करता येणार होते. फेब्रुवारी अखेरपर्यंत सिंगापूरमधल्या रुग्णांची संख्या नव्वद पार झाली होती, परंतु काही रुग्ण बरेही झाले होते.

एकंदरीत सिंगापूरमध्ये कोविड-१९चा शिरकाव चार प्रकारे झाला :

१. **चीनमधून आलेले रुग्ण -** जानेवारी महिन्यात सापडलेले सगळे रुग्ण हे चीनहून आलेले प्रवासी होते.

२. **स्थानिक संसर्गाचा प्रसार -** परदेशांतून आलेल्या प्रवाशांच्या संपर्कात येऊन स्थानिकांना संसर्ग झाला होता. यामुळे सरकारचे धाबे दणाणले. (डॉर्सकॉन- ऑरेंज)

३. **परदेशांतून परतणारे स्थानिक नागरिक -** चीनशिवाय इतर ठिकाणांहून परतणाऱ्या काही स्थानिकांमध्ये संसर्ग झाल्याचे आढळून येत होते. त्यांचे विमानतळावरच विलगीकरण करण्यात आले.

४. **मार्च अखेरीस स्थानिक कामगारवर्गात झालेला संसर्ग -** सरकारला वाटणारी खरी भीती या धोक्याची होती. सिंगापूरमध्ये विविध क्षेत्रांमध्ये साधारण चौदा लाख परदेशी कामगार आहेत, ज्यातील प्रचंड मोठा वर्ग हा त्यांच्यासाठी केलेल्या वस्तीमध्ये अतिशय दाटीवाटीने राहतो. इथे

सोशल डिस्टंसिंग राबवणं केवळ अशक्य होतं. हे कामगार विविध मोठ्या प्रोजेक्ट्सवर काम करत असल्याने आणि त्यांचा सगळीकडे वावर असल्याने ह्या वर्गास संसर्ग झाल्यास त्याचे धोकादायक पडसाद उमटतील आणि परिस्थिती हाताबाहेर जाईल ही भीती होती. सिंगापूर सरकारनं हे शिवधनुष्य आपल्या जबाबदारीवर उचलायचं ठरवलं.

## डॉर्सकॉननंतर लागू केलेले नियम :

फेब्रुवारीमध्ये डॉर्सकॉन पातळी ऑरेंज केल्यानंतर सिंगापूर सरकारने निर्बंध जारी केले. त्यातील काही महत्त्वाचे निर्बंध पुढीलप्रमाणे -

१. सर्व सार्वजनिक कार्यक्रम रद्द करावेत किंवा पुढे ढकलावेत. जर कार्यक्रम रद्द करता आले नाहीत, तर उपस्थितांचे तापमान नोंदवण्यात यावं. सर्दी, पडसं, खोकला किंवा तत्सम लक्षणं असणाऱ्या कुणाही व्यक्तीला कार्यक्रमास उपस्थित राहू देऊ नये.

२. नुकतेच चीनचा प्रवास करून आलेल्या कुणासही किंवा आजारी असल्याच्या कारणामुळे रजेवर असलेल्यांनाही कार्यक्रमास उपस्थित राहू देऊ नये.

३. उपस्थितांकडून त्यांच्या परदेश प्रवासाबद्दल माहिती घ्यावी.

४. कार्यक्रमाच्या जागेची वारंवार स्वच्छता राखावी.

५. या साथीच्या संकटामुळे सर्व उद्योग, कार्यालयांनी आपले बिझनेस कंटिन्यूटी प्लॅन्स पुन्हा तपासून त्यात सुधारणा करावी. आपल्या कर्मचारी वर्गाची पुनर्रचना करून त्यांना दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून किंवा आपापल्या घरून काम करण्यास सांगावं. (ही स्प्लिट आणि रिमोट वर्किंगपद्धती सिंगापूरमध्ये प्रथम २००३ मध्ये सार्सच्या वेळी राबवण्यात आली होती. तेव्हापासून उद्योगांना ह्याची सवय व्हावी म्हणून दरवर्षी या पद्धतीचे परीक्षण करावे लागते.)

६. सर्व उद्योग, कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांचं तापमान दिवसांतून दोनदा तपासण्यात यावं. सर्दी, पडसं, खोकला किंवा तत्सम लक्षणं असणाऱ्या कर्मचाऱ्यास लगेच डॉक्टरकडे पाठविण्यात यावं.

७. रुग्णालयांतून न्यूमोनियाच्या रुग्णांना वेगळं करावं. रुग्णालयांत येणाऱ्या इतर सर्व जनतेचं तापमान तपासण्यात यावं आणि त्यांच्या परदेश प्रवासाबद्दल माहिती घ्यावी.

८. सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांनी त्यांचे कॅम्प आणि इतर कार्यक्रम मार्चच्या टर्म-ब्रेकपर्यंत रद्द करावेत. बालवाडीसारख्या संस्थांनी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आणि बालकांचे तापमान तपासावं; सर्दी, पडसं, खोकला किंवा तत्सम लक्षणं असणाऱ्यास किंवा चीनला प्रवास केलेला असल्यास वर्गात बसू देऊ नये.

याशिवाय कार्यालयांत, फूड-कोर्ट किंवा रेस्टॉरंट्समध्ये सार्वजनिकरीत्या वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची वारंवार स्वच्छता राखणे, एकावेळेस जास्त विद्यार्थी एकत्र येऊन संसर्ग वाढू नये म्हणून शाळांमधील विरामकाळाची अदलाबदल करणे, वृद्ध-केंद्रांमधील कार्यक्रमात बदल वगैरे खबरदारीचे उपाय याआधीच घेण्यात आले होते.

सिंगापूरमध्ये शेजारील राष्ट्र मलेशियाहून दररोज कामासाठी येणाऱ्यांची संख्याही खूप आहे आणि दोन्ही देशांमध्ये चिनी वंशाचे नागरिक पुष्कळ आहेत. दोन्ही देशांच्या बऱ्याच नागरिकांचे नातेवाईक दोन्ही देशांत आहेत आणि त्यांचं सीमापार नेहमीच येणं-जाणं असतं. याशिवाय सिंगापूर मलेशियावर बऱ्याच दैनंदिन आणि जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यासाठी अवलंबून असतो आणि ही माल आणि प्रवासी वाहतूक रस्त्याने दिवसांतील २४ तास चालू असते. साहजिकच ह्या नवीन रोगाचा प्रसार यामार्गाने होण्याचा दोन्ही देशांना सारखाच धोका असल्याने, सिंगापूरने मलेशियाबरोबर दैनंदिन वाहतुकीसंबंधी विचार करण्यासाठी एक समिती तयार केली. जेणेकरून काही ठोस निर्णय घ्यायचे झाले तरी देशात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा होऊ नये. हाँगकाँगमध्ये लोकांनी बाजार आणि इतर व्यवहार बंद होण्याच्या भीतीने टॉयलेट पेपरचा साठा करण्यासाठी जशी सुपरमार्केटवर जनतेची धाड पडली होती तसे प्रकार इथे होऊ नयेत म्हणून सरकार लक्ष ठेवून होते. परंतु सोशल मीडियामधून येणाऱ्या सनसनाटी बातम्यांना बळी पडून शेवटी फेब्रुवारीमध्ये एका वीकेंडला सिंगापूरमध्ये लोकांनी इथली सुपरमार्केट्सही रिकामी केलीच.

## संकट दारातून घरात :

सिंगापूरमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांची प्रादेशिक कार्यालये आहेत, जिथून ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि जपानपासून ते थेट भारत किंवा पाकिस्तानपर्यंतच्या देशांमधील त्यांच्या कामावर लक्ष ठेवले जाते, ह्या देशांतील अनेक सेवांचे नियंत्रण, नियोजन इथून केले जाते. आयटी क्षेत्रातील बऱ्याच मोठ्या कंपन्या ज्या इतर क्षेत्रातील बड्या कंपन्यांना तांत्रिक सेवा पुरवतात त्या २४ तास काम करत असतात. इथे मोठमोठ्या कंपन्यांची प्रादेशिक डेटा सेंटर्स आहेत; ज्यातून कितीतरी बँका आणि इतर उद्योगांना आयटी सेवा पुरवली जाते. ह्या उद्योगांना बंद करण्याचा विचारही जागतिक संकट उभं करू शकतो.

यामुळेच चिनी नवीन वर्षानंतर फेब्रुवारीमध्ये चीनहून सिंगापूरमध्ये कामावर परतणाऱ्यांची प्रचंड संख्या लक्षात घेऊन सरकारने इथल्या सर्व उद्योगांना, खास करून बँकांसारख्या अत्यावश्यक सेवा देणाऱ्या उद्योगांना त्यांच्या कामाचे पुनर्नियोजन करायला भाग पाडले. अजून तरी परदेश प्रवासावर काही खास निर्बंध लावण्यात आले नव्हते. परंतु नुकत्याच केलेल्या परदेश प्रवासाची माहिती मात्र प्रत्येक कार्यालयीन इमारतीत प्रवेश करताना द्यावी लागत होती. कामाच्या जागांतून रोगाचा प्रसार रोखण्यासाठी सगळ्या कार्यालयांतून कर्मचाऱ्यांचेच नव्हे तर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे तापमापन सक्तीचे करण्यात आले.

फेब्रुवारीच्या पहिल्याच पंधरवड्यात अनेक बँकांनी त्यांच्या अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन किंवा तीन गटांत विभागून त्यांची कार्यालये निरनिराळ्या ठिकाणी स्थलांतरित केली. ज्यांना असे करणे शक्य नव्हते, त्या उद्योगांनी त्यांच्या कार्यालयांच्या वेळा बदलून कर्मचाऱ्यांना दोन गटांतून विभागून दिवसांतून एकाऐवजी दोन पाळ्यांच्या वेळापत्रकात बसवले. इतर अनेक विभागांना घरून काम करण्यास सांगण्यात आले. जेणेकरून ह्या गटांतील जर कुणी या नवीन रोगाने आजारी झालेच तर फक्त त्याच गटाला विलगीकरणाला सामोरे जावे लागेल, परंतु कंपनीच्या कामावर त्याचा लक्षणीय परिणाम काही होणार नाही.

सिंगापूरमध्ये घरोघरी जगातील अत्युच्च दर्जाची इंटरनेट सेवा मिळणे शक्य असल्यामुळे बहुतेक सर्व बँकांनी आणि आयटी क्षेत्रातील कंपन्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना घरून काम करण्यास सांगितले. यासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि लॅपटॉप किंवा डेस्कटॉप, झालंच तर फोन इंस्ट्रुमेंट्ससारखी सामग्रीही कर्मचाऱ्यांना घरी देण्याची व्यवस्था करण्यात आली. अजूनही ह्या विभागलेल्या कर्मचारी गटांवर कार्यालयातच नव्हे, तर बाहेर खाजगी वेळातही एकमेकांना भेटण्याची सक्त बंदी आहे.

फेब्रुवारीच्या शेवटीशेवटी दक्षिण कोरियामध्ये पसरलेल्या साथीच्या परिस्थितीनुसार सिंगापूरहून दक्षिण कोरियाचा प्रवास टाळावा अशी सरकारी सूचना जारी करण्यात आली. चीन आणि दक्षिण कोरियाहून आलेल्या संशयित रुग्णांना विमानतळावरून थेट रुग्णालयातच रवाना केले जाऊ लागले. मार्चच्या सुरुवातीला या प्रवास प्रतिबंधित देशांच्या यादीत इराण, इटली आणि जपान यांचीही भर पडली. तर या देशांतून आलेल्या सिंगापूरवासियांना चौदा दिवसांची स्टे-होम नोटीस जारी केली जाऊ लागली, ज्याद्वारे त्यांना त्यांच्या राहत्या घराबाहेर कुठेही जाण्याची परवानगी नव्हती. तापासारखी लक्षणे असणाऱ्या प्रवाशांवर कोविड-१९च्या स्वाब-टेस्ट केल्या जातील असे जाहीर केले गेले. ज्यांना ही टेस्ट करणे कबूल नसेल त्यांना सिंगापूरमध्ये प्रवेश नाकारला जाईल आणि त्यांच्या वर्क-व्हिजावरही याचा परिणाम होईल असेही जाहीर केले गेले.

आतापर्यंत ह्या कोविड-१९चा ज्येष्ठ नागरिकांना विशेष धोका असल्याचे जाणवले असल्याने सरकारी पातळीवरच्या ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या सगळ्या सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी आणली. मार्च महिन्यात दर दिवशीच्या नवीन केसेसची संख्या झपाट्याने वाढू लागली होती. स्थानिक पातळीवर नवीन वर्षाच्या जेवणावळींतून, व्यावसायिक सभासंमेलनातून संसर्ग धोकादायकरित्या पसरत होता. जनतेमध्ये आजाराप्रती भीती वाढत होती. मास्क आणि सॅनिटायझरची मागणी वेड्यासारखी वाढली होती. लोक गृहोपयोगी किराणा सामानाचा इतका साठा करू लागले होते की, सरकारला सुपरमार्केट्समधून दरडोई खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या संख्येवर निर्बंध आणावे लागले.

एव्हाना आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक बऱ्यापैकी थंडावली होती, फ्लाईट्स रद्द व्हायला सुरुवात झाली होती. स्थानिक केसेस दिवसागणिक वाढतच होत्या. मार्चच्या मध्यास मशिदींमधील सर्व सार्वजनिक कार्यक्रम बंद करण्यात आले. प्रवास प्रतिबंधित देशांच्या यादीत फ्रांस, जर्मनी आणि स्पेनची भर पडली. सर्व क्रूझ बोटींना सिंगापूरचा थांबा रद्द करण्यात आला. सरकारने अडीचशे किंवा त्याहून अधिक व्यक्ती जमणाऱ्या कार्यक्रमांवर बंदी घातली. कामाच्या ठिकाणांना, रेस्टॉरंट्ससहित सर्व जागी कायद्याने सोशल डिस्टंसिंग लागू करण्यात आलं. कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करता यावं म्हणून सर्व कार्यक्रमांना येणाऱ्या व्यक्तींची माहिती गोळा करण्यात येऊ लागली. उद्योगांना कामाच्या ठिकाणी सोशल डिस्टंसिंग जमावं म्हणून प्रत्यक्ष मिटींग्स करण्यापेक्षा व्हिडिओ कॉन्फरसिंगचा वापर करण्यास सांगण्यात आलं.

## कामाच्या जागांसाठी निर्बंधात्मक उपाय:

अखेरीस २३ मार्चपासून सिंगापूरच्या सीमा सर्व आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी बंद करण्यात आल्या. सिंगापूर पोर्ट फक्त मालवाहतूक आणि दुरुस्तीच्या कामांकरताच चालू राहील असं जाहीर झालं. २६ मार्चपासून सर्व सार्वजनिक ठिकाणी दहापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी करण्यात आली. एक मीटर अंतराचं सोशल डिस्टंसिंग आणि रिमोट-कार्यप्रणाली (घरून काम) सगळ्या उद्योगांना अनिवार्य करण्यात आलं. कामाच्या ठिकाणी जिथे रिमोट-कार्यप्रणाली किंवा सोशल डिस्टंसिंग लागू करता येत नसेल अशा आस्थापनांना तशी सोय करेपर्यंत बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कर्मचारी वर्गाची पुनर्रचना करून कर्मचाऱ्यांना दुसरी कामे/जबाबदाऱ्या शिकविण्यास सांगण्यात आलं. आस्थापनांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या येण्या आणि जाण्याच्या वेळा वेगवेगळ्या करून सार्वजनिक वाहतुकीमध्ये गर्दी कमी होईल अशा एक-एक तासाच्या अंतराने बदलण्यास सांगितलं गेलं. स्प्लिट-टीम योजना लागू करून कर्मचाऱ्यांचे वेगळे गट करणे आता सक्तीचं करण्यात आलं. आगाऊ सूचनेशिवाय रजा घेणाऱ्यांची विशेष दखल घेऊन त्यांच्या सुटीचं कारण

नोंदवण्यात येऊ लागलं. मार्चअखेरीस सरकारनं बार, सिनेमा आणि सर्व तत्सम करमणुकीच्या जागा पूर्ण बंद केल्या.

कायद्याचं कठोर पालन करण्यासाठी प्रसिद्ध असणारं सिंगापूर सरकार स्टे-होम नोटीस मोडून क्षुल्लक कारणांसाठी घराबाहेर फिरणाऱ्यांविरुद्ध सक्तीची पावलं उचलण्यासदेखील कचरलं नाही. काही नागरिकांचे पासपोर्ट रद्द झाले तर काहींचे निवासी व्हिसा रद्द करून त्यांना पुढच्या फ्लाईटने मायदेशी पाठविण्यात आलं.

कोविड-१९चा संसर्ग केवळ एकमेकांच्या सहवासाने नाही तर कदाचित रुग्ण जिथे जिथे गेलाय, तिथे ज्या वस्तूंना हाताळलंय यातूनही होऊ शकतो असं जेव्हा लक्षात आलं तेव्हा, सरकारने कॉन्टॅक्ट ट्रेसिंगवर भर दिला. परंतु येणाऱ्या प्रत्येकाकडून माहिती लिहून घेणे जिकिरीचं काम होतं. त्यात वेळ तर जायचाच परंतु लोक भीतीपोटी खरी माहिती देतीलच ह्याची खात्री नव्हती. सरकारने यावर उपाय म्हणून लोकांच्या मोबाइलसाठी ट्रेस-टुगेदर नावाचं ॲप तयार केलं. ब्लु-टूथ तंत्रावर चालणार हे ॲप आपल्या फोनच्या आसपास आलेल्या इतर फोन्सची नोंद ठेवतं. यापैकी कोणी जर कोविड१९ने आजारी झाल्याचे कळलं तर सरकार या ॲपद्वारे त्या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्यांना सतर्क करून त्यांना घरच्या घरी विलग करणे किंवा आजाराची लक्षणे आढळल्यास रुग्णालयात नेणे अशी मदत करू शकणार होतं.

मार्चच्या अखेरीस सिंगापूरमध्ये दर दिवशीच्या नवीन केसेसची संख्या पन्नास- सत्तर पार झाली होती, त्यातही स्थानिक रुग्णांची संख्या प्रवासी रुग्णांपेक्षा वाढू लागली होती. संकट दारातून घरात आल्याची चिन्हे स्पष्ट दिसत होती.

## सर्किट ब्रेकर किंवा लॉक डाऊन :

बरेच उपाय केले तरी कोविड १९चा प्रसार सिंगापूरमध्ये भीतिदायकरीत्या वाढतच राहिल्याने शेवटी सरकारला ७ एप्रिल रोजी सर्किट ब्रेकर उपाययोजना जारी करणे भाग पडले. सर्किट ब्रेकरद्वारे सरकारने फक्त अत्यावश्यक सेवा देणाऱ्या आस्थापनाच चालू ठेवून इतर सर्व उद्योग, शाळा-कॉलेज, दुकानं, जीम आणि मॉल्स उघडण्यास बंदी घातली. जनतेनं कारणाशिवाय घराबाहेर पडू नये, बाहेर जावंच लागलं तर मास्क घालून जावं असं सांगण्यात आलं. त्यानंतर काही दिवसांनी प्रत्येकाला बाहेर जाताना मास्क वापरणं अनिवार्य करण्यात आलं. सुरुवातीला चार आठवड्यांकरता घातलेले हे निर्बंध पुढे जून अखेरपर्यंत वाढवावेच लागले. याकाळात भाजीबाजारासारख्या गर्दीच्या जागी लोकांच्या ओळखपत्राच्या अखेरच्या आकड्याप्रमाणे त्यांना सम किंवा विषम तारखांनाच प्रवेश दिला. त्यामुळे गर्दीचा धोका निर्माण झाला. फूड

कोर्टमधे बसून खाण्यास बंदी घातली गेली, जेवण घेऊन जाणं बंधनकारक होतं. अन्नाच्या डिलिव्हरीज मात्र चालू होत्या. त्यामुळे खाद्य पदार्थांसंबंधित असे काही उद्योग, दुकाने शिवाय इलेक्ट्रॉनिक वस्तूंची दुकाने यांना सोशल डिस्टंसिंग पाळून व्यवहार करण्यास परवानगी होती. यामुळे लोक घरून काम करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू जसे टेबल-लॅम्प, हेडफोन्स, मॉनिटर्स इत्यादींची गरजेप्रमाणे खरेदी करू शकले. त्यामुळे सरकारला सर्व उद्योगांमधून रिमोट-वर्किंग सक्तीचं करता आलं. केवळ अत्यावश्यक सेवांचीच कार्यालये किमान कर्मचारीवर्गाद्वारे चालू होती. त्यातही दोन पाळ्यांतून कामं करणं किंवा दोन गटांतून काम विभागून त्यांना आलटून पालटून वेगवेगळ्या दिवशी बोलावणं अशा उपाययोजना होत्याच.

इतरांना कुणाला काही जरुरीच्या कामासाठी जर आपल्या कार्यालयात जायचं झालंच तर त्यांना तीनचार दिवस आधी परवानगीसाठी अर्ज करावा लागत असे. थेट कामगार मंत्रालयातून प्रत्येक अर्जाची छाननी होऊन मगच कार्यालयात येण्याची परवानगी मिळत होती. अशा नैमित्तिक येणाऱ्या लोकांची संख्या नेहमी येणाऱ्या राखीव कर्मचाऱ्यांच्या प्रमाणानुसार ठेवण्यात आल्यामुळे आणि काही ठरावीक वेळापुरतीच परवानगी देण्यात येत असल्यामुळे अशा लोकांची संख्या फारच कमी ठेवल्यामुळे मुळातच असे अर्ज फार कमी आले.

सरकारने ह्या सर्व दिवसांत सार्वजनिक वाहतुकव्यवस्था मात्र थोड्या कमी प्रमाणात का होईना, चालू ठेवली. त्यामुळे अत्यावश्यक सेवांमध्ये काम करणाऱ्या जनतेला त्यांच्या कामावर जाताना काही प्रयास पडले नाहीत. मुळातच कार्यालये कमी प्रमाणात चालू असल्यामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या येण्याच्या वेळा निरनिराळ्या केल्यामुळे बस, ट्रेनमध्ये नेहमीसारखी गर्दी झाली नाही. बस, ट्रेनमधल्या शेजारच्या बसण्याच्या जागा सोशल डिस्टंसिंग पाळता यावं म्हणून बंद केल्या गेल्या. टॅक्सीतून जाताना प्रवाशांची संख्या तर निर्बंधित केलीच होती, परंतु ड्रायव्हरशेजारी बसण्यासही मनाई होती.

बस, ट्रेनमधून प्रवास करताना मास्क लावणं तर सक्तीचे होतं, पण त्याबरोबरच कुणाशीही बोलणंच नव्हे; तर मोबाईलवरही बोलणं मना होते. जेणेकरून बोलताना तोंडातून शिंतोडे उडून आजाराचा प्रसार होऊ नये. आजाराच्या विविध बातम्यांनी घाबरलेल्या समजूतदार नागरिकांनीही या सगळ्या नियमांचं विनातक्रार कसोशीनं पालन केलं. तरीही सोशल डिस्टंसिंगचे नियम न पाळण्याऱ्या थोड्याथोडक्या नव्हे तर तब्बल ३००० जणांवर दंडात्मक कारवाई करावी लागली.

प्रत्येक दुकानातून, सुपरमार्केटमधून, व्यावसायिक आस्थापनांतून आणि निवासी संकुलातूनही क्यू आर कोड वापरून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची येण्याजाण्याच्या वेळेची नोंदणी प्रत्येकाच्या मोबाईलमधील ट्रेस-टुगेदर ॲपद्वारा सक्तीची करण्यात आली. या तपासणीसाठी विशेष स्वयंसेवकही बसविण्यात आलेत. यामुळे

जर कुणी रुग्ण अशा जागी येऊन गेला असल्यास तिथे येऊन गेलेल्या इतर नागरिकांना सतर्क करणे सरकारला सोपे झाले. तसेच या नोंदणीमध्ये लागणारा वेळही कमालीचा कमी झाला.

## परदेशी कामगारांमध्ये संसर्ग :

इथल्या परदेशी कामगारांना झालेल्या संसर्गाची तर वेगळीच कहाणी आहे. इथे भारत, बांग्लादेश, चीन, व्हिएतनाम, फिलिपाइन्स अशा देशांतून सुमारे चौदा लाख कामगार इथल्या बांधकाम प्रकल्पावर किंवा शिप-रिपेअर आणि तत्सम कारखान्यांतून काम करत असतात. अशा कामगारांना राहण्यासाठी सरकारने किंवा ते ज्यांच्याकडे काम करतात ते कारखानदार / कंत्राटदारांनी स्वस्त निवासाची सोय केलेली असते. अशा प्रकारच्या निवासांमधून हे कामगार दाटीवाटीने राहत असतात. अर्थातच कोविड-१९सारख्या जहाल संसर्गजन्य रोगाचा इथे शिरकाव झाला तर हाहा:कारच उडणार होता. एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात ह्या वस्त्यांमधून कोविड१९ची लागण झाल्याचं उघड झालं आणि हा हल्ला रोखण्यासाठी सरकार पूर्ण जोमानं कामाला लागलं. ह्या वस्त्यांमधून राहणाऱ्या सगळ्या कामगारांना कामावर जावं लागू नये आणि संसर्ग वाढू नये म्हणून सर्व कामं बंद करण्यात आली होतीच. सर्वात मोठं काम होतं ते यातून बऱ्या होणाऱ्या कामगारांना इतरांपासून वेगळं ठेवणं. तेरा- चौदा लाख लोकांच्या राहण्याचीच नव्हे तर रोजगार नसताना त्यांना दोन वेळचे जेवण मिळण्याची, त्यांची पूर्ण तपासणी करण्याची व्यवस्था करणं हे काही सोपं काम नव्हतंच! जगात सिंगापूर हे एकमेव उदाहरण आहे जिथं सरकारने स्वखर्चाने ह्या परदेशी नागरिकांची संपूर्ण जबाबदारी उचलून १००% सगळ्यांच्या कोविडसाठी टेस्ट केल्या. आजारी असलेल्यांवर इथल्याच रुग्णालयात एकाच प्रकारे इलाज केले. तसेच आजारातून ठीक झालेल्यांची वेगळ्या जागी राहण्याची सोयही केली. यासाठी सरकारने इथल्या मोठ्या औद्योगिक प्रदर्शनासाठी खास बांधलेल्या हॉल्समधून तसेच दोन मोठ्या क्रूझ बोटी ताब्यात घेऊन त्यावरही हजारो कामगारांच्या तात्पुरत्या निवासांची सोय केली. त्यावेळात त्यांच्या नेहमीच्या राहण्याच्या जागांची पुनर्रचना करून प्रत्येक खोलीतून सोशल डिस्टंसिंग पाळून राहता येईल अशी सोय केली. रोजच्या रोज बातमीपत्र काढून सरकार नवीन सापडलेल्या केसेसची माहिती जनतेपर्यंत पोहोचवत होतं, त्यामुळे सरकारला याबाबतच्या अफवांवर नियंत्रण ठेवणंही बऱ्याच प्रमाणात शक्य झालं.

एवढ्या प्रचंड लोकसंख्येवर असे इलाज करणं, सगळ्यांच्या पुन्हापुन्हा टेस्ट करून त्यांच्या निरोगी असण्याची खात्री करून मगच त्यांना एकत्र राहण्यास परवानगी देणं हे एप्रिलमध्ये सुरू झालेलं महत्कार्य संपायला चक्क ऑगस्ट महिना उजाडला. आत्ता काल परवा सरकारनं ह्या सगळ्यांच्या टेस्ट्स पूर्ण

झाल्याचं जाहीर केलंय. तरीही हे संकट टळलं असं नाहीय. अजून त्यांच्यात केसेस सापडत आहेतच. पण आता त्यांचं प्रमाण खूपच कमी झालंय.

## आर्थिक मदत आणि व्यावहारिक निर्णय :

सिंगापूरमध्ये कोविड१९ चा प्रादुर्भाव वर्षाच्या सुरुवातीसच झाला असल्यामुळे देशाचा २०२०-२१चा आर्थिक ताळेबंद तयार करताना सरकारला बराच विचार करावा लागला. अशा अनिश्चित काळात ह्यावर्षी आर्थिक प्रगती होण्याची चिन्हे नव्हतीच. तरीही सरकारने थोडा आशावादी सूर लावत उणे ०.५ ते १.५ % इतका प्रगतीचा दर वर्तवला. यातून सरकार अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी काही कामे सुरू करेल असा संदेश आणि सरकारचा ह्या संकटाला खंबीरपणे सामोरे जाण्याचा निश्चय जनतेसमोर आला. ह्या संकटाचा उद्योगांवर विपरीत परिणाम होणार आणि त्यातून जनतेच्या नोकऱ्यांवर गदा येणार हे सरकारने आधीच ओळखले आणि जनतेच्या मनाची तयारी करून ठेवायला सुरुवात केली. फेब्रुवारी-मार्च महिन्यांतील रस्त्यावरील शुकशुकाट म्हणजे कॉफी-शॉप्स, फूड-कोर्टमधील स्टॉल-चालक ह्यांच्यावरील संकटाची स्पष्ट सुरुवात होती. उत्पन्नाशिवाय अशा जनतेला दैनंदिन खर्चासाठी सरकारने त्यांच्या बँक-खात्यात मदतीखातर थेट रोख रक्कम जमा केली. घरगुतीच नव्हे तर स्टॉल्ससाठी येणाऱ्या वीज-पाण्याच्या बिलात सवलती जाहीर केल्या. एवढेच नाही तर ज्यांच्या नोकऱ्या जातील त्यांना किंवा जनतेला नवीन क्षेत्रात नोकरी मिळवण्यासाठी प्रशिक्षण घेता यावे यासाठी ५०० सिंगापूर डॉलर्स इतकी रोख मदत जाहीर केली. घरगुती उत्पन्नाच्या आधारे अनुदानित वैद्यकीय सेवा योजनेअंतर्गत साध्या डॉक्टरच्या भेटीपासून ते रुग्णालयातील इलाज मामुली खर्चातच नव्हे तर मोफतही उपलब्ध करून दिलेत.

उद्योगांनी कोविड१९च्या संकटाचा गैरफायदा घेऊन विनाकारणच लोकांना कामावरून काढू नये यासाठीही सरकार सतर्क आहे. अनेक उद्योगांना त्यांच्या करांमध्ये, जागेच्या भाड्यामध्ये सवलत किंवा काही महिन्यानंतर भरण्याची सवड दिली. इतकेच नव्हे तर रोख रकमेच्या मदतीही सरकारने जाहीर केल्या. त्यांना कामगारवर्ग कमी करावा लागलाच तर स्थानिकांना त्याची झळ पोहोचू नये किंवा कमी पोहोचावी असे निर्णय घेण्यास भाग पाडलं.

सरकारच्या अशा सकारात्मक दृष्टिकोणाचा परिणाम इथल्या उद्योगांवर झाला नसता तरच नवल! अनेक उद्योगांनी त्यांच्या कामगारांच्या पगारात कपात करून का होईना परंतु, त्यांच्या नोकऱ्या कायम ठेवल्या. सिंगापूर एअरलाईन्ससारख्या बड्या कंपनीनेही विमान प्रवास थंडावल्यामुळे रिकाम्या असणाऱ्या त्यांच्या हवाई-सेविकांना रुग्णालयात रुग्णांची सेवा करण्यासाठी नियुक्त केलं. कोविड-१९ने आधीच थकलेल्या

आरोग्यसेवा क्षेत्राला अशी मदत मिळाली तर हवीच होती. मलेशियाहून दैनंदिन प्रवासावर बंदी येणार असे कळताच तिकडून रोज येणाऱ्या कामगारवर्गावर अवलंबून असणाऱ्या अनेक कारखान्यांनी आणि बँकांनी अशा कामगारांची स्वखर्चाने इथेच हॉटेलमधून राहण्याची सोय केली. ह्या मलेशियन लोकांना इथे राहता यावं यासाठी सरकारने अनेक सार्वजनिक सभागृहं, बॅडमिंटनचे कोर्ट्स ताब्यात घेऊन तिथे त्यांच्या तात्पुरत्या राहण्याची सोय केली आणि त्यांना रोख रकमेचीही मदत केली. अनेक स्थानिकांनीही अशा लोकांना आपल्या घरी ठेवून घेतलं आहे. यामुळे सर्किट ब्रेकरच्या काळातही असे उद्योग त्यांचे कारभार कमी प्रमाणात का होईना चालू ठेवून कामगारांना पगार देऊ शकले आणि देशातील जनतेवरील बेकारीचे आणि अनुषंगाने देशाच्या अर्थव्यवस्थेवरील संकट काही काळासाठी का होईना टळले. जे लोक रोज कामावर जाण्यासाठी त्यांच्या कार्स वापरतात त्यांना कामाच्या जागी कार-पार्कचे भाडे द्यावे लागते. परंतु रिमोट-वर्कींगच्या काळात बरेचजण घरूनच काम करत असल्याने अनेक कंपन्यांनी हे कार-पार्कचे भाडे या काळासाठी माफ करून त्यांच्या कर्मचारीवर्गाचा खर्च थोडा कमी करण्यास हातभार लावला.

## व्यवहारातील बदल :

कोविड-१९च्या संकटाने सगळ्यांचाच आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलून टाकला आहे असे म्हटले जाते ते खोटे नाही. आता गेले चार महिने बऱ्याच उद्योगांचे कारभार कोणीही कार्यालयात न येताही चालू आहेत. त्यामुळे हे सगळे बडे उद्योग त्यांच्या आलिशान कार्यालयांच्या भाड्याचा राक्षसी खर्च कसा कमी करता येईल याचा विचार करू लागलेत आणि त्यामुळे सगळ्या बांधकाम व्यवसायाचे धाबे दणाणलेत. थोड्या फार प्रमाणात सामान्य जनतेच्या बाबतीतही अनेक पद्धतीमध्ये बदल घडून येत आहेत. सिंगापूरमध्ये इलेक्ट्रॉनिक पेमेंट गेली बरीच वर्षे लोकांच्या अंगवळणी पडले आहेच. नोटा किंवा नाणी हाताळण्यातला कोविड-धोका आता सगळ्यांनीच ओळखला आहे आणि मोबाईल पेमेंटचा मार्ग स्वीकारायला सुरू केला आहे. सरकारने याला चालना देण्यासाठी फूड-कोर्टातल्या स्टॉल्ससाठी खास योजना जाहीर केली. त्यांनी जर २०इलेक्ट्रॉनिक पेमेंटस स्वीकारली तर त्यांना काही रोख रक्कम इनामाखातर देण्यात येणार आहे.

सरकारने या संपूर्ण काळात देशातील आर्थिक व्यवहार थांबणार नाहीत याची कसोशीने काळजी घेतली. परंतु त्याचवेळी त्या व्यवहारांतील नियंत्रणे मात्र शिथिल न करता, तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन प्रत्यक्ष भेट झाली नाही तरी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ग्राहकाच्या प्रत्यक्ष सहीऐवजी ईमेलद्वारा इलेक्ट्रॉनिक सही घेणं किंवा फोनवरून व्यवहारास मान्यता घेता यावी आणि असे फोन कॉल्स बऱ्याच काळासाठी रेकॉर्ड करून ठेवणं असे उपाय योजण्यास उत्तेजन दिले. त्यामुळे स्टॉक बाजारात चढउतार होत असतानाही आणि

घराबाहेर जाता आलं नाही तरीही अप्रत्यक्ष भेटींतून जनतेला त्यांचे आर्थिक व्यवहार नेहमीप्रमाणेच करता आले. त्यामुळे यातून कोणत्याही प्रकारे आर्थिक घबराटीचे वातावरण निर्माण झाले नाही.

## संपवा बुवा हा सर्किट ब्रेकर!

सर्किट ब्रेकरच्या काळात बंद केलेल्या शाळा, दुकानं आणि उद्योग ह्यांना फार दिवस बंद ठेवून चालणार नाही हे सरकारच्या ध्यानी होतंच. हे निर्बंध उठविण्यासाठी सरकारने हळू हळू पावले उचलायला सुरुवात केली. सुरुवातीला चार आठवड्यांसाठी लावलेला हा सर्किट ब्रेकर जूनपर्यंत वाढविण्यात आला होता. सरकारने सर्किट-ब्रेकर उठविण्याची तीन टप्प्यांतील योजना ठरवली होती. यातील पहिला टप्पा १ जून रोजी लागू करून त्यात काही व्यवहार सुरू करण्यात आले. सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळता पाळताच, कारखान्यांना आणि कार्यशाळांना काम सुरू करण्याची परवानगी मिळाली. ज्या कार्यालयांना रिमोट-वर्किंग शक्य नव्हतं त्यांना किंवा ज्यांच्या कामांमध्ये जनसंपर्क नसतो किंवा कमी असतो अशांना काही प्रमाणात कार्यालयीन व्यवहार सुरू करण्यास परवानगी मिळाली. सलून्स आणि पार्लर्स, कार किंवा एअर कंडिशनिंग रिपेरिंग करणारी, किंवा शालेय गणवेश अथवा पुस्तकांची दुकानं उघडण्यात आली.

अजूनही मित्र-नातेवाईकांच्या घरी जाण्याची परवानगी नव्हती. परंतु ज्यांचे आईवडील, सासूसासरे, आजीआजोबा अशी वयोवृद्ध मंडळी जर वेगळ्या घरी राहत असतील तर त्यांना दिवसांतून एकदा भेटायला जाण्याची परवानगी केवळ दोघांनाच देण्यात आली. नेहमीच्या डॉक्टरांच्या व्यतिरिक्त इतर पारंपरिक चिनी, आयुर्वेदिक किंवा दंतचिकित्सा अशी औषधोपचार केंद्रे उघडण्यासही परवानगी देण्यात आली. रुग्णालयांतूनदेखील इतर बाह्य-रुग्ण चिकित्सा आणि इतर सेवा सुरू करण्यात आल्या. धार्मिक स्थळांतून फक्त एकाच कुटुंबातील खाजगी कार्यक्रम जास्तीत जास्त पाच व्यक्तींना सोशल डिस्टंसिंग सांभाळून करण्याची परवानगी देण्यात आली. इतर धार्मिक कार्यक्रम केवळ मुख्य विवाहनोंदणी आणि अंतिमसंस्कारापुरतेच तेही जास्तीत जास्त दहा व्यक्तींनाच करता येणार होते. घरकाम करणाऱ्या मोलकरणी पूर्वी त्यांच्या साप्ताहिक सुटीच्या दिवशी एकमेकींना एकत्र भेटायच्या. ह्या भेटीवर सर्किट-ब्रेकरदरम्यान लावलेली बंदी अजूनही कायम ठेवली होती.

## फेज -१ :

फेज-एकमध्ये सरकारने शाळांना साप्ताहिक पद्धतीने आलटून पालटून शाळेत आणि घरून वर्ग चालविण्यास सांगितले आणि फक्त केवळ बोर्डाच्या परीक्षांना बसणाऱ्या इयत्तांतील विद्यार्थ्यांनाच रोज शाळेत येण्यास

परवानगी दिली. कॉलेज आणि विद्यापीठांतून विद्यार्थी फक्त प्रयोगशाळेपुरतेच येऊ शकणार होते, बाकी व्याख्याने ऑनलाईन चालूच राहिली होती.

## फेज-२:

फेज-दोनमध्ये ह्या सगळ्या उपाययोजनांचे यशस्वी फलित म्हणूनच सरकारने पुढे दोन आठवड्यांतच अजून काही व्यवहार सुरळीत करण्याची तयारी केली. यात सार्वजनिक फूड-कोर्ट्समध्ये बसून खाण्यास, सर्व दुकाने आणि जिम उघडण्यास, त्यापुढे जुलै महिन्यात सिनेमागृहेही उघडण्यास परवानगी दिली. सध्या सार्वजनिक जागी जास्तीत जास्त पन्नासजणांना सोशल डिस्टंसिंग पाळून एकत्र येण्याची परवानगी मिळाली आहे. काही पर्यटनस्थळे जसे जुरॉन्ग बर्डपार्क आणि प्राणीसंग्रहालयेसुद्धा उघडण्यात आली आहेत. यामुळे गेले दोन महिने स्थिरावलेल्या अर्थव्यवस्थेला थोडीबहुत चालना मिळाली आहे.

एकूण, सिंगापूरसारख्या छोट्या आणि संपूर्ण परावलंबी देशाने आतापर्यंत ह्या संकटाला संपूर्ण जोमाने आपल्या नागरिकांसोबतच, देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या परदेशी कामगारांचीही जबाबदारी उचलून मोठ्या धीराने लढत दिली आहे. अर्थव्यवस्था खिळखिळी होऊ नये म्हणून सरकार अजूनही नवनवीन योजनांवर काम करतेच आहे. नुकतीच सरकारने जवळजवळ आठ हजार घरांच्या तीन नवीन गृहनिर्माण प्रकल्पाची आणि स्थानिकांना रोजगार दिल्यास त्यांच्या २५% रोजगाराइतकी मदत उद्योगांना देण्याची योजना जाहीर केली आहे. इतके सगळे आशावादी निर्णय घेऊन सिंगापूर सरकारने जनतेला ह्या कोरोनाच्या संकटाचा सामना करण्यासाठी प्रचंड ताकद दिली आहे.

# कोविड-१९सह जगताना...

## हेरंब निरगुडकर
## प्राची पालेकर-निरगुडकर

**हेरंब निरगुडकर**
व्यवस्थापक, विपणन विभाग
कमिन्स, इंडियाना, अमेरिका
heramb@gmail.com

**प्राची पालेकर-निरगुडकर**
माहिती तंत्रज्ञान धोरण विश्लेषक
कमिन्स, इंडियाना, अमेरिका
prachee.palekar@gmail.com

स्वत:बद्दल, आपल्या कुटुंबाबद्दल, मित्रपरिवाराबद्दल, परिचितांबद्दल आणि अगदी पूर्ण अपरिचित व्यक्तींबद्दलही आपण कसा विचार करतो, हे करोना विषाणूने आपल्या लक्षात आणून दिले आहे.

भारत किंवा पूर्वेकडील देश हे कुटुंब आणि समाजाशी अधिक जोडलेले देश आहेत. त्यामानाने अमेरिका कुटुंबापेक्षा 'व्यक्ती'ला महत्त्व देणारा देश आहे, असे आम्हा दोघांना नेहमीच वाटत आले आहे. त्यामुळेच अमेरिकन लोकांनी व्यक्तीच्या आविष्कारस्वातंत्र्याला वाव देणारी शासनव्यवस्था निर्माण केली आहे. काही अडचण किंवा संकट आले तर कुटुंबाने किंवा समाजाने त्यावर मार्ग काढण्यापेक्षा सरकारच मार्ग काढते. याची सवय झाल्यामुळेच 'मी काय करायला हवं ते मला कोणी सांगू नये' अशी सामान्य माणसांची अतेरिकी व्यक्तिस्वातंत्र्याने भारलेली प्रतिक्रिया असते.

उद्योगव्यवसाय, कला किंवा क्रीडाक्षेत्रामध्ये वेगवेगळे नवनवीन प्रयोग करण्यासाठी, संधी शोधण्यासाठी किंवा संधी निर्माण करण्यासाठी ही स्वातंत्र्याची कल्पना खूप उपयुक्त ठरते. भारतातील माणसे कुटुंबाने किंवा समाजाने निश्चित केलेली उद्दिष्टे, ध्येय साध्य करण्यासाठी बव्हंशी आपल्या कुटुंबावर किंवा समाजावरच अवलंबून असतात. त्यांनी आखून दिलेल्या मार्गांनीच ती चालत राहतात. याचा एक फायदा असा असतो की आखून दिलेल्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या त्या व्यक्तीला कुटुंबाचे, समाजाचे एक सुरक्षाकवच आपोआपच मिळते, जे अमेरिकन माणसाला मिळत नाही.

कोविड-१९ सारख्या महाभयंकर महामारीच्या विळख्यात सापडल्यावर या दोन भिन्न धारणा असलेल्या देशांमध्ये काय घडतं, हे विचार करण्यासारखे आहे.

अमेरिकेतील काही शहरांमध्ये या महामारीचा भयंकर उद्रेक झाल्याचे आम्ही सुरुवातीला पाहिले. चीनमधील प्रशासनाने जे काही केलं त्याचे अनुकरण करीत इथल्या शहरांच्या महापौरांनी / राज्यपालांनी ताबडतोब लॉकडाऊन जाहीर केला. (अमेरिकत प्रत्येक शहराच्या महापौराला आपल्या शहरासाठी अनेक निर्णय घेण्याचे अधिकार घटनेनेच बहाल केलेले असतात.) त्यांनी ताबडतोब अत्यावश्यक सेवा कोणत्या, ते निश्चित करून त्या चालू राहतील याची दक्षता घेतली. परंतु सुरक्षिततेचे नियम-संकेत जाहीर करून ते पाळणं अनिवार्य केलं. महत्त्वाचे आर्थिक व्यवहार, दळणवळण, घरगुती दुरुस्तीची कामे (प्लंबिंग, वीज इत्यादी) या सर्वांना अत्यावश्यक सेवा म्हणून जाहीर करून त्या चालू ठेवल्या. व्यायामशाळा, केशकर्तनालये, हॉटेल्स इत्यादी पूर्ण बंद ठेवली. सुरुवातीला सरकारवरील विश्वास आणि या विषाणूविषयीचे अपुरे ज्ञान यांमुळे लोकांनी सर्व नियमांचे पालन केले.

अमेरिकेत लोक बव्हंशी कायदे काटेकोरपणे पाळतात. जर कायद्याचे पालन केले नाही तर कारवाई होतेच होते, हे माहीत असल्यामुळे लोक कायदे-नियमांचे तंतोतंत पालन करतात. त्यामुळेच जेथे जेथे या साथींचा उद्रेक झाला, तेथे तेथे सरकारने कार्यालये, रेस्टॉरंट्स बंद ठेवण्याचे, मास्क वापरण्याचे कडक नियम जाहीर केले आणि लोकांनीही ते पाळले. मात्र काही आठवड्यांनंतर कार्यालये सुरू करण्यासाठी लोकांनी सरकारवर दबाव आणण्यास सुरुवात केली, त्यांना रोजचे व्यवहार, विशषेत: रोजगाराची कामे पूर्ववत चालू व्हायला हवी होती! त्यामुळे ज्यांना सरकारी नियमांचे पालन करायचे होते आणि ज्यांना मास्क आदी प्रतिबंधात्मक उपायांचा अडसर वाटत होता, अशा भिन्न मतांच्या नागरिकांचे दोन तट पडले. अखेरीस जसजसा मृत्यूदर कमी होऊ लागला तसतशी बंधने काळजीपूर्वक फुरसत होऊ लागली.

कोरोनाकाळात बदलत असलेल्या जीवनाशी सांधा जोडणं हे सामाजिक, आर्थिक स्तराप्रमाणेच कौटुंबिक स्तरावरही एक आव्हान आहे, याची जाणीव आम्हाला प्रकर्षाने झाली.

मार्च महिन्यापासून कोविड-१९नेही जोर धरला. अर्थात, ही साथ न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया, सियाटल इथे आली आहे, तिथले जनजीवन थांबले आहे. पण आपल्याला काही त्रास नाही, अशी आमची त्यावेळची पहिली प्रतिक्रिया होती. आम्हाला आठवतंय की आमच्या राज्यात इंडियानामध्ये कोविडचा पहिला रुग्ण सापडला तेव्हाही आम्ही मित्रमैत्रिणींनी कॉफी घेत घेत त्याच्यावर आरामात चर्चा केली! नेहमीसारखेच दुसऱ्या दिवशी ऑफिसला गेलो. कामे संपवता संपवता केबिनमधील व्हाईटबोर्डवर 'फ्लॅटन द कर्व्ह' (कोविडचा चढता आलेख सपाट करणे – म्हणजे साथ आटोक्यात आली असे मानणे) असा संदेश होता.

सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे लवकर तयार झालो तर 'ऑफिस बिल्डिंग्स बंद केल्या आहेत. पण पाळणाघरे चालू राहतील.' असा ईमेल आला होता. मात्र त्यानंतर लगेचच (चोवीस तासात) पाळणाघरेही पुढील सूचना येईपर्यंत बंद राहतील असा निरोप आला. स्वाभाविकच, व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि वाढीव कौटुंबिक जबाबदाऱ्या एकाच अवकाशात आल्यामुळे निर्माण झालेले अनेकस्तरीय आव्हान अचानक समोर येऊन उभे राहिले.

मार्च आणि एप्रिल हे महिने फार आव्हानात्मक होते. घरातील कामे, स्वच्छता, मुलींची दंगामस्ती, मीटिंग्स, रात्री ऑफिसचे काम, पहाटे लवकर उठून ऑफिसचे काम. त्याने येणारा ताण, काहीशी चिडचिड... ते दोन महिने म्हणजे उचंबळून येणाऱ्या भावना, नैराश्य, ऑफिसच्या कामामध्ये काही साध्य केल्याचा आनंद याचा 'रोलर कोस्टर' होता. पण बव्हंशी आपण हरलो आहोत, अशी भावना अनेकदा मनात दाटून यायची! विश्रांतीला, शांतपणे बसून विचार करायला, बदल करायलाही फुरसत नसायची.

असं म्हणतात की, 'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे' पण मला तर ही म्हण पटत नव्हती. घर आणि ऑफिस सगळं आपल्या हातातून निसटत चाललं आहे, ही भावना मनात तीव्र होण्याचा तो काळ होता. कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची कसरत करताना आपण धड कशालाच न्याय देऊ शकत नाही आहोत हा अपराधी भाव मनात घर करत होता. परंतु या काळात, वयाने लहान असलेल्या (वय वर्षे ४) पण समजुतीने प्रगल्भ असलेल्या माझ्या मुलीने 'ममा रडू नकोस! तू हरली नाहीयेस- आमच्यावर प्रेम करण्यानं तू कुठे हरली आहेस... अगं तू तर आमचे सारखे किती लाड लाड करीत असतेस!' असं आश्वासकपणे म्हणत घातलेली समजूत आई-मुलीच्या नात्यामधील 'मर्मबंधातील ठेव' ठरावी.

या संकटाशी दोन हात करताना इतर समवयस्क मैत्रिणींच्या बाबतीत काही सकारात्मक बदल झालेले माझ्या लक्षात आले. नोकरी करणाऱ्या अनेक अमेरिकन महिलांनीही आपल्या मुलांसाठी नोकऱ्या सोडल्याचे दिसून आले. विशेषत: ज्यांची मुले खूप लहान आहेत किंवा ज्यांची प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे त्या मुलांकडे सतत लक्ष देणे भाग आहे, अशा मुलांच्या आयांनी पूर्ण वेळ घरी राहणे पसंत केले आहे. (अमेरिकेत आपल्याप्रमाणे निवृत्तीनंतरचे फायदे मिळण्यासाठी सलग नोकरीत असणे आवश्यक नसते. खूप लोक आपल्या मनाप्रमाणे इतर काम करण्यासाठी, छंद जोपासण्यासाठी, शिकण्यासाठीही नोकरी सोडून देतात व पुन्हा काही वर्षांनी नोकरी चालू करतात.) या उलट अनेक स्त्रिया, ज्या आधी बऱ्याच वर्षांपूर्वी शाळेमध्ये अध्यापन करीत होत्या त्यांनी घरून झूमवर पुन्हा शिकवायला सुरुवात केली! त्या घरबसल्या कमावू लागल्या, कारण ऑनलाइन शिक्षण चालू झाले!

ज्या कुटुंबांमध्ये पतिपत्नी दोघेही करिअर करीत होते त्यांच्या घरात आतापर्यंत घरातील कामांची विभागणी मात्र समान नव्हती. पत्नीवरच घरातील कामांचा ताण अधिक असायचा. या काळात मात्र या विभागणीत चांगला बदल झाला, अनेक पुरुष घरातील कामांची जबाबदारी बरोबरीने उचलू लागले! इतकेच नव्हे, शाळेत जाणारी मुलेही आता पूर्णवेळ घरी असल्याने आईचे कष्ट जवळून पाहू लागली व स्वतःहून घरकामात मदत करू लागली. इथे घरातील प्रत्येक जण आपापला मोबईल/टॅब/लॅपटॉप घेऊन स्वतःला आवडणारे मनोरंजनाचे कार्यक्रम आपापल्या खोलीत बसून पाहत असे. पण आता सगळे घरातच असले तरी त्यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम आणि वेळ एकच होऊ लागली आहे. सगळे एकत्रच टी. व्ही. पाहतात! एकत्र राहणे, एकत्र घरकाम/ बागकाम करणे, एकत्र टी. व्ही. पाहणे यातली मजा कुटुंबातील सगळ्या सदस्यांना उमगू लागली आहे.

कोरोनाकाळातील या परिस्थितीचा अमेरिकेतील जनतेवर फार वेगळा परिणाम झाला. अमेरिकेतील इंडियाना राज्यातील कोलंबस या छोट्या शहरात आम्ही वास्तव्यास आहोत. इथे शहरांची रचना शिस्तबद्ध रीतीने केलेली असून प्रत्येकाची घरे स्वतंत्र व दूरदूर आहेत. बहुतेक लोक एकाच कंपनीमध्ये काम करणारे असल्याने एकमेकांशी थेट मैत्री असते किंवा मित्रांचे मित्र म्हणून एकमेकांशी ओळख असते. इथल्या लोकांची एकमेकांशी घट्ट मैत्री असण्यापेक्षा केवळ परिचय असणारे लोक जास्त असतात. असं असलं तरी जेव्हा कोविडची साथ सुरू झाली तेव्हा अगोदरपासून असलेला फेसबुक ग्रुप एकदम कार्यरत झाला! रोजच्या जेवणासाठी लागणारे धान्य-भाजी-दूध इत्यादी आणायला दुकानात जायला जे वयस्क, एकटे राहणारे लोक घाबरून होते त्यांना शेजाऱ्यांनी स्वत:हून सामान आणून देण्यास सुरुवात केली. काहींनी आपल्या घरासमोरील मार्गिकांवर खडूने काही आकृत्या काढून त्यांच्या आधारे फिरायला जाणाऱ्या व घरात तेच तेच खेळ खेळून कंटाळलेल्या कॉलनीतील सर्वच मुलांसाठी खेळ तयार करून ठेवले. एकमेकांसाठी जीवनावश्यक सामान आणण्यासाठी पुढाकार घेणे असेल किंवा सगळ्यांच्या मुलांनी खेळावे, मजा करावी म्हणून काढलेली चित्रे, आकृत्या असतील किंवा आभार मानणारी भेटकार्डे असतील या छोट्याछोट्या गोष्टींतून शेजाऱ्यांशी परिचय वाढला. एकमेकांच्या जवळ येण्याची संधी उपलब्ध झाली. शरीराने माणसांना एकमेकांपासून दूर ठेवणाऱ्या कोविडसारख्या या आजाराने माणसांना मनाने मात्र एकमेकांच्या जवळ आणले. या भयंकर आजाराच्या साथीने शेजाऱ्यापाजाऱ्यांना जवळ आणले, त्यांच्यामध्ये मैत्रीचे नवे बंध निर्माण केले तसेच कुटुंबातील माणसेही अधिक जवळ आली, हा लक्षणीय बदल झाला.

इथे अमेरिकेत पूर्ण अपरिचित लोकांबरोबर असणारे आमचे वर्तनही निश्चित बदलले आहे. कोविडमुळे अनेक उद्योगव्यवसाय हे अनावश्यक ठरू लागले, काही पूर्ण बंद पडले तर काहींचे कामाचे तास कमी झाले. रेस्टॉरंटमध्ये आत बसून खाण्यावर बंदी आली; केवळ पार्सल्स मिळू लागली. येथील बरीच रेस्टॉरंट

ही एका एका कुटुंबाने चालवलेले छोटे छोटे व्यवसाय होते. यासंदर्भात रोग नियंत्रण केंद्राने (Centre for disease control - CDC) मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. त्यांच्या निर्देशानुसार अन्नातून कोरोना विषाणूच्या फैलावाच्या शक्यतेला कोणताही आधार दिसत नाही. त्या कुटुंबांचा व्यवसाय व रोजीरोटी चालू राहावी म्हणून आम्ही व आमच्या अनेक मित्रांनी अशा ठिकाणांहून गरजेनुसार अन्नपदार्थ मागवण्यास सुरुवात केली. पूर्वी आम्ही सरसकट सर्व खरेदी ॲमेझॉनवरून करीत होतो, ती आता कटाक्षाने आमच्या परिसरातील लहान व्यावसायिकांकडूनच जास्तीत जास्त करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आपण सगळे एकाच संकटात अडकलो आहोत त्यामुळे एकमेकांना मदत करीत, आधार देत यातून बाहेर पडले पाहिजे आणि एकोपा टिकवला पाहिजे, अशी भावना आता येथे निर्माण झाली आहे.

कोणत्याही नैसर्गिक आपत्तीनंतर समाजात काही बदल निश्चितपणे होतात. काही बदल मोठे-मूलभूत असतात तर काही लहान-वरवरचे. काही बदल चांगले तर काही वाईटही! समाजाच्या एकूण ताण्याबाण्यावर कोविडचा दूरगामी काय परिणाम होईल, हे आत्ताच सांगता येणार नाही. यातील काही बदल तात्पुरते असतील आणि सर्व काही सुरळीत झाल्यावर आपलं जगणं-वागणं ताबडतोब पूर्ववत होईल.

कोरोनाकाळात आम्हाला कौटुंबिक पार्श्वभूमीवरील आणि नोकरी-व्यावसायिक पातळीवरीलही ज्या ज्या बदलांना सामोरे जावे लागले त्यातील काही बदल आमच्या व आम्ही काम करत असलेल्या कंपनीच्या दृष्टीने सकारात्मक होते तर काहींमुळे वेगळी आव्हानेही निर्माण झालेली आहेत.

कोविडचे संकट हा उद्योगव्यवसायाला प्रचंड धक्का होता. आम्ही दोघे तसेच कॉलनीतील बरेच जण ज्या कंपनीत नोकरी करतो ती Cummins कंपनी १०० वर्षांची जुनी बहुराष्ट्रीय कंपनी आहे. या कंपनीने यापूर्वीचे असे अनेक चढउतार पाहिले आहेत हे एका संस्थेचे सदस्य म्हणून आम्हाला ज्ञात आहे. कंपनीने मंदीचे संकट कसे हाताळले, याच्या नोंदी आमच्याकडे टिपून ठेवल्या जातात. मंदीचे कारण प्रत्येकवेळी वेगवेगळे असले तरी त्याचा व्यवसायावर परिणाम तोच, तसाच होतो. मग तो १९९० चा तेलाच्या समस्येचा असो किंवा २००१ चा डॉटकॉमचा बुडबुडा असो नाहीतर २००८ची जागतिक अर्थमंदी!

आम्ही पुरवठादारांनी ठरवलेल्या मालाच्या किंमती कमी करून घेतो, बाजारात ओतलेले भांडवल कमी करतो. आमच्या ग्राहकांनी मागणीच्या संदर्भातील आमच्या अडचणी समजावून घ्याव्यात, यासाठी प्रयत्न करतो आणि शेवटचे म्हणजे या सर्वांसाठी आवश्यक तेवढीच माणसं त्या काळात कामावर ठेवतो. हे जरी इतक्या वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झालेले मार्ग असले तरी कोविड विषाणूने मात्र आम्हाला याहून मोठा धडा शिकवला आहे.

## मागणीच्या अंदाजाचा अभाव

यापूर्वी आलेल्या मंदी / आर्थिक अरिष्टांचा अनुभव पाठीशी असल्यामुळे मंदीच्या काळात भविष्यवेध कसा घ्यायचा, याचा अंदाज कंपन्यांना होता पण आत्ता चालू असलेली महामारी अभूतपूर्व असल्याने कोणतीही कंपनी भविष्याचा वेध घेण्यास धजावत नाही.

## मागणीमध्ये अभूतपूर्व घट

यापूर्वीच्या आर्थिक अरिष्टांच्या काळात प्रत्यक्ष मंदी येण्यापूर्वी तिचा थोडाफार अंदाज येत असे. त्यामुळे भविष्यातील योजनांची तयारी अगोदरच करून ठेवता येत असे. उदा. २००८ या वर्षाच्या अखेरीस आर्थिक मंदी सुरू झाली. परंतु तिचा अंदाज मे-जूनमध्येच आलेला होता. परंतु करोना विषाणूच्या प्रकोपाच्या आधी जेमतेम एक महिनाही हाताशी मिळाला नाही.

## आश्चर्यकारक चढउतार

सर्वसाधारणपणे मंदीच्या काळात मौजमजा करण्यासाठी वापरली जाणारी वाहने, हौशी मच्छिमारी होड्या आदी चैनीच्या वस्तूंची मागणी एकदम घसरते. परंतु या विषाणूच्या फैलावाची पद्धत पाहता लोकांना बाहेर तर पडायचे होते पण महागड्या हॉटेल्समध्ये जायचे नव्हते किंवा विमानप्रवास करायचा नव्हता. अशा लोकांनी खाजगी वाहने, होड्या यांना पसंती दिली आणि आमच्या अंदाजाच्या बरोबर उलटे घडले. कमिन्स या क्षेत्राला लागणारी इंजिन्स तयार करते, तेथे मागणी कमी होईल असा आमचा अंदाज होता पण लोकांची मौजमजेची साधने अचानक बदलल्याने या इंजिन्सनाच खूप मागणी येऊ लागली! त्यांचा खप अचानक वाढला. अशा प्रकारे अन्य क्षेत्रात विक्री कमी झाली तर काही क्षेत्रांमध्ये ती वाढलीदेखील!

## कंपनीतील कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि उपाययोजना

आम्ही आमच्या पुरवठादारांकडून स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणाची साधने घेत असतो. त्यामुळे त्यांच्याकडे पुरेसा साठा आहे याची आम्ही खात्री करून घेतली. कमिन्स इंधन आणि हवेचे फिल्टर्स बनवते. आमच्या पुरवठादारांना आम्ही त्यांच्या साधनांमध्ये सुधारणा आणि सध्याच्या परिस्थितीशी मिळतेजुळते करून घेणारे योग्य बदल करण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे तर कंपनीने स्वत:चे ‘N95’ मास्क बनवण्यास सुरुवात केली.

जगभरातील इतर कंपन्यांमध्ये 'कमिन्स' या बहुराष्ट्रीय कंपनीला मालाची मागणी कमी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना कमी करावे लागले. कमिन्सने अनेक विभागातील कर्मचाऱ्यांचे पगार २०% टक्क्यांनी कमी केले आणि त्यांच्या कामामध्येही २०% कपात करण्यात आली. यासंदर्भात संचालक मंडळाने असा विचार केला आहे की आत्ता २०% लोकांना कामावर काढून पुन्हा ६ महिन्यांनी कामावर घ्यायचे असे करण्यापेक्षा सर्वच कर्मचाऱ्यांचे पगार २०% कमी करायचे व स्थिती पूर्वपदावर आल्यावर पुन्हा पूर्वीप्रमाणे पगार द्यायचे. हा सर्वच कर्मचाऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्यात आला आहे.

आपल्यापैकी कोणालाच ही वैश्विक आपत्ती कधी संपेल याची काहीच कल्पना नाही. तसेच प्रत्यक्षात त्याचे वेगवेगळ्या उद्योगव्यवसायांवर किती व कोणते दूरगामी परिणाम होणार आहेत याचाही अंदाज नाही. घरून काम करण्याची मुभा दिली तर कर्मचारी उत्पादन करू शकतात व हे कंपनीला उपयुक्त ठरतात, हे आज कंपन्यांना कळले आहे. त्यामुळे कदाचित यापुढील काळात कामाची पद्धती बदलू शकेल. कदाचित असे नवे पर्याय स्वीकारले जातील.

अमेरिकेपुरते बोलायचे झाले तर न्यूयॉर्क किंवा कॅलिफोर्निया ही शहरे राहण्यासाठी अत्यंत महागडी आहेत. पण तेथे असलेल्या कंपन्या शहरांबाहेरील, छोट्या गावांत राहणाऱ्या लोकांकडे जर त्या कामाचे कौशल्य असेल तर त्यांना काम देऊ शकतात. महागड्या शहरातील रहिवाशांना त्या शहरांच्या महागाईनुरूप मोठे महागाईभत्ते देणे कंपन्यांना भाग पडते पण लहान गावातील कर्मचारी कामावर घेतले. उदाहरणार्थ, अलाबामा किंवा लोवा. या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचा दर कमी असल्याने तिथले कर्मचारी घेतले तर त्यांना कमी पगार देऊनही काम करून घेता येईल, असा विचार कंपन्या करतील. तसेच महागड्या शहरात ऑफिसची जागाही प्रचंड खर्चिक असते. कर्मचाऱ्यांनी घरून काम केले तर या आणि इतर आनुषंगिक खर्चांतही कपात करता येईल. ही कार्यशैली स्वीकारली तर क्लाऊड सोल्यूशन्स, इंटरनेट सिक्युरिटी, 5G आदींची मागणीही वाढेल आणि या क्षेत्रांनाही मोठी चालना मिळेल.

थोडक्यात, कोविडनंतरच्या विश्वातील 'सर्वसाधारण कामकाज' या शब्दांचा अर्थ आजच्या 'सर्वसाधारण कामकाज' या शब्दांपेक्षा निश्चितच वेगळा असेल!

# कोरोनोत्तर शिक्षणक्षेत्र : आपत्तीतून बदलाची सुखद आशा

**दीपक करंजीकर**

अभिनेता, लेखक, समाजकारण आणि अर्थकारण अभ्यासक
मुंबई
deepak.karanjikar@gmail.com

१९१८च्या स्पॅनिश फ्ल्यूच्या साथीनंतर बरोबर शंभर वर्षांनी कोरोना या विषाणूचा उद्रेक झाला आहे. गेले जवळपास ८ महिने याच्या लाटेत सगळे जग लपेटले गेले आणि जगाची घडी संपूर्ण विसकळीत झाली. आता हे अगदीच सिद्ध होते आहे की ही चीनची जगाला देन आहे आणि त्याबद्दल चीन जराही शरमिंदा नाही. विषाणू हे संघर्षाचे नवे हत्यार असल्याचा बोध घेऊनच आता आपल्याला जगायचे आहे.अजूनही लस उपलब्ध नाही आणि झाली तरी मुळात कोरोना विषाणू न सापडल्याने आणि त्याच्या परिणामांविषयी संशोधन करून ती लस शोधण्यात येत आहे, अशा परिस्थितीत कोरोना हे संकट अजून वर्षभर तरी आपल्या सगळ्यांच्या आयुष्यावर टांगलेले आहे हे नक्की. लस आल्यावरसुद्धा तिची परिणामकारक शक्ती, तिचा या विषाणूच्या सर्व लक्षणांना अटकाव करू शकेल असा प्रभाव समजायला वेळ लागेल.आपण जिथे आहोत तिथे आहोत आणि जसे आहोत तसे आहोत.

कोरोनाच्या संकटाने जगातील सगळ्याच राष्ट्रांना मंदीकडे ढकलले आहे. एका सर्व्हेनुसार जगाचे दरमाणशी उत्पन्न १८७० नंतर पहिल्यांदा इतक्या वेगाने खाली घसरले आहे. जगातील एकूण व्यापारात ९.५ % ते १२ % इतकी घट झाली आहे. साधारण हा आकडा दरवर्षी २-३% इतका वाढत असतो. जगाने गेल्या पंधरा वर्षांत केलेली प्रगती आणि मोठ्या मेटाकुटीने दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या वर आणण्याचे सारे काम पूर्ववत होण्याचा धोका अगदी सुस्पष्ट आहे. यात अजून एक बाबही घडेल जी कदाचित या दुःखाला असणारी चंदेरी किनार असेल आणि ती म्हणजे यामुळे गेल्या दोन दशकांतील सगळ्या आर्थिक अफरातफरी आणि लेखा घोटाळे यामुळे उघडे होतील आणि या सगळ्या वित्त व्यवस्थापनातील त्रुटी बाहेर आल्याने नव्याने पारदर्शक पुनर्रचना करणे सोपे होईल; जे एरवी घडू दिले गेले नसते. अजून एक म्हणजे,

कधी नव्हे ते तेलउत्पादन आणि मागणी इतकी दीर्घकाळ कोसळली आहे की ज्याचा जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर मोठा परिणाम अपेक्षित आहे. याचे कारण जगाची जी अर्थव्यवस्था फुगवण्यात तेलाचा फार मोठा हातभार होता, तीसुद्धा एक सूज होती. तेल हे जगाच्या अर्थकारण-राजकारणाचे जणू इंजिन झाले होते. एका अंदाजानुसार कोरोनाने जगाच्या अर्थव्यवस्थेला तब्बल चार ट्रीलीयन डॉलर्सचे भगदाड पाडले आहे आहे. (जगाचा जीडीपी १४५ ट्रीलीयन डॉलर्स इतका आहे).भारताने आतापर्यंत २६ लाख कोटी रुपयांच्या उत्पन्नसंधी गमावल्या आहेत. (३८० बिलियन डॉलर्स)

खालील तक्त्यात भारताच्या विविध क्षेत्रांवर झालेला परिणाम दिसतो आहे –

| क्षेत्र | जीडीपी शेअर | रोजगार (आकडे लाखात) |
|---|---|---|
| Airlines and hotels | २ | ८० |
| Auto and advanced industries | २ | ** |
| Construction and real estate | ८ | ५४० |
| Textiles | २ | ** |
| Freight and logistics | ८ | २२० |
| Metals and mining | ७ | ** |
| Oil and gas | ७ | ** |
| Power | २ | ३ |
| Consumer and retail | ११ | ० |
| Chemicals | २ | ४७० |
| Agriculture | १५ | २०५० |
| IT services | ५ | ४० |
| Pharmaceuticals | १ | ** |
| Telecommunications | २ | १० |

**** उत्पादन क्षेत्र एकूण ५७० लाख**

यातून असे लक्षात येईल की शेती आणि उत्पादन या प्रक्रिया मार्गी लागल्या तरी आपण जवळपास २५ कोटी रोजगार सुरक्षित करू शकतो, चांगला पाऊस झाला तर शेती नक्कीच रोजगारात मोठा वाटा उचलेल आणि सरकारच्या आत्मनिर्भर योजेनेत उत्पादनवाढ होईल. अर्थात, हे सगळे सावकाश होईल हे मात्र नक्की. हे अशासाठी सांगितले की, या सगळ्या क्षेत्रांच्या बळकटीकरणावर शिक्षण आणि आरोग्य ही क्षेत्रे उभी असतात. कारण सरकार मूलत: त्यांना जबाबदार असल्याने सरकारकडे जर महसूल आला नाही तर सरकार आर्थिक तरतुदी करू शकत नाही आणि इथे एक चांगली बातमी म्हणजे शिक्षणपद्धतीत यानिमित्ताने जर बदल झाला तर ती कमी खर्चाची बाब होईल आणि मग ते सगळ्यांपर्यंत पोहोचवणे सोयीचे होऊ शकते, पण त्याच्या तपशिलात नंतर जाऊ या.

आधी भारताचे थोडे विवेचन करतो, यापुढे भारताची वाढ डिजिटल माध्यमाने होईल. कारण आपण आता तंत्रज्ञान आणि पारंपरिक जीवनपद्धतीच्या चौफुल्यावर उभे आहोत. बँकिंग क्षेत्रातील जन-धनने नेमके काय साध्य केले असेल तर बँकिंग रडारवर जवळपास ३० कोटी लोकसंख्या आणली आणि तीही केवळ दोन वर्षांत. यामुळे लोकांना आर्थिक व्यवहारात रोखीशिवाय एक मार्ग मिळाला. शहरातील काही धनदांडगे अजूनही रोखीच्या आणि ज्याचा माग काढता येणार नाही असे व्यवहार करत आहेत हे मला मान्य आहे. पण ग्रामीण भागातील लोक किंवा किरकोळ विक्रेते मोठ्या प्रमाणावर डिजिटल व्यवहार करू लागले आहेत. शिक्षण क्षेत्रातील ऑनलाईन पद्धतीसाठी डिजिटल व्यवहारांची व्यवस्था उपलब्ध असणे ही मोठी गोष्ट आहे. सर्वदूर आणि दूरवर पसरलेल्या ग्रामीण मुलांच्या शिक्षणासाठी या डिजिटल व्यवस्थेचा मोठा हातभार लागणार आहे. समजा जर हे उलटे असते म्हणजे कोरोना आला असता आणि कोणत्याही कारणाने का होईना, पण डिजिटल व्यवस्था नसती किंवा सगळ्यांची बँक खाती नसती तर हे फार अशक्य झाले असते. आज दुसऱ्या कारणामुळे डिजिटल व्यवस्था उभी राहिली आणि आता तीच ऑनलाईन शिक्षणपद्धतीला प्रचंड फायद्याची ठरणार आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीवरून ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा हा बदल किती पटकन झाला हे आपण पाहतो आहोत. अगदी अनागरी भागातसुद्धा ऑनलाईन व्यवस्थेत मोबाईल वापरून मुले केलेला अभ्यास शिक्षकांना पाठवतात आणि त्यावरून शिक्षक त्यांना मार्गदर्शनही करतात, हे दृश्य फार सुखद आहे. मुलाला बालवयात याची सवय होणे हे फार मोलाचे अशासाठीही आहे की इथून पुढे शिकण्यासाठी त्याची तयारी यातून झालेली असेल. मध्यंतरी एका सेमिनारमध्ये माझ्या परिचयाच्या एका अमेरिकन प्राध्यापकाने ग्रामीण भारताने हे तंत्रज्ञान किती पटकन शिकून घेतले याचे आश्चर्य व्यक्त केले आणि तो पुढे म्हणाला ही मुले उद्याच्या जगातील डिजिटल व्यवस्थेसाठी किती मोठ्या प्रमाणात तयार होतील याचा अंदाज तुम्हाला अजून ५-१० वर्षांनी येईल. कोरोनाच्या काळ्या ढगांना ही चंदेरी किनार आहे.

## कोरोनाचे सामाजिक पेच


सर्वसाधारण माणूस हा सामाजिक प्राणी आहे आणि त्यातल्या त्यात भारतीय समाज तर जास्तच सामाजिक वीण असणारा आहे. त्याच्या दैनंदिन जगण्यात परस्परावलंबित्व आहे. एकमेकांवर अवलंबून असणारी, एकमेकांचा सततचा सहवास आवडणारी जीवनपद्धती एकदम बदलणे फार अवघड आहे. अर्थतज्ज्ञ आणि रिझर्व्ह बँकेचे उप गव्हर्नर असणारे डॉ. नरेंद्र जाधव म्हणतात की, सुदृढ अर्थव्यवस्था, सुदृढ समाज आणि सुदृढ लोकशाही यापैकी एकावेळी दोनच गोष्टी अस्तित्वात असू शकतात. म्हणजे लोकशाही आणि समाज सुदृढ ठेवायला गेले तर अर्थव्यवस्था सुदृढ राहीलच याची शाश्वती नाही, जर अर्थव्यवस्था आणि समाज

सुदृढ ठेवायचे असेल तर काही बंधने टाकावी लागतात. ज्यामुळे लोकशाही धोक्यात येईल अशी बोंब उठते. जर अर्थव्यवस्था आणि लोकशाही सुदृढ ठेवायची असेल तर समाजाची हेळसांड होऊ शकते. कारण समाज एकजिनसी नसतो आणि त्याला अर्थव्यवस्थेच्या एकाच चौकटीत बांधता येत नाही. हा जो पेच आहे तो या कोरोनामुळे जास्तच अधोरेखित झाला आहे. त्याचा परिणाम सगळ्यात जास्त शिक्षणक्षेत्रावर होतो. कारण समाज सुदृढ असण्यात शिक्षणाचा फार मोठा वाटा आहे आणि त्यामुळे लोकशाही आणि अर्थव्यवस्था यावर लक्ष केंद्रित करून (कारण त्यांना मोठी दृश्यमानता आहे.) ते सुदृढ ठेवताना समाज बांधला जाण्यासाठी, शिक्षणाशिवाय कोणताही पर्याय नाही. या पार्श्वभूमीवर मला नवीन शिक्षण धोरण जास्त मोलाचे वाटते आणि ते कोरोनाच्या काळातच आणले गेले, हा एक योगायोग आहे. कारण यानिमित्ताने गेली सत्तर वर्षे चालत आलेल्या किंवा आंधळेपणाने चालत राहिलेल्या आपल्या शिक्षण व्यवस्थेची उपयोगिता तपासून बघता आली, हेही नसे थोडके!


कोरोनानंतरचे शिक्षणक्षेत्र कसे असेल, या प्रश्नाचे उत्तर शोधताना मला काही मुद्दे मांडायचे आहेत पण त्याआधी आपल्या शिक्षण क्षेत्राच्या सद्य:स्थितीची ही चार चित्रे पाहा.




**चित्र १ – भारताची शैक्षणिक संरचना**




**चित्र २ -ऑनलाईन शिक्षणसंधी**




**चित्र ३ – उच्चाशक्षणाताल समस्या**




**चित्र ४ - कोरोनाआधी आणि नंतरचे शिक्षणविश्व**

वरील चारही चित्रे स्पष्ट आहेत. त्यामुळे त्यावर मल्लिनाथी करण्याची गरज नाही. त्यातली चित्र क्रमांक ३ आणि ४ ज्या समस्या मांडतात त्यामुळे शिक्षण क्षेत्रात विस्ताराला किती संधी आहेत हे लक्षात येते. कोरोनानंतरच्या काळात शिक्षणक्षेत्र हे एका व्यावसायिक मार्गाने पुढे जाईल, अशी आशा करायला हरकत नाही. शिक्षणक्षेत्र एका दृष्टिपथात कसे दिसते ?

पण आणखी खोलवर जायचे म्हटले तर, वरील चित्रात नमूद केलेल्या बाबींशिवाय भारतातील विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड आहे. आपल्या देशात केजी ते बारावीपर्यंत एकूण ५० कोटी विद्यार्थी आहेत. तर एकूण शाळा

११ लाखांच्या आसपास आहेत. यात खाजगी आणि सरकारी अशा सर्व शाळा येतात. याचा एक अर्थ असा की शाळांची संख्या विद्यार्थिसंख्येला पुरेशी नाही, म्हणजे पुरेशा शाळा उघडणे आणि आहे त्या सुस्थितीत सुरू ठेवणे ही प्रचंड खर्चिक बाब आहे. ज्यासाठी गेली सत्तर वर्षे आपण पुरेशी आर्थिक तरतूद करू शकलेलो नाही. कॉलेजेसची संख्या तर अत्यंत तुटपुंजी आहे आणि त्यातूनही वैद्यकीय किंवा उच्च अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्रमाण पुरेसे नाही. शेतीवर अवलंबून असणारी ६२% लोकसंख्या आणि त्यातही ८०% शेतकरी अल्पभूधारक या विसंगतीने कृषी लोकसंख्येला, शिक्षण हा पर्याय ठेवलेला असूनही असणारी तुटपुंजी सोय यामुळे शिक्षण हा प्राधान्याचा विषय नाही. ज्या नागरी वसाहतीला शिक्षणाशिवाय पर्याय नाही, तिथे पुरेशी महाविद्यालये अथवा शाळा असतीलही. पण त्यातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची हमी मिळेल असे शिक्षण नाही. ज्याला उपयोजित शिक्षण म्हणतात असे फारसे अभ्यासक्रमच नाहीत, सरकारकडे पुरेसे आर्थिक तरतुदीचे बळ नसल्याने खाजगी शिक्षणसंस्था बळावत गेल्या आणि त्या बहुतेक धनदांडगे आणि राजकारणातील लोकांनी सुरू केल्याने तिथे मोठा conflict of interest निर्माण झाला. त्यातून त्यांच्यावर काहीच बंधन राहिले नाही. शिक्षणाचा किमान दर्जा ठेवण्याची ही सक्ती राज्यकर्ते आणि शिक्षणसंस्थांचे मालक एकच असल्याने करू शकले नाहीत. कॉर्पोरेट क्षेत्राने शिक्षणात गुंतवणूक केली खरी, पण त्यांच्या शिक्षणाचा खर्च सामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे काही विशिष्ट विद्यार्थ्यांनाच ते शिक्षण मिळू शकले. या सगळ्याचा शिक्षित संपदेच्या (educated property) निर्मितीवर फार मोठा विपरीत परिणाम झाला. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या तुलनेत शिक्षणापासून वंचित असणारे वाढत गेले. ज्या देशात तरुण लोकसंख्या प्रचंड आहे तिथे हे नुकसान भरून न येणारे आहे. कोरोनाची महामारी या सगळ्यावर एक प्रभावी उपाय म्हणून समोर येऊ शकते; कसे तर ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून हवे. यातील गुंतवणुकीच्या अनेक गोष्टी कमी होऊ शकतात आणि यातील प्रत्येक समस्येवर ऑनलाईन शिक्षण या वंचित लोकसंख्येला कमालीची मदत करू शकते. ही फार मोठी संधी आहे आणि याबरोबरीने आणलेले नवे शिक्षण धोरण (जे उपयोजित जास्त आहे) असे दोन्ही मिळून, अनेक वर्षांचा शिक्षणाचा अनुशेष भरून निघायची शक्यता निर्माण झाली आहे, असे मला वाटते.

अजून एक माहिती इथे महत्त्वाची ठरेल. शिक्षणाची परवड असताना, या देशात मोबाईल वापरणारे लोक तब्बल १०० कोटी आहेत त्यातील ४० कोटी स्मार्ट फोन वापरतात. २०१३ पासून मोबाईल डेटा वापरण्याच्या खर्चात ९३ % घट झाली आहे. २०१९मध्ये दर ग्राहक सरासरी मोबाईल डेटाचा वापर ११ जीबी इतका आहे, हे सगळे ऑनलाईन शिक्षणपद्धतीला पूरक आहे. त्यामुळे डिजिटलपद्धती आणि डिजिटल साधनांचा वापर हे योग्य वेळी अशा उंचीला पोचले आहे की या देशातील शिक्षण आपली कूस बदलू शकते. ही संधी वारंवार येत नाही.

या कोरोनोत्तर शिक्षण मॉडेलमध्ये ऑनलाईन पद्धती, आभासी धोरण याला महत्त्व असणार आहे. शिक्षक-विद्यार्थी संवादपद्धत ही संपूर्ण बदलेल. प्रत्यक्ष भेटून शिकवणे, संवाद साधणे, समजावणे असे हळूहळू इतिहासजमा होईल. त्याचा एक तोटा असा असू शकतो की आपल्या जीवनपद्धतीत आतापर्यंत प्रत्यक्ष सबंध हे परिणाम साधण्याच्या दृष्टीने फार मोलाचे होते ते आता बदलावे लागेल. त्याचे निकषही बदलतील, त्याच्या मूल्यमापनपद्धती बदलतील. ज्याला टेलीशिक्षण म्हणता येईल ते आता अधिक महत्त्वाचे होईल ज्यात अनेक प्रकारच्या नवीन कौशल्यांची गरज लागेल. विद्यार्थी शिक्षक समोर नसताना होणारा संवाद अथवा शिकवणे प्रभावी करण्यासाठी आवाज सगळ्यात महत्त्वाचा असेल. उच्चाराधिष्ठित संवाद प्रभावी करणे शिकून घ्यावे लागेल. यातून एक फायदा असा होईल की व्यक्तिअवलंबित शिक्षण मागे पडेल. कोणपेक्षा काय हे महत्त्वाचे ठरणे अत्यंत वस्तुनिष्ठ आहे. विषयातील आशय पुढे येईल. कारण त्यावरच विद्यार्थ्यांचे लक्ष जाईल. एक धागा इथे, आपल्या जुन्या शिक्षणव्यवस्थेशी पण जोडला जाईल जी श्रुतीवर अवलंबून होती, श्रुती जास्त प्रभावी आणि दीर्घकाळ लक्षात राहणाऱ्या असतात. नुसते बघणे आणि लक्ष देऊन ऐकणे आणि बघणे यात दुसरे जास्त प्रभावी आहे. आशयाच्या आकलनाचा थेट संबंध श्रुतींशी आहे. हल्लीचे शिक्षण आठवते किती यावर अवलंबित झाले आहे. आठवण्यापेक्षा आकलन हे मोलाचे आहे. पाठांतर हे एखादा विषय समजण्याचा निकष होऊ शकत नाही तर, आकलन हाच निकष असतो कानांवर पडलेले दीर्घकाळ स्मरणात राहते असे सांगतात. ऑनलाईन शिक्षणात ऐकावे जास्त लागेल. तिथे शिक्षकांचाही कस लागू शकतो. शिक्षकांना स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावावर शिकवणे तरून जाणे यात अवघड होऊन बसेल, बघा एका कोरोनाने किती अमाप संधी आपल्यापुढे आणल्या आहेत ! असे म्हणतात की समस्येतच उत्तर असते आणि ते जास्त परिणामकारक असते. याशिवाय शिक्षकांच्या नवीन पद्धती, पैसा, वेळ आणि उर्जा वाचवणाऱ्या असतील. विद्यार्थ्यांच्या फीज कमी होऊ शकतात. अनेकांना आर्थिक कारणामुळे शिक्षण परवडत नाही त्यांना याचा लाभ घेता येईल. यापुढे स्थानाला महत्त्व उरणार नाही. तंत्रज्ञान अधिकाधिक लोकांना आपल्यात सामावून घेईल. फक्त तंत्रज्ञानाचा एकच धोका असतो ते नीतिनिरपेक्ष असते. त्यामुळे नीतीसाठी वेगळे दंडक लावावे लागतील का ? तंत्रज्ञानाच्या नवनवीन बाबी अधिक उपयोगी पडणाऱ्या आहेत. त्यातील रेकॉर्डिंग रिपीट करणे हे फार सोपे आहे एखाद्या विषयाचा अभ्यासक्रम पुन्हा पुन्हा ऐकता येईल. त्यामुळे काही निसटून जाणार नाही. विद्यार्थ्यांना हा फार मोठा फायदा आहे. आज जे पन्नाशीत आहेत त्यांना आठवत असेल की, आपल्या शाळेतील एखादा विषय चांगला शिकविणाऱ्या शिक्षकांचं बोलणं जर रेकॉर्ड केलेलं असतं तर त्याच्या पुन:प्रत्ययाचा आनंद किती मोठा असतो ! केवळ तंत्रज्ञानाने हे पुन्हा पुन्हा ऐकणे शक्य आहे, इथे खरोखर अनेक विद्यार्थ्यांना लाभ होऊ शकतो. ज्यांना आर्थिकदृष्ट्या शक्य नाही त्यांनाही ते फायद्याचे आहे.

शिक्षण क्षेत्रात आता नवीन कौशल्ये लागतील. शिक्षण-प्रशासन संपूर्ण टेक्नोलॉजीच्या मार्फत राबवावे लागेल ; जे सगळ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यातील वेळेची बचत होईल आणि जर तंत्रज्ञान शिकले नाही तर बाजूला पडण्याचा धोका आहे. तंत्रज्ञान पारदर्शी असते, त्याने नोकरशाहीमुळे येणारी शिथिलता नष्ट होते. याचा फार मोठा अडथळा आज शिक्षण क्षेत्रात आहे तो दूर व्हायला मदत होणार आहे. तंत्रज्ञानाचा रेटा एरवी शिक्षणक्षेत्रात आला नसता, तो आता वेगाने येईल आणि ते उपयुक्तही आहे. शिक्षण व्यवस्थापन क्षेत्रातील माणूस अवलंबित व्यवस्था संपुष्टात येईल.

डेटा हेच आजचे चलन आहे. त्यासाठी पण शिक्षणक्षेत्राला तयार व्हावे लागेल. आता जगभरातील विद्यापीठांचे सहयोगाने काम करणे (collaborate) शक्य होणार आहे आणि ते सोयीचे आहे. त्यातील दिरंगाई संपुष्टात येईल. गुण देण्याच्या किंवा मान्यता देण्याच्या पद्धतीत बदल होऊ शकतो. हल्ली बऱ्याच महाविद्यालयांची व्यवस्थाक्षमता यांची प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली जाते, नवीन काळात त्याच्या वेगळ्या पद्धती शोधाव्या लागतील.

वरील चित्रांपैकी एका चित्रात अडचणींचे रेखाटन आहे. त्यात किती आणि कशा प्रकारच्या समस्या या क्षेत्राला भेडसावत आहे ते दिले आहे. त्याकडे नजर टाकली तर असेही वाटते की हे प्रचलित शिक्षणपद्धतीने तर निर्माण केले नाही ? तसे असेल तर नव्या पद्धतीत त्यात बदल निश्चित होईल.

महाविद्यालये आपल्या शिक्षकांचा एक पूल तयार करू शकतात आणि तो आवश्यक त्या विद्यार्थी गटांना अगदी सहज पुरवू शकतात. अभ्यासक्रमातील विविध भाग आणि त्याला जोडलेल्या शिक्षक / प्राध्यापक अशा लोकांचा एक समूह असा नवा पायंडा पडू शकेल जो खऱ्या अर्थाने सहयोग आणेल असे वाटते. शिक्षणातसुद्धा अनेक आत्मनिर्भर बाबी येऊ शकतात. भारतीय कॉर्पोरेट क्षेत्राची मागणी आणि शिक्षणव्यवस्था यातील तफावत समोर येईल आणि ती मिटविणे शक्य व्हावे असे अभ्यासक्रम आणता येतील. त्यातली कर्मठ पद्धती बंद होईल. गरजेसाठी शिक्षण ही गोष्ट खरोखर प्रत्यक्षात येऊ शकते. उद्योग आणि शिक्षण यांची सांगड फार महत्त्वाची आहे कारण आपले शिक्षण बऱ्याच अंशी मागील पानावरून पुढे चालू ठेवल्याने, गरजेच्या दृष्टीने नव्हते. तर केवळ पूर्तता आणि टिक मार्क करणे, या स्वरूपाचे होते ते आता जास्त व्यवहारी आणि गरजा भागविणारे होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापर वाढू शकतो. त्यातील व्यक्ती अवलंबित बाबी संपुष्टात येऊ शकतात. AI चा उपयोग असीमित आहे आणि त्याचे जगभर प्रयोग सुरू झाले आहेत. असणाऱ्या माहितीचा उपयोग उपयोजित शिक्षणासाठी प्रभावीपणे होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करणे ही एक मोठी संधी असेल. देशात बनणाऱ्या उद्योगक्षेत्रातील हायटेक बाबींचे प्रशिक्षण ही एक नवीच संधी देऊन जाईल. भारतीयांचे तंत्रज्ञान वापरण्याचे कौशल्य जगात एकमेव आहे आणि हे टाळीचे वाक्य नाही, अनेक देशात प्रत्यक्ष प्रवास करून राहून, भारतीय लोकांच्या तंत्रज्ञान वापराचे एक नवे

आकलन मला अनेकदा झाले आहे. भारतीयांच्या कष्टानं तंत्रज्ञानाची जोड मिळणे यासारखी उत्तम बाब नाही. त्यातून अनेक नव्या संधी समोर येतील. कारण हा देश तरुणांचा आहे. सरतेशेवटी चार E मोलाचे आहेत ते असे **ED-Tech, Edu-Content, E-Learning** आणि **Entrepreneurship.** आपल्या आयुष्याला वेढून टाकणाऱ्या कोरोनाच्या संकटाने आपल्यासाठी शिक्षणक्षेत्राचे पुनरुत्थान होईल अशा गोष्टी आणल्या आहेत. एकीकडे विषाणूच्या बाधेची निशा आपल्या आयुष्यात अंध:कार निर्माण करत असताना क्षितिजावर नव्या उमेदीची संधीही उगवणार आहे. नेहमी बदल हाच कायमचा असतो असे म्हणतात. आपत्ती असो वा आशीर्वाद जीवन कधी थांबत नाही. कोरोनाच्या दुर्दैवी तडाख्यात उगवलेले हे सुसंधीचे मोरपीस आहे. आपण त्यासाठी तयार असायला हवे.


उद्या पहाट होईल तेव्हा शिक्षणपद्धती, व्यवस्था, साधने, आणि अर्थकारण हे सारेच बदललेले असेल. ते जितक्या लवकर होईल तेवढी कोरोनाची तूट लवकर भरून निघेल.

# पुस्तक परीक्षण

# *सातपाटील कुलवृत्तांत :* एक सांस्कृतिक हस्तक्षेप

**संजय इंगोले**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
एल. जी. एम. महाविद्यालय,
मंडणगड.
sanjeevingole@gmail.com




(परीक्षित पुस्तक : *सातपाटील कुलवृत्तांत,* लेखक : रंगनाथ पठारे, प्रकाशक : शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती : जुलै २०१९, पृष्ठे : ७९६, मूल्य : रु. १०००)

१.

रंगनाथ पठारे हे समकालीन मराठी साहित्यव्यवहारातील महत्त्वाचे नाव आहे. ते सुमारे चाळीस वर्षांपासून कथात्म, वैचारिक व समीक्षा लेखन करीत आहेत. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर महत्त्वाचे लेखन केलेल्या मराठीतील मोजक्या लेखकांमध्ये त्यांचा समावेश होतो. *दिवे गेलेले दिवस* या अगदी पहिल्या कादंबरीपासून स्वतःचा खास ठसा असलेली प्रयोगशील कथनशैली हा त्यांच्या लेखनाचा विशेष राहिलेला आहे. त्यांच्या कथनपर साहित्यातून प्रामुख्याने समकालीन निमशहरी अवकाश प्रकट होत असला तरी या अवकाशाचे शहरी आणि ग्रामीण अवकाशाशीही नाते असते. त्यामुळे पठारे यांच्या लेखनाला विशिष्ट कप्प्यात बसवणे शक्य होत नाही.

समकालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भविपुलता, मानवी सत्तासंबंधांचे सजग भान, व्यक्ती आणि समाज यांतील संघर्ष, जातजाणिवा व जातीय संदर्भाचे थेट चित्रण, ही पठारे यांच्या कथात्म लेखनाची आणखी काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

रंगनाथ पठारे यांची *सातपाटील कुलवृत्तांत* ही कादंबरी मागील वर्षी (जुलै २०१९) प्रकाशित झाली आहे. ही कादंबरी प्रकाशनपूर्व व प्रकाशनानंतर सामाजिक प्रसारमाध्यमे व मराठी साहित्यविश्वात मोठ्या चर्चेचा विषय ठरली आहे.

२.

*सातपाटील कुलवृत्तांत* या कादंबरीत सातपाटील कुळाचा वृत्तांत केंद्रस्थानी आहे. तेराव्या शतकाच्या शेवटी अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरीवर सुरू झालेली आक्रमणे आणि त्यात यादवांचा होत असलेला पराभव, या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कादंबरीचे कथानक सुरू होते.

देवगिरी-पैठण परिसरातला कुणबी-मेंढपाळ पातेणे / पाठारे/ पठारे कुळातला एक तरुण राजकीय घडामोडींशी संबंध असलेल्या मानकरी कुटुंबाच्या संपर्कात येतो. या तरुणाला विशिष्ट परिस्थितीत सुरुवातीला पैठण आणि नंतर वांबोरी या गावी स्थलांतर करावे लागते. या पातेणे / पाठारे/ पठारे कुळाचा वांबोरी गावात वंशविस्तार होतो.

पुढे निजामशाहीत विशिष्ट घटनेच्या परिणामी वांबोरी गावच्या पाटीलकीची सात कुटुंबांमध्ये वाटणी होते. ते सात कुटुंब वांबोरीचे 'सातपाटील' म्हणून ओळखले जाऊ लागतात. मूळ पातेणे / पाठारे/ पठारे असलेला आणि आता सातपाटील असलेला एक तरुण 'सातपाटील' हे कुलनाम धारण करीत परिस्थितीवश वांबोरी गावातून परागंदा होतो. तो खराडी हे नवे गाव वसवतो, त्या गावचा पाटील होतो. या खराडी गावातल्या सातपाटलाचा वंशविस्तार करणारा पुरुष मात्र मूळचा अफगाण आहे. हा वंशविस्तार केवळ खराडी गावापुरता राहत नाही. खराडीतल्या सातपाटील कुळातल्या पुढच्या पिढ्यांतले काही वंशज परिस्थितीवश परागंदा होतात किंवा स्थलांतर करतात. मूळ पातेणे / पाठारे / पठारे असलेल्या आणि नंतर सातपाटील झालेल्या कुळाचा वांबोरी, खराडी, करंजे व साल्पी या गावांमध्ये कुलविस्तार होतो. कादंबरीच्या कथानकात येणारा शेवटचा सातपाटील आपल्या गाव आणि कुळापासून मनाने तुटलेला, नोकरीनिमित्त दुसऱ्या गावी राहणारा, मराठी भाषेतला महत्त्वाचा समकालीन लेखक आहे. हा सातपाटील आपल्या सातपाटील कुळाचा, आपल्या पूर्वजांच्या वंशवृक्षाचा शोध घेऊ पाहतो आहे.

अशाप्रकारे, विशिष्ट ऐतिहासिक-सामाजिक-भौगोलिक पार्श्वभूमी आणि मेंढपाळ-शेतकरी-सैनिकी परंपरा असलेल्या कर्तबगार, शूर, लढवय्या, पळपुट्या, खतपुराड, वांशिक संकर झालेल्या, कालौघात सत्ता-मान-प्रतिष्ठा मिळालेल्या आणि ती गमावलेल्या सातपाटील कुळातील अनेक पिढ्या कादंबरीत आलेल्या आहेत. सातपाटील कुळाच्या उपरोक्त मुख्य कथानकाबरोबरीने अनेक उपकथानकेही कादंबरीत येतात. मात्र ही उपकथानके मुख्य कथानकाचाच विस्तारित भाग आहेत.

३.

कादंबरीच्या पहिल्या भागातले श्रीपती (पातेणे / पाठारे / पठारे) हे एक पात्र आणि नंतरच्या सहा भागातली साहेबराव, दसरत, जानराव, रखमाजी, पिराजी, शंभूराव व देवनाथ (सातपाटील) ही सात पात्रे कादंबरीतली प्रमुख पात्रे आहेत. कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेल्या उपरोक्त आठ पात्रांबरोबरच सातपाटील कुळातली आणि त्यांच्याशी नात्याने जोडली गेलेली बरीच पात्रे कादंबरीत येतात. सातपाटील कुळातील पात्रांची पारंपरिक इतिहासामध्ये कुठेही नोंद नाही, त्यांची ओळख नाही, या अर्थाने ही पात्रे सबाल्टर्न आहेत. परंतु, कादंबरीतील समाजव्यवस्थेत या पात्रांचे असलेले स्थान पाहता त्यांना सबाल्टर्न म्हणता येणार नाही. या पात्रांची सैनिकी साहसे, संघर्ष, त्यांच्या तडजोडी, पळपुटेपणा, गावगाड्यातील कर्तबगारी, सत्ता – मानपान, आणि कौटुंबिक कलह यांचे चित्रण कादंबरीत येते.

कादंबरीतील अन्य पात्रांमध्ये तत्कालीन गावगाडा व समाजव्यवस्थेत मान-सन्मान व मातब्बर असलेले, मर्यादित सत्ता असलेले ब्राह्मण व मराठा जातीतले लोक कादंबरीतली महत्त्वाची पात्रे आहेत. राज्यकर्ते-सरदार-जहागिरदार असलेले मुसलमान; मुलकी-लष्करी अधिकारी व संशोधक- लेखक असलेले इंग्रज; सैनिकी परंपरा व गावगाड्यातले बलुतेदार असलेले महार; उद्योगी दृष्टी असलेले कोमटी व पारसी, हे कादंबरीच्या विस्तारित कथानकात 'पात्र' म्हणून महत्त्वाचे स्थान राखून आहेत.

या कादंबरीत वेगवेगळ्या धर्म-जात-वर्ग-सत्ता स्तरातील पात्रे आपल्या बऱ्या-वाईट परिस्थिती व स्वभावांसह आली आहेत. ही पात्रे त्या त्या काळातील राजकीय –सामाजिक स्थान व परिस्थितीचे, सत्तासंबंधांचे प्रतिनिधित्व करतात. या कादंबरीतील शेवटचा भाग वगळता बाकीच्या सहाही भागात येणारी स्त्री पात्रे विशेष महत्त्वपूर्ण आहेत. कादंबरीचा बराच मोठा अवकाश या स्त्री पात्रांनी व्यापलेला आहे. ही स्त्री पात्रे स्वतःहून पुढाकार घेणारी, चर्चा करणारी, निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी होणारी, परिस्थितीला ठामपणे सामोरी जाणारी पात्रे आहेत.

या कादंबरीत यादवकाळ, बहामनीकाळ, पेशवेकाळ, उत्तर पेशवाईचा काळ, एकोणिसाव्या शतकातील अव्वल इंग्रजी काळ, विसाव्या शतकातील स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ, असा सुमारे सातशे तीस वर्षांचा काळ येतो. कादंबरीत येणारा भौगोलिक परिसरही विस्तीर्ण आहे. डोंगरकिनी, पैठण, देवगिरी, वांबोरी, अहमदनगर, खराडी, श्रीगोंदे, करंजे, साल्पी, जामखेड, घोडनदी, मुंबई ही महाराष्ट्रातील गावे; उज्जैन-दिल्ली-पानिपत-बुंदेलखंड असा उत्तर भारत; बलुचिस्तान, अफगाणिस्तान व ब्रिटन हे दूरवरचे भूप्रदेश कादंबरीत येतात.

कादंबरीत घडणाऱ्या घटना-प्रसंग-पात्रांची ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी नेमकी काय आहे याचे सूचन होण्यासाठी कादंबरीच्या सातही भागांच्या सुरुवातीला काळ-परिस्थिती दर्शक तपशील दिले आहेत. हे तपशील इतिहासात होऊन गेलेल्या व्यक्ती, घटना व परिस्थितीविषयीचे तपशील आहेत. परंतु अपवाद वगळता ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना-प्रसंगांना कादंबरीच्या मुख्य कथनात स्थान नाही.

कादंबरीच्या सातव्या भागात एक प्रमुख पात्र असलेला देवनाथ हाच कादंबरीतील संपूर्ण कथनाचा कथक आहे. देवनाथ हा कथांतर्गत कथक असला तरी कादंबरीच्या केवळ सातव्या भागातच तो कथांतर्गत कथकाचे रूप धारण करतो. सुरुवातीच्या सहा भागात बहुतांश हा कथक तृतीयपुरुषी, सर्वसाक्षी आहे. एकच असलेल्या परंतु दोन रूपे धारण करणाऱ्या कथकांतील फरकाचा परिणाम कादंबरीच्या कथनशैलीवर झालेला दिसतो. देवनाथ हा कथक उच्चशिक्षित असून महाविद्यालयात विज्ञानाचा शिक्षक आहे. तो मूलतः निरीश्वरवादी, भौतिक जगात रमणारा, मराठीतील एक महत्त्वाचा लेखक आहे. जाती-कुळाच्या शुद्धतेतील फोलपणा व हास्यास्पदता त्याला माहीत आहे. तो कुटुंब आणि लोकधारणा जपण्यासाठी मनाने कुठेही न गुंतता श्राद्धाचे कर्मकांडही करतो आहे. तो वाचन-चिंतनाने बहुश्रुत झालेला आहे. त्याला मानवी इतिहास आणि संस्कृती याविषयी विशेष कुतूहल आहे.

तृतीयपुरुषी रूप धारण केलेला कथक कादंबरीतील प्रत्येक भागाच्या सुरुवातीला पार्श्वभूमी म्हणून ऐतिहासिक काळाचे कथन करीत असल्यामुळे पुढच्या कथनात येणाऱ्या कल्पित घटना-प्रसंग-पात्रांना ऐतिहासिकता प्राप्त होते. कथकाला इतिहास या संकल्पनेच्या व्यामिश्रतेचे भान असले तरी आपल्या पूर्वजांचा भक्कम पुरावे असलेला इतिहास त्याला ज्ञात नाही. त्यामुळे त्याने आपल्या पूर्वजांविषयी कथन करताना पुरावे द्यावे लागणार नाहीत अशी, काही पुसटशा धाग्यांना जोडत नेणारी सैलसर दृष्टी स्वीकारली आहे. कथकाला हे माहीत आहे की आपण जे कथन करतो आहोत ते जसेच्या तसे घडलेले नाही, त्यात बहुतांश कल्पित आहे. परिणामी, हा कथक कल्पित हेच वास्तव आहे असे भासवत, गर्भित वाचकाचे कुतूहल जागे ठेवत कथन करताना दिसतो.

सुमारे सातशे तीस वर्षे इतका दीर्घ कालपट व्यापणाऱ्या या कादंबरीचे कथन प्रामुख्याने आजच्या प्रमाण मराठीत आहे. असे असले तरी त्या त्या काळच्या बोलीतले आणि आज अपरिचित असलेले शब्द, वाक्प्रचार, रूढी-परंपरा दर्शक भाषिक चिन्हे कथनामध्ये येतात. त्यामुळे ते दूरच्या भूतकाळाचे कथन आहे हे सहज लक्षात येते. मराठा, ब्राह्मण, महार, मुस्लीम, ब्रिटीश पात्रांचे व्यवहार, वर्तन व संवाद कथन करताना भाषा त्या पात्रांशी सहजभाव राखेल अशी योजलेली आहे, उदा. मुस्लीम पात्रांच्या तोंडी कधी फार्शी -उर्दू तर कधी फार्शी-उर्दू- मराठी आणि ब्रिटीश पात्रांच्या तोंडी इंग्लिश, इंग्लिश-मराठी अशा मिश्रबोली योजलेल्या दिसतात. कादंबरीने गोष्टीवेल्हाळ, गुंतागुत टाळणाऱ्या व कालानुक्रमिक अशा लोकप्रिय कथन शैलीचा मार्ग स्वीकारल्यामुळे कथन रंजक झालेले आहे. परंतु ही रंजकता एकसुरी, कंटाळवाणे रूप धारण करीत नाही. कादंबरीची दीर्घ भाषिक संहिता लक्षात घेता ती कंटाळवाणी होणार नाही यासाठी लोकप्रिय कथनशैलीचा मार्ग स्वीकारला आहे असे दिसते. सहजशील, तिरकसतेचा अभाव असणारी शैली हे या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

४.

कोणताही गंभीर लेखक वर्तमानाला प्रतिसाद देत असतो. आजच्या महाराष्ट्रात धर्म-जातिश्रेष्ठत्व व टोकदार अस्मितांची अभिव्यक्ती होऊ लागली आहे. आपल्या जातीतील कर्तबगार व्यक्तींचा शोध घेत त्याभोवती स्वजातिसंघटन उभे केले जात आहे. धर्म, जात, दैवते, व्यवसाय या संबंधीचे किरकोळ निरुपद्रवी उल्लेखही भावनादुखीच्या स्फोटक प्रकरणात रूपांतरित होत आहेत. जातिअंताची भाषा आणि कृतिकार्यक्रम जवळपास हद्दपार झाले आहेत. सरंजामी अवशेष शिल्लक आहेत. शेतकरी जाती नव्या व्यवस्थेशी जुळवून घेण्यात असमर्थ ठरल्या आहेत. शेती व्यवसायावर सततचे अस्मानी-सुलतानी अरिष्ट कोसळत आहे. अशा समकालीन जात-वर्गीय वास्तवातून धर्म-जातिश्रेष्ठत्व, वंशशुद्धता, कुलीनत्व, शौर्यपरंपरा यांचे भ्रामक आणि संकुचित विश्व महाराष्ट्रात उदयाला आले आहे. अशा या पार्श्वभूमीवर *सातपाटील कुलवृत्तांत* ही कादंबरी अवतरली आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

*सातपाटील कुलवृत्तांत* या कादंबरीत मराठा सातपाटील केंद्रस्थानी आहेत, परंतु केवळ ती त्यांची कहाणी नाही. ही मराठी लोकांची, तत्कालीन गावगाडा आणि सामाजिक सत्तासंबंधांची कहाणी आहे. कादंबरीत निव्वळ अस्मितावादी, वर्चस्ववादी एकजातीय चर्चाविश्व उभे केलेले नाही. हे चर्चाविश्व गावगाड्यातील अन्य जाती आणि मुसलमानांना आपले मानते. त्यामुळेच मराठी लोकांच्या समूहसंस्कृतीची अनेकांगे या कादंबरीतून व्यक्त होतात.

कादंबरीने मराठ्यांचा सुवर्णकाळ मानला गेलेला शिवकाळ टाळला आहे. मराठा ही मेंढपाळ –शेतकरी- क्षत्रियत्वाची परंपरा असलेली उन्नत-अवनत होणारी खुली जात आहे, असे कादंबरी सूचित करते. कथकाच्या कुळातच जाती-वंशसंकर असून, सातपाटलांची कुळवृद्धी मूळच्या अफगाण पुरुषापासून झाली आहे. सातपाटील स्त्री-पुरुषांचे विवाहबाह्य शरीरसंबंध आहेत. दुसऱ्या जातिधर्माच्या स्त्रियांना त्यांनी नांदवलेले आणि ठेवलेले आहे. सातपाटलांच्या लेकी- सुना अन्य धर्मियांबरोबर पळूनही गेलेल्या आहेत. या बरोबरीने अव्वल इंग्रजी काळ व स्वातंत्र्यपूर्व काळात मराठे एक जातसमूह म्हणून नेमके कसे मागे पडत गेले, त्यांना काळ आणि बदलत जाणाऱ्या परिस्थितीचे कसे भान नव्हते, याचे चित्रण 'रखमाजी-पिराजी' व 'शंभूराव' या भागात आले आहे. विशिष्ट परिस्थितीमुळे शहरीकरण न झालेल्या, गावगाडा व शेतजमिनीशी संबंधित प्रतिष्ठेला चिकटून राहिलेल्या, ज्ञानसत्तेची आसक्ती नसलेल्या आणि त्यामुळेच मर्यादित विश्वभान असलेल्या मराठ्यांचे चित्रण कादंबरीत येते. ही सर्व नामुष्की कादंबरीचा कथक कथन करतो. यावरून सातपाटलाच्या कुळीचा आणि अनुषंगाने मराठ्यांचा केवळ गौरव करण्यात कादंबरीला रस नाही. ही कादंबरी कुळ-जातीची शुद्धता, क्षत्रियत्व, शौर्य याविषयीच्या रचितांची चिकित्सा करू पाहते, असे खात्रीने म्हणता येईल.

कादंबरी उपरोक्त चर्चाविश्व उभे करीत असली तरी पठारे यांच्या यापूर्वीच्या कादंबरीलेखनाशी तुलना केली असता, सातपाटील कुलवृत्तांतने वाचकांना फारसा विचार आणि जुळणी करावी लागणार नाही अशी कथनशैली स्वीकारली आहे असे दिसते. ही कथनशैली सर्वसामान्य वाचकांचा अनुनय करणारी रंजक शैली आहे. अतर्क्य व तद्दन फिल्मी वाटावेत असे योगायोग आणि योगायोगाची पुनरावृत्ती कादंबरीमध्ये आली आहे, उदा० विठ्ठल-रखुमाईची मूर्ती अफगाणिस्तानातून परत सातपाटलांच्या घरी येणे, दोन्ही अफगाण पुरुष मारले गेल्यानंतर त्यांच्या बायकांनी सातपाटलांच्या पुरुषांना स्वीकारणे, झोरावर व दसरत यांच्यात न ओळखता येण्याएवढे साम्य असणे, सातपाटलांशी संबंधित दोन स्त्रियांचा इंग्रज अधिकाऱ्यांशी विवाह होणे आणि या स्त्रियांचे वंशज इंग्लंडमध्ये देवनाथला भेटणे, इत्यादी... इत्यादी... कादंबरीच्या कथनात रूढ धारणा असलेल्या स्त्री-पुरुषांच्या आनुवंशिक गुणावगुणांची तीच ती वर्णने येत राहतात. हे स्त्री-पुरुष एकतर अप्रतिम सुंदर-देखणे-गोरे-धिप्पाड असतात किंवा सर्वसामान्य-काळे-बुटके असतात. अशा ढोबळ वर्गीकरण असलेल्या पात्र चित्रणामुळे कथन विश्वासार्ह राहत नाही. स्त्री-पुरुषांच्या प्रणयवर्णनात कथक अधिक रस घेतो, तिथे भाषा ओतप्रोत अलंकृत होते. कादंबरीतला काळ आणि अवकाश पाहता आक्रमक पुढाकार घेणारी, चर्चा करणारी कादंबरीतील स्त्रीपात्रे कृतक वाटतात. कथकाने गावगाड्यातील निम्नजातींचे स्थान व भूमिकेचे कौतुक केलेले दिसत असले तरी जातिसमाजातील निम्नजातींचे शोषण व त्यांच्याशी केला गेलेला अमानवीय व्यवहार याविषयी कादंबरी मौन पाळते. हे मौन पारंपरिक गावगाडा आणि जातीय शोषणाला अधिमान्यता देते की काय असा प्रश्न निर्माण होतो. कथकाने स्वीकारलेली कथनशैली, त्याचा

इतिहास आणि जातिसमाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, कादंबरीतून प्रकट होणारी विचारप्रणाली यासंबंधी चिकित्सक वाचकाला असमाधान वाटेल, संशय निर्माण होईल अशी बरीच कथने कादंबरीत आहेत.

*सातपाटील कुलवृत्तांत* कादंबरी संदर्भातील उपरोक्त प्रश्न, असमाधान, संशय लक्षात घेऊनही या कादंबरीचे महाराष्ट्राच्या वर्तमानाशी असलेले नाते पाहता ती एक महत्त्वाची कादंबरी आहे असे म्हणता येईल. समकालीन मराठ्यांची जातिनिष्ठा, त्यांच्या स्वतःच्या कुलीनत्व, क्षत्रियत्व, शुद्धत्व व शौर्य यांविषयी असलेल्या धारणा, आपण राज्यकर्ती जात आहोत, गावगाड्याला पोसणारे आहोत, मराठा म्हणून आपण कोणी विशेष आहोत अशा निर्माण झालेल्या भ्रामक जाणिवांना कादंबरी संयत छेद देते. अर्थात, ही कादंबरी फक्त मराठ्यांविषयी नाही तर वर्तमानात तसे चर्चाविश्व व विश्वभान बाळगणाऱ्या सर्व धर्म-जात-वंश-संस्कृती संदर्भात आहे. त्यामुळे *सातपाटील कुलवृत्तांत* ही कादंबरी टोकदार अस्मिता बाळगणाऱ्या वर्तमानात केलेला महत्त्वाचा सांस्कृतिक हस्तक्षेप आहे.

# त्रिज्या : परिपूर्णतेचा शोध

**वृषाली विनायक**

कवी, लेखक

vrushalivinayak10@gmail.com




(परीक्षित पुस्तक : त्रिज्या (वैचारिक लेखसंग्रह) लेखक : गणेश देवी, प्रकाशक : पद्मगंधा प्रकाशन, प्रथम आवृत्ती : २०१८, पृष्ठे : १६८, मूल्य : रु. २३०)

जागतिक भाषांचा अभ्यास करणारे महत्त्वाचे भाषातज्ज्ञ म्हणून डॉ. गणेश देवी सर्वांना परिचित आहेत. भाषेपासून मानवी संस्कृतीच्या मुळापर्यंत संशोधन करत असताना त्या शोधातला प्रत्येक घटक गणेश देवींच्या चिंतनाचा विषय बनला आहे. *त्रिज्या* या लेखसंग्रहात गणेश देवींनी आपल्या चिंतनप्रवासातील काही विचारनोंदी वाचकांसमोर ठेवल्या आहेत. मानवी अस्तित्वाचे असतेपण आणि नसतेपण या दोन ध्रुवांच्या दरम्यानचं जे 'घडणं' आहे, जो प्रवास आहे; त्याचा वेध घेणं हा या लेखसंग्रहाचा उद्देश आहे. लेखकाच्या म्हणण्यानुसार या विचारनोंदी समाजबांधणीत सहभागी असणाऱ्या कार्यकर्ता आणि विचारवंत या दोन महत्त्वपूर्ण घटकांच्या दरम्यान आंदोलित असलेल्या मनासाठी आहेत. लेखांच्या या चिंतनपर आशयाने वैशिष्ट्यपूर्ण आकार धारण केला असून त्याचे स्वरूप स्पष्ट करताना लेखक म्हणतात,

'त्यातील काही, मी स्वतःपुरता विचार करत असताना केलेल्या त्रोटक नोंदी आहेत. काही फक्त विचारांचे पुसटसे धागे आहेत.' (पृ. सात) गणेश देवी प्रत्येक घटनेचे, संकल्पनेचे अवलोकन आणि विवेचन अत्यंत सूक्ष्मपणे करतात. त्यांच्या विचारमांडणीत विषयाची खोली आणि व्याप्ती यांचा समतोल असतो. याला अनुसरून प्रस्तुत परीक्षणात संग्रहाचा सार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

वैचारिक लेखसंग्रहातील एकूण आठ प्रकरणांपैकी पहिले प्रकरण '*त्रिज्या*' याच शीर्षकाचे आहे. युक्लिडसच्या *त्रिज्या* या भूमितीय संकल्पनेचा लेखकावर असलेला प्रभाव लक्ष वेधून घेतो. *त्रिज्या* म्हणजे निव्वळ रेषाखंड नाही. केंद्र आणि परीघ यांची जोडणी होते; तेव्हाच *त्रिज्या* अस्तित्वात येते. कल्पनेपासून संकल्पनेपर्यंतचा अवकाश त्रिज्येत सामावलेला आहे. ह्या अवकाशात असलेली अस्वस्थता; लेखकाला असणाऱ्यांचे नसणे आणि नसणाऱ्यांचे असणे सांगायला भाग पाडते. लेखक घरातल्या भिंतींपासून ते वैश्विक तत्त्वज्ञानापर्यंतचे दर्शन सरळ रेषेत घडवतो. युक्लिडस, डार्विन, मार्क्स, काम्यू, दास्तोवस्की, काफ्का, गौतम बुध्द यांच्या सिद्धांतांतून लेखक त्रिज्येची चाचपणी करतो. मानवी अस्तित्वाची प्रतिष्ठापना करणारे आणि अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे करणारे यांना एकाच प्रतलावर लेखक बघतो तेव्हा त्याची गौतम बुद्धाने सांगितलेल्या 'मध्यम मार्गा'विषयीची ओढ जाणवते. लेखक वैचारिक प्रतिष्ठापनेतही मधल्या मार्गावर म्हणजे 'त्रिज्ये'वर रमताना दिसतो. एकीकडे सैद्धांतिक पातळीवर शोध सुरू असताना दुसरीकडे स्वतःच्या गत आयुष्याचे परीक्षण करतो. बुद्धिजीवी वर्गात केंद्रस्थानी उभे राहून भोवतालचा परीघ जाणून घेणे सोपे नाही, हे ध्यानात आल्यावर लेखक कृतिशीलतेच्या त्रिज्येवर चालू लागतो. जे आजतागायत सुरू असल्याचे आपल्या लक्षात येते. स्वचिंतन ते प्रत्यक्ष परिवर्तन यादरम्यान असणारी प्रकाशशलाका लेखक पकडण्याचा प्रयत्न करतो. जी साठवता येत नाही म्हणूनच नव्या दिवसाला सामोरे जाण्याचे लेखक कबूल करतो. थोडक्यात हे लेखन लेखकाने केलेल्या सत्यशोधनाच्या प्रयोगांविषयीचे आहे त्यामुळेही ते काहीसे आत्मनिष्ठ स्वरूपाचे झाले आहे.

'स्व-त्व' हे दुसरे प्रकरण असून येथे शीर्षकाची वैशिष्ट्यपूर्ण रचना केली आहे. 'स्व-त्व' मधील हे अंतर 'मी-तू' चे सूचन करणारे आहे. शून्य ही संकल्पना इथे मध्यवर्ती आहे. व्यावहारिक चलनात मूल्यहीन असणारे शून्य गणितीय परिप्रेक्ष्यात स्वतःतच परिपूर्ण असते. लेखकाने व्यवहारी जगण्यात शून्याच्या परिपूर्णतेवर प्रकाश टाकला आहे. शून्य शोधत असताना ते सांख्यिकी, भाषिक, मानसशास्त्रीय अशा सिद्धांतांचा पडताळा घेतात. लेखकाने वाचलेल्या साहित्यकृती, व्यक्तिगत अनुभव यांतून शून्य ही संकल्पना लेखकाला स्पष्ट होत नव्हती. वयाच्या तिशीत आनंद कुमारस्वामींच्या द डान्स ऑफ शिवा या सौंदर्यशास्त्रावरील पुस्तकातील अर्धनारीनटेश्वराच्या सांकेतिक सूचकतेने लेखकाला आकर्षित केले. ह्या मिथकात स्त्री-पुरुष पूर्णत्वासाठी स्वतःला शून्यात विलीन करतात. ह्या गोष्टीने लेखकाचे लक्ष वेधले होते. पूर्णत्व प्राप्त होणे म्हणजे शून्यात

विलीन होणे, याचा बोध लेखकाला झाला. 'शून्य' म्हणजे 'बिलकुल नसणे' नव्हे तर 'संपूर्ण असणे'. (पृ. २३) हे लेखकाने स्वीकारले. एकाकीपणाने ग्रासलेल्या अनेक समुदायांसोबत काम करताना, त्यांना अवकाश मिळवून देत असताना लेखकाने शून्य होण्याची संपृक्तता व्यक्त केली आहे. मानवी उत्क्रांतीच्या टप्प्यांचा नव्याने शोध घेत, नव्या जीवनदृष्टीसाठी नव्या विश्वदर्शनाची स्वीकारार्हता दाखवली आहे.

'स्त्री-त्व' या प्रकरणात प्रेमाच्या गाभ्यातून माणूसपणाच्या ध्येयाकडे चालत असताना मधला टप्पा स्त्रीत्व आणि पुरुषत्व त्यागण्याचा आहे. मानवाची कल्पनाशक्ती चेतवणाऱ्या प्रेम भावनेवर लेखक भाष्य करतो. होमरच्या ग्रीक संस्कृतीपासून ते भारतीय संस्कृतीतील कथा-मिथांपर्यंतचा मोठा पट त्यांनी उलगडून दाखवला आहे. दुसऱ्या भागात ते पुरुषार्थाचा विचार मांडतात. शरीरविहीन स्त्रीत्व आणि पुरुषत्व असा हा शोध आहे. स्त्री-पुरुष देह त्यागून माणूस बनण्याची हाक आहे. महात्मता प्राप्तीत त्यागाच्या प्रचंड ऊर्जेचा प्रवास केल्याशिवाय महानता येत नाही. हा धागा जोडताना महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचा दाखला घेता येतो. कस्तुरबा गांधींचे सत्याग्रहात सामील होणे ही वरवर सहज कृती वाटते. सत्याच्या शोधात स्त्री सामावली तेव्हा अंतिम सत्याचा शोध महात्म्याला घेता आला, असे लेखक सुचवू बघतो.

लेखकाने आपल्या अनुभवकथनात महान भारतीय लेखिका महाश्वेतादेवी यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. अखिल भारतीय भटके विमुक्त अधिकार मंचची (DNT - Rights Action Group) स्थापना त्यांनी एकत्र केली होती. इंग्रजी वसाहतवादापासून असलेला भटक्या विमुक्तांवरील गुन्हेगारीचा शिक्का पुसून त्यांच्या उत्थानासाठी असलेला लेखकाचा संघर्ष 'सत्ता' या प्रकरणाच्या आरंभीच आहे. हा संघर्ष दुहेरी आहे. एकीकडे 'गुन्हेगार' ही ओळख पुसून या समुदायाला समाजमंथनाच्या प्रवाहात आणणे तर दुसरीकडे राष्ट्रीय पातळीवर DNTच्या हक्कांसाठी केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा असे दुहेरी स्वरूप आहे. अरविंद घोष, रवींद्रनाथ टागोर आणि म. गांधी यांच्या राष्ट्रवादाची उजळणीदेखील या प्रकरणात लेखकाने केली आहे. गांधी, आंबेडकर, अरविंद घोष यांच्या वैचारिक मांडणीपासून टागोर, प्रेमचंद, मंटो यांच्या साहित्यातून डोकावणारा राष्ट्रवाद लेखक तपासतो. फॅसिझमच्या विरोधात लेखकाच्या विचारनोंदीतला एक लक्षणीय मुद्दा समजून घ्यावा लागेल. तो असा, की आज हजारोंच्या जनसमुदायाने एकवटून काम करणे उपयोगाचे नाही. विविध समूहांचे आवाज उठवणारे असंघटीत लढे उभे राहिले पाहिजे. समानधर्मी लहान-लहान गटांनी निर्भयपणे काम केले पाहिजे. निर्भयता केंद्रभूत आहे. फॅसिस्ट नेहमी संघटीत लोकांवर हल्ला करतात. त्यांना निर्भयतेचे भय वाटते. लेखकाचा हा मुद्दा बारकाईने बघितला तर त्यांनी नमूद केलेल्या 'Democracy of diversity' संकल्पनेचे नवीन 'सत्ता' उभारणीतील महत्त्व कळते. मार्क्स-जर्मनीत, गांधी-आफ्रिकेत, आंबेडकर-बडोद्यात एकटे होते पण तरीही ते न डगमगता लढत होते. लढा देशकालापलीकडे असावा. लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणाऱ्या सत्तेला भय वाटेल असा सत्याचा आवाज तयार व्हायला

हवा. या प्रकरणाच्या शेवटी लेखकाने लहान मुलांची एक गोष्ट सांगितली आहे. गोष्ट थोडक्यात अशी आहे; वयाने लहान अशी दहा-बारा निरागस मुलं वर्गात बसलेली असतात. गुरुजी फळ्यावर २+२=५ लिहून मुलांना आपल्यामागे तसेच घोकायला लावतात. त्यातील एक मुलगा धाडसाने २+२=४ असं जाहीरपणे सांगतो. तेव्हा त्याला शाळेतल्या सिनियर्सकडून गुरुजींच्या सांगण्यानुसार 'शिक्षा' होते. हा सगळा प्रकार बघूनही दुसरा मुलगा शिक्षेला न घाबरता आपल्या वहीत गुरुजींच्या सांगण्याप्रमाणे २+२=५ लिहून ते खोडतो. निर्भयपणे ४ लिहितो. निर्भयता हे प्राणतत्त्व ठरते. लोकशाही संदर्भात जगभर निर्माण झालेल्या दमणयंत्रणेला उत्तर देताना विचारांच्या नव्या वाटा शोधाव्या लागतील किंवा निर्माण कराव्या लागतील, समाज परिवर्तनाच्या नव्या लढ्यात नवविचारांची उर्जा आपल्यात निर्माण झाली पाहिजे, असा आशावाद लेखकाने व्यक्त केला आहे.

गणेश देवी यांचे भारतीय भाषा सर्वेक्षणाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या राष्ट्रीय प्रकल्पात भारतीय भाषांची नोंद असणारे ५२ खंड प्रकाशित आहेत. 'भाषा' या प्रकरणात भाषेविषयी लेखकाने मुक्त चिंतन मांडले आहे. मानवी उत्क्रांतीपासून ते आज मानवाच्या सार्वभौम प्रगतीस महत्त्वाचे कारण ठरणाऱ्या भाषेचा इतिहास आणि भविष्य यादरम्यानचे तिचे अस्तित्व ज्या अवकाशावर अधांतरी आहे, त्या त्रिज्येचे सूक्ष्म अवलोकन केले आहे. आज भाषाबदलाच्या ज्या टप्प्यावर आपण आहोत तिथे बोलली जाणारी भाषा फेड आऊट होत असून 'पाहिली जाणारी भाषा' फेड इन होते आहे. मानवाने निर्माण केलेली सिलिकॉन चीप स्मृतिभ्रंश करण्यास कारण ठरत आहे. सिलिकॉन चीप भाषा संकलनाचा आज मुख्य स्रोत होऊ बघत आहे. मानवी मेंदूच्या ज्या डाव्या भागात भाषेचे आकलन होते ते आता 'भाषेखेरीजच्या सांकेतिक आकृत्यांद्वारा मेंदूच्या समोरच्या हिश्शात - प्रीफंटल लोबमध्ये होत राहण्याची शक्यता अटळ मानली गेली आहे.' (पृ. ११०) हे मानवी मेंदूविज्ञानाच्या अंगाने असलेले संशोधन लेखक नोंदवतो. ही चिह्ने आपल्या भोवताली कधीच दिसू लागली आहेत. उत्क्रांतीच्या अशा वळणावर आज आपण उभे आहोत, की ध्वनीऐवजी आकृतीद्वारे विचार आणि भावना यांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. साधारणतः दहा हजार वर्षांपूर्वीची भाषेची अवस्था आणि भाषेचे भविष्य व्हाया सद्य:स्थिती असा मोठा चिंतनपट भाषेविषयी बोलताना लेखक उभा करतो. लेखकाने जगभरातल्या भाषांची स्थितिगती तपासताना भारतीय भाषांच्या अवस्थेचा आढावा विस्तृतपणे घेतला आहे. आपण भाषा बोलणारे मोजतो परंतु त्याचवेळी भाषांची संख्या मात्र दुर्लक्षित केली जाते. सेन्सेस आणि सर्व्हे यांतील भेद लक्षात घेतला पाहिजे. जगभरातले आदिवासी, अल्पसंख्यांक मुख्य प्रवाहापासून कायमच बाजूला ठेवले आहेत. अस्तित्वअस्ताच्या सीमारेषेवर असणाऱ्या समूहांची भाषा वाचवणे यासाठी केवळ राज्यकर्त्यांवर अवलंबून राहता येणार नाही. समाजातील विविध घटकांनी सक्रिय व्हायला हवे. भाषा टिकवायची असेल तर भाषा बोलणारा माणूस टिकला पाहिजे. भाषेचे संचित टिकवणे ही मोठी जबाबदारी लेखकाने स्वतःसहित वाचकांवर सोपवली आहे.

मुद्रित आणि मौखिक द्वंद्वात अडकलेल्या भाषा, समूह आणि पर्यायाने संस्कृती यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न 'लोक' या प्रकरणात केला आहे. लेखारंभीच लेखकाने 'फोकलोअर' या शब्दाची व्युत्पत्ती, जागतिक पातळीवरील त्याचे उपयोजन सांगितले आहे. भारतीय साहित्यात महाकाव्ये, स्मृती, श्रुती, भारुडे, गवळणी यांसारखे साहित्यप्रकार प्राचीन काळापासून होते. परंतु युरोपात आर्थिक स्तरानुसार Folk आणि Classical असे असलेले वर्गीकरण भारतीय साहित्यात करण्याची परिस्थिती नव्हती. अशावेळी 'लोक-साहित्य' ह्या संकल्पनेची भारतीय साहित्याच्या अनुषंगाने असलेली संगती-विसंगती सांगण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. लिखितसाहित्य कालांतराने इतिहासजमा झाले तरी भविष्यात मौखिक साहित्याच्या माध्यमातून मानवीयता पुढे नेता येईल, असा विचार लेखकाने मांडला आहे.

'वर्तमान' या प्रकरणातील पहिल्या भागात लेखकाने वृत्तपत्रांची जडणघडण सांगितली आहे. वृत्तपत्रांच्या बाबतीत जाणवलेल्या भाषिक समस्याही निदर्शनास आणल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणातील 'सध्या मी' या शीर्षकांतर्गत असलेल्या विचारनोंदीत लेखकाचा भूतकाळ आणि वर्तमान यादरम्यानचा कार्यपट उलगडला आहे. भारतातीलच नव्हे तर जगभरातील भाषा सर्वेक्षणाचे काम करत असताना प्रत्यक्ष भाषा समुदायांना जाऊन भिडण्याची लेखकाची उर्मी दिसते. युनेस्कोने २००८मध्ये जगभरातील भाषा संशोधकांना सोबत घेऊन जागतिक पातळीवर भाषेवर एखाद्या युनिव्हर्सिटीसारखी काम करणारी संस्था काढण्याचे ठरविले होते. त्या संस्थेचा आराखडा बनविण्याची जबाबदारी लेखकावर सोपविण्यात आली. लेखकाने आराखडा सुपूर्द केला परंतु विविध देशांचे संघर्षात्मक दृष्टिकोण समोर आल्याने युनेस्कोने आपला विचार काही काळासाठी बाजूला ठेवला. इथे न थांबता लेखकाने जगभरातील आठशे विद्वानांसोबत चर्चा करून जागतिक भाषा मापनीकरणाचा प्रकल्प सुरू करण्याचे ठरवले. जागतिक पातळीवर भाषिक सद्यःस्थितीचा आढावा घेऊन 'ए ग्लोबल लँग्वेज स्टेटस रिपोर्ट' हा प्रकल्प सुरू केला. स्टेटस रिपोर्टमध्ये एकार्थी त्या विशिष्ट भाषेचे भवितव्य सांगितलेले असते. स्वीडन आणि अमेरिका यांची अनुक्रमे टेक्नोलॉजी आणि गणिताच्या अंगाने केलेली भाषेच्या भवितव्याची मांडणी पूर्णतः न स्वीकारता लेखकाने 'त्यापेक्षा, ज्या-त्या भाषिक समाजाला ह्या प्रकल्पात सामावून घेऊन, त्यांच्या स्वतःच्या आकलनाकडे समाज-मानसशास्त्रीय दृष्टीने पाहण्याचे ठरविले.' (पृ. १६०) ग्लोबल लँग्वेज स्टेटस रिपोर्टसाठी लेखकाला जगभरातून संशोधकांचा प्रतिसाद मिळत आहे. २०२५ मध्ये स्टेटस रिपोर्टच्या योजनेनुसार १६ खंडांपैकी पहिला खंड प्रकाशित होईल असा लेखकाला विश्वास वाटतो. मानवहिताचे काम करताना स्व, देश, कर्तृत्व यांचे विसर्जन करून पुढच्या मार्गावर लेखकाने पाऊल ठेवले आहे. २०१८ पर्यंत भाषा सर्वेक्षणाच्या केलेल्या आणि करत असलेल्या कामाचा पूर्व - सध्या- पुढे असा सरळरेषीय आढावा येथे घेतलेला आहे.

'पूर्णतेचा पाया' या प्रकरणात दोन *त्रिज्यां*चा मिळून व्यास होतो आणि *त्रिज्या* पूर्णतेच्या चलत स्थितीचे रूप असते, हे भान अधोरेखित केले जाते. लेखकाने सांगितलेला *त्रिज्या* आणि व्यास यांतील हा सहसंबंध व्यास आणि महाभारताच्या दाखल्यातून स्पष्ट केला आहे. 'वर्तुळाच्या एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्याला सांधण्याचे काम करणाऱ्या रेषेला 'व्यास' हाच शब्द महाभारत काळातही वापरण्यात येत होता.' (पृ. १६७) असे एक महत्त्वाचे निरीक्षण लेखकाने नोंदवले आहे. म्हणजेच कृष्ण, अर्जुन, कुंती, कर्ण, द्रौपदी हे *त्रिज्या* आहेत. गतिशील रूपे आहेत. व्यास पूर्ण घटक आहे, स्थिर स्थितीचे प्रतीक आहे. लेखकाचा हा *त्रिज्या*-व्यास दाखला केवळ गणितीय परिमाण नाही; तर त्याद्वारे व्यक्तीच्या विकासासाठी मार्गदर्शन केले आहे. आजवरची जडणघडण आणि लेखसंग्रहातील विचारनोंदी यांचे आवर्तन लेखकाने उद्धृत केलेल्या महाभारतातील 'चक्र' या प्रतीकातून पूर्ण झाल्याचे दिसते.


सदर वैचारिक लेखसंग्रहातील आठ प्रकरणे म्हणजे लेखकाचे मुक्त चिंतन आहे. लेखकाने आजवर अनेक विषयांवरील संशोधनाच्या निमित्ताने सिद्धांत, सूत्रे, गृहिते यांचा अभ्यास केला आहे. हे करत असताना वर उल्लेखल्याप्रमाणे युक्लिडसची त्रिज्येची धारणा, जैन तत्त्वज्ञानातील चौथ्या शतकातील काळ-अणू ही संकल्पना आणि गौतम बुद्धाने ज्ञानप्राप्तीनंतर मानवहितासाठी पुन्हा जनलोकात परतणे ही घटना यांनी लेखकाला झपाटून टाकले होते. लेखक म्हणतो, 'रियलायझेशन किंवा दर्शन याला केंद्र मानले आणि चेतनाविहीन अवस्था म्हणजे परीघ मानले तर गौतमाने 'बुद्ध' बनताना पकडलेला मार्ग 'त्रिज्ये'चा होता.' (पृ. १६) अशाप्रकारे प्रवास करणाऱ्या आणि लेखकाच्या जगण्यावर, विचारप्रक्रियेवर प्रभाव असणाऱ्या अनेक व्यक्तींचा उल्लेख संग्रहात आहे. महात्मा गांधी, अरविंद घोष, महाश्वेतादेवी इ. व्यक्ती त्यांच्या विचारमंथन त्रिज्येवर आधारस्तंभ आहेत. महात्मा गांधींचे विचार आणि आचरण यांचा लेखकावर असलेला प्रभाव लेखसंग्रहातील या विचारनोंदींत प्रकट होतो. भटके-विमुक्त, आदिवासी यांच्या भाषा, संस्कृतीसंवर्धनात लेखकाचे प्रयत्न, त्यांची कार्यप्रणाली संग्रहातून तपशीलवार जाणून घेता येते. स्वतंत्र देशाचा नागरिक, भारतीय भाषा सर्वेक्षण, जागतिक भाषा संशोधन, आदिवासी अकादमी, आदिवासी-भटक्या विमुक्त समुदायांच्या प्रतिष्ठापनेचा लढा, 'दक्षिणायन' अभिव्यक्तीचा आवाज असणारे आंदोलन या साऱ्या भूमिकेत गणेश देवी *त्रिज्या* ही संकल्पना अधिकाधिक गतिशील करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. लेखसंग्रहात अधेमधे पेरलेल्या कवितेच्या तुकड्यांत एक स्वतंत्र विचार आहे. खरं तर विचार आणि भावना या टोकांवरची ती अस्वस्थता आहे. तिची व्याप्ती समजून घेण्यासाठी वाचकाला संश्लेषित रूपच अनुभवावे लागते. सांकल्पनिक सिद्धांत सहज उलगडणारी संग्रहाची ओघवती भाषाशैली आहे. मुखपृष्ठ संग्रहाला समर्पक आहे.

गणेश देवी यांच्या आजवरच्या चिंतनाचे अनेकविध कंगोरे *त्रिज्या* या लेखसंग्रहातून वाचकांच्या समोर येतात. समाजोन्नतीच्या कार्यात वरवर शांत दिसणाऱ्या परंतु अंतरंगात अस्वस्थतेची खळबळ असलेल्या विचारांची प्रचिती या लेखांतून येते. सत्तर हजार वर्षांच्या भाषेचा होणारा अस्त, सांस्कृतिक स्थित्यंतरे, अल्पसंख्यांकांचे अस्तित्व, मानवीयता नष्ट करणारी अदृश्य सत्ता यांसारख्या आणखी कितीतरी प्रकारची ही अस्वस्थता आहे. लेखक आपल्या मनोगतात सांगतो; 'जो केंद्र नाही आणि जो परीघ नाही असा हा मधलाच लटकलेला आवाज, खूप अस्पष्ट, खूप क्षीण, तुमच्यापर्यंत पोचवला आहे.' (पृ. आठ) त्रिज्येच्या अस्वस्थ अवकाशात लेखकाचा हा आवाज वास्तविक सत्याचा आणि निर्भयतेचा आहे. भाषा, समाज, संस्कृती, सत्ता, देश अशा कितीतरी बिंदूंना स्पर्श करत लेखक गणेश देवी अंतिमतः माणसाचे माणूसपण साकार करणाऱ्या दिशांचे सूचन करतात. त्यामुळे परिपूर्णतेच्या शोधाचा हा लेखनप्रवास वाचकाचे अनुभवविश्व समृद्ध करण्याचे सामर्थ्य बाळगून आहे, असे निश्चित म्हणता येते.

# कास्ट मॅटर्स : २१ व्या शतकातल्या दलित जाणिवेतील जात-वर्गीय द्वंद्व

**विशाल ठाकरे**

प्राध्यापक व संशोधक
टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस.
vishal.thakare09@gmail.com




(परीक्षित पुस्तक : *कास्ट मॅटर्स*, लेखक : सुरज येंगडे, प्रकाशक: पेंगवीन रँडम हाऊस इंडिया लि. , गुरगाव-हरयाणा, प्रथम आवृत्ती : २०१९, पृष्ठे : ३२५, मूल्य : रु. ५९९)

भारतीय समाजातील जातवास्तवाचे स्वरूप व गतिनियम हे दिवसेंदिवस गुंतागुंतीचे बनत असून जात-जाणिवेतील अंतरंग व अभिव्यक्ती वेगवेगळ्या स्तरांतून व वेगवेगळ्या तीव्रतेने व्यक्त होत आहे. जागतिकीकरणामुळे उपलब्ध झालेलं तंत्रज्ञान, नवनवीन संधी व त्यासाठी होणारे स्थलांतर यामुळे जातीचा प्रश्न हा फक्त लोकल राहिला नसून तो ग्लोबल बनला आहे. अमेरिकेतील नुकतेच समोर आलेले Cisco प्रकरण याची प्रचिती देते. ही घटना जातिअंताच्या लढ्याच्या वैश्विक स्तरावरील विस्ताराची गरज अधोरेखित करते. तसेच या लढ्याला जागतिक स्वरूप देत जगातील इतर शोषित समाजघटकांसोबत जोडून घेत जात-वर्ग-स्त्रीदास्य-वर्णद्वेष अंताचा हा लढा अधिक शक्तिशाली व प्रभावी कसा होईल असा विचार करण्यास भाग पाडते.

भारतीय समाजातील जातवास्तवाचा अभ्यास सामाजिक शास्त्रांच्या अनेक शाखांमध्ये केला जात असून तो जात-व्यवहाराचे बहुरूपी व बहुपदरी आयाम समोर आणतो. जात-व्यवहाराची आंतरविद्याशाखीय चिकित्साही अलीकडच्या काळात सुरू झाली असून त्याद्वारे नवउदारमतवादी समाज व आर्थिक रचनेतील जातव्यवहाराचे अनेक पैलू निदर्शनास आले आहेत. सुरज येंगडेलिखित *कास्ट मॅटर्स* हे पुस्तक याच पंगतीतले आहे. दलित समाजातील नव्या, उच्चशिक्षित आणि निर्भीडपणे व्यक्त होणाऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या पुस्तकाने मागील वर्षभरापासून अनेक वाद-चर्चा घडवून आणल्या आहेत.

जागतिकीकरण व वाढत्या शिथिलीकरणाच्या धोरणाने जातवास्तव व व्यवहार हा वेगाने बदलत आहे. त्याचे गतिनियम नवनवीन रूप धारण करत आहे. या बदलेल्या जातवास्तवाची उकल करताना या पुस्तकामध्ये दलित समाजातील विचारविश्व, शोषणाची बदललेली परिमाणं, नवदलित राजकारण, दलित मध्यमवर्गाचा उदय आणि भूमिका, दलित भांडवलवाद व जातमुक्तीच्या चळवळीमध्ये ब्राह्मणी शोषणशासन संस्थेच्या अंतासाठी ब्राह्मण समाजाची भूमिका याची चिकित्सक मांडणी केली आहे.

सहा प्रकरणांमध्ये विभागलेल्या या पुस्तकातील पहिल्या पाच प्रकरणांमधून दलित जीवन, त्यांचे विचारविश्व आणि २१व्या शतकातील नवदलित राजकारणासोबत नव्याने उदयास आलेल्या दलित मध्यमवर्गाची जातिअंताच्या लढ्यापासून तुटत चाललेली नाळ व दलित भांडवलवादाचा फसवा प्रचार यांची परखड आणि तिखट भाषेत चिकित्सा येते. सहावे प्रकरण- 'ब्राह्मणवाद विरोधात ब्राह्मण' हे मात्र पुस्तकाला जोडलेल्या पुरवणीसारखे वाटते. या प्रकरणात दलित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ब्राह्मणांची भूमिका व स्थान काय असावे याविषयी चर्चा करून उपाय सुचवले आहेत. ब्राह्मणी शोषणशासनाची शृंखला तोडून तिचा अंत करण्यासाठी ब्राह्मणांनी cultural suicide bomber बनून जातिअंताच्या लढ्यामध्ये सहभाग घ्यावा अशी भाबळी अपेक्षा लेखक व्यक्त करतो.

पहिल्या प्रकरणामध्ये लेखक दलितत्वाच्या प्रतिमा आणि अंतरंग उच्च जातीय दृष्टिकोनातून न पाहता दलितांच्या भूमिकेतून (दलित स्टँडपॉइंट) पाहून त्याचे सौंदर्यशास्त्र उलगळतो. दलितत्वाची चर्चा करताना जातव्यवहाराच्या चौकटीतून आकारास येणाऱ्या दलित humor व दलित प्रेम अशा संकल्पनांचे मुक्तिदायी स्वरूप स्पष्ट करतो. पराकोटीची मानखंडना व जातीय अत्याचार वाट्याला आल्यावरही दलित समाजामध्ये जीवन जगण्याची आत्मप्रेरणा असते. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध हिंसक उठाव करून शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याची संधी असतानासुद्धा दलित प्रेम हे दुसऱ्याविषयी प्रेम व आस्था बाळगणारे असल्यामुळे ते मुक्तिदायी असते, अशी मांडणी लेखक करतो. उच्च जातीय समाज दलित प्रेमाची पदोपदी अवहेलना करतो हे दाखवून त्याऐवजी दलित प्रेमाचा स्वीकार हे जातिअंताकडे नेणारे एक पाऊल ठरू शकते, याचे लेखकाने दिलेले भान मूल्ययुक्त म्हटले पाहिजे. या प्रकरणात दलित या संज्ञासंकल्पनेची चर्चा करताना

दलित ही संज्ञा कमजोर व खचलेल्या समूहाची निदर्शक नसून ती शोषणाविरुद्ध लढणाऱ्यांचे सूचन करणारी आहे, असं लेखक म्हणतो. दलितांनी ब्राह्मणी शोषण-शासक व्यवस्थेनं लादलेलं अस्तित्व नाकारून सामाजिक न्यायाच्या लढ्यातून तयार झालेलं मुक्तिदायी दलितत्व स्वीकारावं असं तो आवाहनही करतो. शोषितस्थानी असूनसुद्धा जगण्याच्या रोजच्या संघर्षातून दलित humor ची निर्मिती होऊन ती जात-व्यवहाराभोवतीच फिरते याचेही सूचन लेखकाने 'जसे बापट हलकट व कोमटी तेलकट', अशा भाषिक उदाहरणातून केले आहे.

दुसरं प्रकरण नवदलित चळवळ व राजकारणाचा उदय याभोवती फिरणारं असून येथे दलित मुक्तिदायी राजकारणाच्या चर्चाविश्वाची चिकित्सा केली आहे. लेखकाच्या मते, जातप्रश्न सोडवण्यासाठी संविधानावर असलेला विश्वास, संविधानिक पद्धती आणि तरतुदी यांवरच अवलंबून न राहता पर्यायी-बहुआयामी संविधानवाद स्वीकारण्याची गरज आहे. संविधानाला मूलगामी व मुक्तिदायी राजकारणाची जोड देण्याचीही आवश्यकता आहे. दलित चळवळीत आलेल्या शिथिलतेला रोहित वेमुला प्रकरणाने वेगळं वळण मिळालं. दलित संघर्ष तीव्र झाला. या नवदलित राजकारणाचा उगम व स्वरूप विशद करताना दलित राष्ट्रवादाचा विचार, दलित देशप्रेम याचे स्वतंत्र विवेचन पुस्तकात आले आहे. दलित या category चे discursive (सतत विकसित होत जाणारे) स्वरूप स्पष्ट करताना दलित राजकारणातील द्वंद्व अधोरेखित करून येथे दलित एकजूट न होण्यामागे कारणीभूत असणारे अडथळेही सांगितले आहेत.

याच प्रकरणात तंत्रज्ञानाने केलेल्या क्रांतीचा फायदा दलितांची अभिव्यक्ती व संघर्ष प्रभावी करण्यासाठी झाला, त्यात सोशल मिडियाची भूमिका महत्त्वाची होती, असे लेखक म्हणतो. त्याच्या मते, चळवळीला तीव्र आणि विस्तारित करण्यासाठी प्रभावी आयुध म्हणून सोशल मिडियाचा वापर होत आहे. तंत्रज्ञानाच्या जोडीमुळे दलितांचा प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा प्रतिरोध आणि संघर्ष हा मूलगामी (radical) होऊन पुढच्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

या पुस्तकातील तिसरं प्रकरण सर्वाधिक चर्चेत असणारं व वादांना आमंत्रण देणारं असं महत्त्वाचं प्रकरण आहे. यात लेखकाने दलित समाजाचं वर्गीकरण चार मुख्य प्रकारांत केलेलं असून त्यास त्याने कास्टेगिरीज (castegories) असं म्हटलं आहे. या कास्टेगिरीज (castegories) च्या स्वरूपाची आणि वैशिष्ट्यांची चिकित्सा अत्यंत परखड भाषेत केली आहे. पुढे या चार मुख्य castegories चे उपप्रकार पाडून सविस्तर वर्णन केलेले दिसते. कास्टेगिरीज (castegories)ची मांडणी करताना लेखक दलितांच्या वर्तनाचा आधार घेतो व त्यांचे - टोकन दलित, कर्मठ दलित, प्रतिक्रियावादी दलित, एलिट दलित, salaried hypocrites (पगारदार दांभिक दलित), तिसऱ्या पिढीचे दलित, self-obsessed dalits (शोषणमुक्तीच्या चळवळीशी, दलितांशी बांधिलकी नाकारणारे दलित), harmful दलित व radical दलित (पुरोगामी, कृतिप्रवण) अशी

विभागणी करून प्रत्येकाचे वैशिष्ट्य सांगतो. मतांची गोळाबेरीज करून तिकीट कशी मिळवता येतील असा व्यवहारी/ हिशेबी विचार करणाऱ्या व्यक्तींना लेखक 'टोकन दलित' म्हणतो. 'कर्मठ दलित'हे उदारपणाच्या आवरणाखाली स्वहित साधून ब्राह्मणी धर्माचे आचरण करतात व 'प्रतिक्रियावादी दलित' हे एकमेकांचे उणेदुणे काढून चळवळीत बाधा आणतात, असं वर्णन करतो.

'एलिट दलित' हे दलित चळवळीच्या संघर्ष व त्यागामुळे मिळालेल्या सत्तावर्तुळात वावरताना स्वतःची दलित ही ओळख लपवतात व स्वतःला वेगळं दाखवण्याचा प्रयत्न करतात. आपले मित्रसंबंध सांभाळण्यासाठी स्वतःच्या ऐषोआरामी घरांमध्ये आंबेडकरांची व बुद्धाची प्रतिमा बेडरूममध्ये ठेवून स्वतःला एका प्रस्थापित ब्राह्मणी प्रतिमेमध्ये ठसवू पाहतात, अशी टीका लेखक करतो.

पगारदार वर्गाचे वर्णन करताना भाषेचा तिखटपणा खूप जास्त आहे. आरक्षणामुळे मिळालेल्या संधीचा फायदा स्वहित साधण्यासाठीच करून घेत स्वत:वर अन्याय झाल्यावर मात्र या वर्गास आपल्या जातिसमूहाची आठवण येते. सत्तास्थानी गेल्यावर त्यांच्यातील वर्गोन्नतीची भावना वाढीस लागून जातिअंताच्या भावनेला तिलांजली दिली जाते, असा आरोप या वर्गावर लेखक करतो.

'तिसऱ्या पिढी'तील दलित हे दलितांच्या प्रश्नांविषयी अनभिज्ञ व असंवेदनशील असणारे आहेत तर उच्च शिक्षण घेऊन आर्थिक प्रगती केलेले दलित self-obsessed गटात मोडतात. याप्रकारचे दलित हे काठावर उभ्या असलेल्या इतर दलित बांधवांना सतत त्यांच्या मागासपणासाठी दोष देत असतात. 'Radical दलित' मात्र संघटन उभारून स्वतःची ओळख निर्भीडपणे सांगतात व जातीय अत्याचार झाल्यावर कृतिप्रवण राहतात.

दलित स्त्रिया, दलित विचारवंत यांच्या स्वभावविशेषांचाही धावता आढावा लेखकाने या पुस्तकात घेतला आहे.

दलित समाजाचे असे कास्टेगिरीज (castegories) मध्ये वर्गीकरण करून त्याचे वैशिष्ट्य सांगताना लेखकाची अन्वेषण पद्धत लक्षात येत नाही उलट या वर्गवारीसोबत जोडून घेण्याची, रिलेट करण्याची जबाबदारी लेखक वाचकांवरच टाकतो. वर्णन केलेल्या castegories मधील प्रवृत्ती या भारतीय समाजातील इतर जातसमूहांचेही वास्तव आहे, या प्रवृत्ती अन्य जातसमूहांमध्येही दिसून येतात हे सांगायला मात्र लेखक विसरतो.

प्रकरण चार व पाचमध्ये दलित मध्यमवर्ग आणि दलित भांडवलवादाची चिकित्सा केली आहे. सत्तावर्तुळात असलेलं आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी दलित मध्यमवर्गाची चाललेली धडपड व त्यामुळे त्यांना

समाजहिताचा पडलेला विसर याविषयीची चर्चा आली आहे. तसेच दलित मध्यमवर्ग हा शासन व गरीब दलित समूह यामधील दुवा म्हणून काम करताना स्वहित जपण्यासाठी सामाजिक हिताला दुय्यम महत्त्व देऊन स्वतःच्या पदरात शासकीय सोयीसुविधांचा लाभ पाडून घेतो, असे निरीक्षणही लेखकाने नोंदवले आहे.

पुढे पाचव्या प्रकरणामध्ये दलित भांडवलवादाची चर्चा करताना दलितांचा रोजगार व एकूणच साधन-संपत्तीमध्ये असणारा नगण्य वाटा याची आकडेवारी देऊन दलित भांडवलवाद हा फसवा व स्वकेंद्री व्यक्तींचा आणि राज्यपुरस्कृत प्रचार असून जात-वर्गीय शोषणाची व्यवस्था पुनरुत्पादित करणारा आहे, असा प्रतिवाद लेखक करतो.

शेवटच्या प्रकरणामध्ये जातिअंताच्या चळवळीत ब्राह्मणांच्या योगदानाचा ऐतिहासिक आढावा घेऊन वर्तमान स्थितीमध्ये ब्राह्मणांनी जाती-आधारित भांडवली-सांस्कृतिक आणि सामाजिक प्रिव्हिलेजेस नाकारून जातविरहित समाजनिर्मितीसाठी cultural suicide bomber बनून महत्त्वाची भूमिका निभवावी, अशी लेखकाची अपेक्षा आहे.

तत्त्वज्ञ फुको (Foucault) 'चिकित्से'ची व्याख्या करताना म्हणतो, समाजात होणाऱ्या ज्ञान-निर्मितीचे सतत परीक्षण करणे म्हणजे चिकित्सा. म्हणून *कास्ट मॅटर्स*चे प्रकरणश: स्वरूपविशेष पाहिल्यानंतर या पुस्तकाच्या काही मर्यादा अधोरेखित करणे आवश्यक ठरते.

या पुस्तकामध्ये दलित समाजातील गतिशील अशा जात-वर्ग वास्तवाची मीमांसा करण्याचा लेखकाचा प्रयत्न स्तुत्य आहे. दलित समाजाने लोकशाही चौकटीत मिळालेल्या आरक्षणासारख्या आयुधांमुळे मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे, ही प्रगती साधताना वर्गीय उन्नतीचे प्रलोभन असणे हे या प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

एकीकडे लेखक नवदलिताच्या प्रतिमेचे वर्णन करताना तो/ती इंग्लिश बोलणारा, आयफोन वापरणारा, निर्भीड, परदेशी शिक्षण घेणारा असं करतो व दुसरीकडे मात्र ही सगळी साधनं व संपन्नता मिळवून देणाऱ्या प्रक्रियेचं खंडन करताना दिसून येतो.

दलितांनी वर्ग-उन्नती साधताना किमान नैतिक जबाबदारी म्हणून मागास राहिलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी किती आणि काय प्रयत्न करावे हे सांगायला लेखक विसरतो. याच समाजातील काही संवेदनशील व जबाबदार व्यक्तींचा अपवाद न करता सरसकट दलित मध्यमवर्गावर टीका करतो. खरे तर, सत्तेच्या वर्तुळात प्रवेश झाल्यावर सत्ता व संपत्ती संचयासाठी न हपापलेले संवेदनशील दलित अधिकारी व

नोकरदारवर्ग वितरणात्मक न्यायाच्या प्रकियेत सामाजिक हित साधताना दिसून येतात हे वास्तव समजून घेतले पाहिजे. लेखक पर्यायी संविधानवादाविषयी बोलतो तेव्हा सामाजिक न्यायासाठी फक्त संविधानावर अवलंबून राहण्याच्या मर्यादा नोंदविणे पुरेसे ठरत नाही. त्याने पर्यायी संविधानवादाचे स्पष्टीकरण दिले पाहिजे, त्याच्या यशस्वितेची उदाहरणे पुरवली पाहिजेत. कारण दलितांसाठी संविधान हे रोमँटिक दस्तऐवज नसून दैनंदिन संघर्षासाठीची एक मुक्तिदायी राजकारणाची भाषा आहे, त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे आणि ब्राह्मणी शोषण-शासनसंस्थेच्या जोखडातून मुक्ती मिळविण्याचा एक सक्षम पर्याय आहे.

एकंदरीतच २१व्या शतकातील जागतिकीकरणानंतर दलित समाजामध्ये आलेली सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे जाणून घेण्यासाठी या पुस्तकातील मांडणी उपयोगी पडणारी आहे. जातिअंताचा लढा मूलगामी करताना वर्गीय जाणिवेतील द्वंद व सामाजिक न्यायाचे तत्त्व यांचे संतुलन साधून समतामूलक समाजाची निर्मितीप्रक्रिया समजून घेण्यासाठी *कास्ट मॅटर्स* हे पुस्तक महत्त्वाचे योगदान देते.

# लेखक परिचय

## प्रेरणा तांबे

डॉ. प्रेरणा तांबे या लंडनस्थित प्राध्यापक आणि संशोधक आहेत. लंडन युनिव्हर्सिटीमधून 'ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट'मध्ये पीएचडी प्राप्त केल्यानंतर त्यांनी मुंबई, बर्मिंगहॅम, लंडन, ऑक्सफर्ड येथील विद्यापीठांमध्ये अध्यापन केले आहे. सध्या त्या बर्कबेक महाविद्यालय(लंडन युनिव्हर्सिटी) आणि ब्रुनेल युनिव्हर्सिटी (लंडन) येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. कामगार प्रशिक्षण, डिजिटायझेशन, कामगार कल्याण हे त्यांचे संशोधनाचे विषय आहेत. आयइइइ (IEEE) या हाय इम्पॅक्ट रिसर्च जर्नलप्रमाणे विविध संशोधनपत्रिकांमधून त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. डॉ. तांबे अनेक संस्थांसाठी 'मानवी संसाधन सल्लागार' म्हणून मार्गदर्शन करतात. त्या *फ्रंटिअर इन ब्लॉकचेन* या नियतकालिकाच्या संपादक आहेत. तसेच लंडनमधील हॉरसेंडील शाळेत गव्हर्नर म्हणूनही सक्षमपणे पदभार सांभाळतात. सर्वस्तरीय कार्यक्षेत्रांत स्त्रीनेतृत्वाचा आग्रही पुरस्कार करणाऱ्या डॉ.तांबे यांचा युकेमधील सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग असतो. त्यांनी महिलासक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या अनेक संघटना, हाय कमिशन ऑफ इंडिया (युके), हाऊस ऑफ लॉर्ड्स आणि युकेमधील विविध विद्यापीठांमध्ये स्त्रीसमतेच्या विचारांची मांडणी केली आहे. दृक-श्राव्यमाध्यमांवरील चर्चेतही विविध क्षेत्रांत, संस्थांमध्ये दिसून येणाऱ्या लिंगभावभेदाविषयी भाष्य करून हा भेद कमी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या धोरणांचे मार्गदर्शन केले आहे. स्त्रीसक्षमीकरणाच्या त्यांच्या कार्याची दखल घेत *वुमेन इकॉनॉमिक फोरम* या संस्थेने त्यांना 'वुमेन ऑफ एक्सलेंस' या पुरस्काराने गौरवले आहे.

## शैलेन भांडारे

शैलेन भांडारे यांचा जन्म आणि पदव्युत्तर शिक्षण मुंबईत झाले. गेली सुमारे २५ वर्षे त्यांचे ब्रिटनमध्ये वास्तव्य असून व्यवसायाने ते इतिहासाभ्यासक, संशोधक, संग्रह-समीक्षक/पर्यवेक्षक आणि शिक्षक आहेत. त्यांच्या खास अभ्यासाचा विषय 'नाणकशास्त्र आणि वित्तीय इतिहास' असा आहे. ब्रिटनमधल्या फिट्झविल्यम म्युझियम (केम्ब्रिज विश्वविद्यालय) आणि ब्रिटीश म्युझियम या नामांकित संग्रहालयांत कामाच्या अनुभवानंतर गेली सुमारे वीस वर्षे ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाच्या ॲशमोलियन संग्रहालयात ते प्राच्य-नाणक-संग्रहाचा अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तसेच विद्यापीठाच्या 'ओरिएंटल स्टडीज' फॅकल्टीचे सदस्यत्व आणि विद्यापीठातल्या 'सेंट क्रॉस कॉलेज'ची फेलोशिप त्यांना प्राप्त झाली आहे. अनेक प्राच्यविद्याविषयक संस्थांशी त्यांचा व्यावसायिक संबंधही आहे. नाणकशास्त्र आणि आनुषंगिक विषयात त्यांचे संशोधनही सुरू असते. याशिवाय विविध मान्यवर नियतकालिकांतून आणि पुस्तकांतूनही ते सातत्याने संशोधनपर लेखन करीत असतात.

## अथर्व माधव गोंधळेकर

अथर्व माधव गोंधळेकर हे व्हर्जिनिया टेक युनिव्हर्सिटीत इलेक्ट्रॉनिक आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या विभागात संशोधन साहाय्यक म्हणून कार्यरत असून ते तेथे पीएचडी करत आहेत. त्यांनी याच युनिव्हर्सिटीमधून 'मास्टर ऑफ सायन्स' ही पदवी प्राप्त केली. 'High-Performance and Reconfigurable Computing' या विषयात त्यांना विशेष रुची असून सध्या 'reconfigurable computer architectures' किंवा 'Field-Programmable Gate Arrays (FPGA)' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषयावर त्यांचे संशोधन सुरु आहे. त्यांनी डी. जे. संघवी महाविद्यालय, मुंबई येथून इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन्स या विषयातून इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. व्हर्जिनिया टेक युनिव्हर्सिटीत रुजू होण्यापूर्वी त्यांनी उश्वा क्लीन एनर्जी टेक्नॉलॉजी, मुंबई येथे काम केले. संशोधनाव्यतिरिक्त त्यांना चेस आणि फुटबॉल या खेळात विशेष रस असून मराठी साहित्य आणि वाङ्मय वाचन हा त्यांचा आवडता छंद आहे.

## शुभेन फणसे

मुळचे ठाणेकर असलेले शुभेन फणसे हे गेली वीस वर्षे सिंगापूर येथे स्थायिक असून एका नामांकित आंतरराष्ट्रीय बँकेच्या माहिती तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा संबंधित ऑडिट विभागाचे ते प्रादेशिक गटप्रमुख आहेत. ह्या क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाला दहा वर्षांच्या इंडस्ट्रिअल इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील अभियांत्रिकी अनुभवाचीही जोड आहे. आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांसोबत शुभेन हे सिंगापूरच्या महाराष्ट्र मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते असून मंडळाच्या विविध उपक्रमांसाठी ते तांत्रिक अभियंत्याची जबाबदारी पार पाडत असतात.

## हेरंब निरगुडकर

हेरंब निरगुडकर यांचे शिक्षण बी. ई. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, एम. बी. ए. मार्केटिंग (केली स्कूल ऑफ बिझिनेस, अमेरिका) असून ते दोन वर्षे भारतात व एक वर्ष सिंगपूरमध्ये आय. टी. क्षेत्रात कॉम्प्युटर प्रोग्रॅमर आणि टेक्निकल आर्किटेक्ट आहेत. गेली बारा वर्षे अमेरिकेत कमिन्स या बहुराष्ट्रीय कंपनीत मार्केटिंग क्षेत्रातील विविध शाखांमध्ये मॅनेजर पदावर कार्यरत आहेत.

## प्राची पालेकर- निरगुडकर

प्राची पालेकर- निरगुडकर यांचे शिक्षण बी. ई. कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, एम. बी. ए., एम. एस. असून त्यांनी भारतात ४ वर्षे इन्फोसिसमध्ये काम केले आहे व आता गेली ६ वर्षे अमेरिकेत कमिन्स या बहुराष्ट्रीय कंपनीत बिझनेस ॲनेलिस्ट तसेच आय. टी. स्ट्रॅटेजी ॲनेलिस्ट म्हणून कार्यरत आहेत.

## दीपक करंजीकर

दीपक करंजीकर हे अभिनेता, लेखक, व्यवस्थापन-तज्ज्ञ, सोशो-इकॉनॉमिक तज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आणि वक्ता आहेत. त्यांनी जगातील पन्नासच्या वर देशांत प्रवास केला असून सहा देशांत त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आहे. शेवटचे त्यांचे काम हे अमेरिकेतील एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या समूह संचालकाच्या पदावरील आहे. शिवाय त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक बहुराष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापनाचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे. अमेरिकेच्या विद्यापीठातील बिझिनेस स्कूलमध्ये ते अभ्यागत प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आजवर अमेरिकेत Mergers and Acquisitions च्या अनेक प्रकल्पांचे नेतृत्व केले आहे आणि अमेरिकेसह अनेक देशांत प्रशिक्षणवर्ग घेतले आहेत. त्यांची अनेक सामाजिक -आर्थिक फोरमवर नियुक्तीही झाली आहे. तसेच सामाजिक उपक्रम, व्यवस्थापन परिसंवाद यांत त्यांचा सक्रिय सहभाग असून आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अभ्यासगटांवरही ते काम करतात. प्रोसेस–री इंजिनिअरिंगसाठी स्वत:ची पद्धती त्यांनी विकसित केली आहे.

अमेरिकेत वॉलस्ट्रीटच्या कार्यपद्धती, आर्थिक दहशतवाद, तेल आणि त्याचे राजकारण, अमेरिकन धोरणे, नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना यांचा सखोल अभ्यास असून त्यांनी त्यासंबंधी विस्तृत लिखाण केले आहे. त्यांची आजच्या विश्वाचे आर्त आणि घातसूत्र ही दोन पुस्तके प्रकाशित आहेत. ते अर्थक्रांतीचे राष्ट्रीय प्रवक्ता आहेत. त्याबरोबरच सात नाटके, अकरा टीव्ही सिरियल्स आणि एकोणीस चित्रपटात काम त्यांनी काम केले आहे.

## संजय इंगोले

संजय इंगोले हे एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी येथे मराठीचे सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आजवर अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये विविध विषयांवर निबंधवाचन केले आहे. तसेच पुस्तक, मासिक यांमधून त्यांचे संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत.

## वृषाली विनायक

वृषाली विनायक या संवेदनशील कवी आणि मराठी साहित्याच्या प्राध्यापक आहेत. त्या एमए, बीएड (मुंबई विद्यापीठ), जेआरएफ (युजीसी) प्राप्त असून सध्या श्रीमती चांदीबाई हिम्मथमल मनसुखानी महाविद्यालय, उल्हासनगर येथे मराठी विभागात तासिका तत्त्वावर अध्यापन करत आहेत. तसेच विद्यावाचस्पती पदवीसाठी (पीएचडी) मुंबई विद्यापीठात संशोधनाचे कामही सुरू आहे. त्यांनी महाराष्ट्रातील साहित्यवर्तुळात तरुणाईचे प्रतिनिधित्व करत *महाराष्ट्र कला साहित्य रसिक* संस्थेच्या अध्यक्ष या नात्याने सलग तीन वर्षे साहित्य महोत्सवांचे यशस्वी आयोजन केले आहे.

राज्यस्तरीय कविसंमेलने, परिसंवाद, साहित्यसंमेलने यांत निमंत्रित म्हणून सहभाग घेतला आहे. *महाराष्ट्र शासन कार्यसंचालनालयाने* ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके आणि पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या लेखन कार्यशाळेत विषयतज्ज्ञ म्हणून सहभाग नोंदवला आहे. मराठीतील विविध साहित्यविषयक नियतकालिके, वेबसाईट यांत त्यांच्या कविता, लेख, परीक्षणे प्रकाशित होत असतात. वृषाली विनायक यांना 'सावित्री पुरस्कार', 'मराठी भूषण' असे पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

## विशाल ठाकरे

विशाल ठाकरे हे *टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स* येथे लेबर स्टडीज या विषयाचे अभ्यागत व्याख्याता आहेत. आपले पदव्युत्तर शिक्षण त्यांनी *बर्लिन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड लॉ* येथे पूर्ण केले असून *टीआयएसएस* (TISS) मधून डेव्हलपमेंट स्टडीज या विषयात मानव्यविद्या अधिस्नातक (एमए) ही पदवी प्राप्त केली आहे. *संयुक्त राष्ट्र परिषदे*च्या जिनिव्हा येथील 'मानवी हक्क अधिवेशना'त 'दक्षिण आशियातील मानवी अधिकार वास्तव' या विषयावरील चर्चेत ते चर्चक म्हणून सहभागी झाले होते. तसेच जनरल असेंब्लीमध्येही त्यांनी 'जातीय अत्याचार व मानवी अधिकार' याविषयावर अनेकदा मांडणी केली आहे. सोशोलॉजी ऑफ लेबर, पोलिटिकल इकॉनॉमी ऑफ कास्ट, डेव्हलपमेंट इकॉनॉमिक्स, सोशल एक्स्क्लूजन अँड इन्क्लूजन स्टडीज हे त्यांचे चिंतनाचे विषय आहेत.

# संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

**In Text parenthetical Author-Date Citation** ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.

उदाहरणार्थ,

(रेगे २००४ : ७५)

सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.

उदाहरणार्थ,

रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

**संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.**

उदाहरणार्थ,

मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.

मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.**

उदाहरणार्थ,

नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .

नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

**एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.**

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

**लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN- TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.**

ग्रंथ (book)

**एक लेखक**

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(रेगे २००४ : २५)

**दोन लेखक**

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(मालशे व जोशी २००७ : ७८)

**संपादक (एक)**

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

**IN-TEXT-**CITATION

(जोशी १९६२ : ६०)

**संपादक (दोन)**

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

**IN-TEXT-**CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

**संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)**

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

**संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ**

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

**अनुवादित**

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

**संपादित आणि अनुवादित ग्रंथ**

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद,* पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट  २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.
महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

**वर्तमानपत्रातील लेख**

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.
महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

**ग्रंथपरिचय**

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ - विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.
महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

**मुलाखत**

केतकर, कुमार (२०१७) : 'मार्क्स : प्रभाव आणि परिणाम' शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

**भाषण**

दरेकर, प्रविण (२०१४) : 'चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!', *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.
महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

**अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका**

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : 'रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.
महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

## वेबसाईट संदर्भ

**संकेतस्थळावरील परीक्षण**

आळवेकर, एकनाथ (२०१८) : 'रिंगाण **:** उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी', पीडीएफ**.**

**http://vivekresearchjournal.org/current_issue.html**

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

**संकेतस्थळावरील लेख**

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : 'शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण'
**http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1**
(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**
(कुलकर्णी २०२०)

**संकेतस्थळावरील पुस्तक**

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.
**http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sahitya.pdf**
(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**
(मनोहर २०१२)

**संकेतस्थळावरील वर्तमानपत्र**

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : 'परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची'
**https:// www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349**
(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**
(हेमाडे २०२०)

## समाजमाध्यम

बोरगावे, दीपक (२०२०) : 'रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास'
**http://www.facebook.com/story.php?story_fbid=1873166136153212&id=100003795320490&scmts=scwspsdd&extid=englH9e5sIPtPaD4v**
(संकेतस्थळाला भेट २४ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(बोरगावे २०२०)

चव्हाण, दिलीप (२०१६) : 'आंबेडकरवाद : समकालीन संदर्भ' या विषयावरील विशेष व्याख्यान.
**https://youtu.be/RZiJjcvNEFc**
(संकेतस्थळाला भेट ३० एप्रिल २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(चव्हाण २०१६)

## व्यक्तिगत संज्ञापन

(ईमेल, भ्रमणध्वनीवरील **Text messages**, फेसबुक किंवा व्हाट्स ॲपवरील संदेश)
व्यक्तिगत संज्ञापनाशी संबंधित असलेले संदर्भ संदर्भसूचीमध्ये देऊ नयेत. लेखामध्ये जेथे हे संदर्भ देणे आवश्यक असेल तेथे त्याची नोंद करावी.
(व्यक्तीचे नाव, आडनाव, माध्यमाचे स्वरूप, दिनांक, महिना व वर्ष)

## टिपा

संशोधकाने आवश्यकता असल्यास शोधनिबंधाच्या शेवटी टिपा (**Endnotes**) द्याव्यात.
उदाहरणार्थ,

१. देरिदाने म्हटले आहे, **"To deconstruct the opposition, first of all, is to overturn the hierarchy at a given moment. To overlook this phase of overturning is to forget the conflictual and subordinationg structure of opposition.''**
**Jaques Derrida, *Positions*, op.cit.,p.41.**

२. **Fredric Jameson, The Political Unconscious, Methuen, London, 1981, p.99.**
फ्रेडरिक जेमसनने रूप ही संकल्पना साहित्यप्रकारात्मक वैशिष्ट्यांचा समावेश करून अधिक व्यापक स्वरूपात वापरलेली आहे. या ग्रंथात त्याने मार्क्सवाद, मनोविश्लेषण आणि संरचनावाद या तिन्ही गोष्टींना एकत्र आणून अत्यंत अपारंपरिक, तथापि साहित्यव्यवहारावर मनोज्ञ प्रकाश टाकणारे विवेचन केले आहे, ते मुळातून पाहण्यासारखे आहे.

३. कांटच्या **Critique of Judgment** या ग्रंथातील **Second Moment** पाहावा. कांटची सौंदर्यमीमांसा (१९७७) हे रा. भा. पाटणकर यांचे मराठीतील भाष्यही पाहावे.

४. या संदर्भात **Diana Laurenson, Alan Swingewood** यांचे **The Sociology of Literature, MacGibbon & Kee, London, 1972** हे पुस्तक महत्त्वाचे आहे. त्यातील लुकाच ते गोल्डमान या मार्क्सवादी परंपरेतील विचारवंतांबद्दलचे विवेचन समाज आणि साहित्य यांच्या संबंधातील यांत्रिक कार्यकारणसंबंध नाकारून साहित्याच्या समाजशास्त्राला पलीकडे घेऊन जाण्याचे प्रयत्न कसे घडत होते, याचे दर्शन घडवते. या पुस्तकात विशेष उल्लेख नसलेले, तथापि मार्क्सवादी परंपरेतलेच थिओडोर ॲडोर्नो आणि फ्रेडरिक जेमसन यांचा या संदर्भात विशेष उल्लेख करावा लागतो.

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

**© संभाषित या मुक्त नियतकालिकातील कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण किंवा पुनर्लेखन पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.**

**लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.**

**editor.sambhashit@mu.ac.in** with a cc to **coeditor.sambhashit@mu.ac.in**